सालअखेर ७ ... १।८
किरकोळ अंकास ............ ०४

Single copy................... 4 as

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०१

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetin r line 3 asot;

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 4 FEBRUARY 1895 NO. 5

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १८९५ इ० अंक ५

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कांपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें ते व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## मुलाचा शिक्षण क्रम

( मागील अंकावरून पुढें चालू )

ह्या १९ व्या शतकांत मानवी ज्ञानाच्या झालेल्या प्रगती बद्दल आपणास कितीही गर्व वाटो परंतु हें खरें आहे कीं या ज्ञानाचें पाऊल ह्या दिशेनें फार थोडे पुढें पडलें आहे; कारण आपल्या देशांत मुलें० बारा महिन्याची होण्या पूर्वीं जितकी मरतात तितकीं कमी सुधारलेल्या देशांत मरत नाहींत. आणि ह्याचें कारण मुलांच्या जपणूकींत व संगोपनांत फार चुका होत असल्या पाहिजेत हें आहे. हलक्या प्रतीचे लोक आपल्या मुलांस आफू सारखें घातुक पदार्थ देऊन त्यांची मुळींच काळजी घेत नाहींत यामुळें तीं मरतात आणि साधारण प्रतीचे व श्रीमंत लोक आपल्या मुलांची फार काळजी घेतात यामुळें तीं मरतात. "आमच्या बाळाला किनई अगदीं ऊन्ह सोसत नाहीं" असें ह्मणून त्याला घरांत कोंडून ठेवतात आणि आंगांत नेहमीं गरम व नरम कपड्याचे पुड्यावर पुडे चढवितात! कांहीं लोकांचें असें मत आहे कीं मुलें जेणें करून रांकट होतील असे उपाय करावे ह्मणजे सर्व ऋतूंत त्यांस थंड पाण्यांत यथेच्छ डुबूं देणें, थंडींत व उन्हांत इतस्ततः भटकूं देणें, अरबट चरबट खाऊं घालणें इत्यादि अशा रीतीनें जीं मुलें वांचून वाढतात, तीं जरी खरोखर सुदृढ व निकोप असलीं तरी हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं अशा जोगवणींतून मुलें पार पडण्या पूर्वीं त्यापैकीं पुष्कळ मृत्यूच्या भक्ष स्थानीं पडतात. ह्मणून आपल्याला मध्यम मार्गाचा स्वीकार केला पाहिजे. मुलांच्या खाण्या पिण्या संबंधानें ही कोणी धरबंद ठेवीत नाहींत. घरांतील माणसें मुलांनां कोंबून कोंबून खऊं घालतात. हें फार वाईट आहे अशा करण्यानें मुलांचा जठराग्नि मंद होतो इतकेंच नाहीं तर जेता वातानें ठेविलें असतां ज्यांचा उपयोग सहसा न करावा लागता अशीं रेचक औषधें मुलांस द्यावीं लागतात आणि तीं नेहमीं देण्याचें प्रयोजन पडल्यानें मुलांचें जन्माचें नुकसान होतें मुलांना औषध पाणी देण्या संबंधानें ह्मणाल तर तें फार सौम्य असलें पाहिजे आणि अनुभवशीर वैद्याच्या अनुमता शिवाय तें कधींही देऊं नये.

आपण मुलांनां ज्या चांगल्या अथवा वाईट रीतीचा शिक्षा लावूं त्या रीतीची ती त्यास लागेल. बऱ्या गोष्टीचा अथवा वाईट गोष्टीचा परिणाम त्यांच्या मनावर सारखाच होईल. वडील आणि शिक्षक त्यांना जें कांहीं सांगतील तें अगदीं खरेंच आहे असें मानून तीं ग्रहण करतील. एखादी भ्रांतिमूलक गोष्ट त्यांच्या मनांत ठसूं दिली असतां ती त्या ठिकाणीं रुजून तिचें प्राबल्य मुलांच्या सर्व आयुष्यभर चालेल. पुष्कळ मुलांच्या समजुती साहजिक, अशा भ्रांतिमूलक बनतात. त्यांचे एकदां असे समज झाले ह्मणजे एखाद्या अत्यंत उपहासास्पद अथवा असंभवनीय गोष्टीवर देखील त्यांचा विश्वास बसतो. पित्याचे अथवा ज्यांशीं नेहमी संबंध असतो अशा माणसांचे जे विचार अथवा ज्या समजुती असतात त्या सारखेच विचार अथवा समजुती पुष्कळ व्यक्तींच्या असतात. या करितां आपल्या मुलाचे समज भ्रांतिमूलक न होता शुद्ध व प्रगल्भ व्हावेत ह्मणून प्रत्येकानें फार काळजी घेतली पाहिजे. आपण त्यांना जो धडा घालून देऊं तो होता होईल तितका शुद्ध, सत्य आणि चांगला असला पाहिजे.

शाळेंतील शिक्षण कोणत्या पद्धतीनें असले पाहिजे ह्याचा आपल्याला या लहान निबंधांत फारसा विचार करितां येणार नाहीं. ह्मणून या संबंधानें आपण कांहीं ठोकळ विचार करूं. मुलांचें डोकें अगदीं कोंवळें असतांना इकडील तिकडील कमी महत्वाच्या निरर्थक माहितीनें तें भरतां उपयोगी नाहीं त्याच प्रमाणें उद्योग करण्याची व हातीं घेतलेलें काम नेटानें करण्याची किती अवश्यकता आहे; याबद्दल त्यांच्यावर उपदेशाचे गठ्ठे लादण्याची जरूर नाहीं. बुद्धि कोंवळी असून विचारशक्ती अल्पदर्शी असतानाच मुलांना अनेक विषय शिकविण्याची मारकूट करून कांहीं फायदा होणार नाहीं. सध्या शिक्षणाचे मार्ग सुलभ होऊन जिकडे तिकडे शिकण्या संबंधीं चळवळ उडल्यामुळें ही चाल सध्या फार प्रचारांत आहे. पुष्कळ विषयांचीं निव्वळ वरवर माहिती असण्यापेक्षां एका विषयाची चांगली माहिती असणें हें अधिक बरें आहे. कारण अशा रीतीनें अनेक विषयांची झालेली माहिती ध्यानांत फार अल्पकाळ राहते. मुलांनां शिकतांना कमी श्रम पडावे इकडे हल्लीं लोकांची विशेष प्रवृत्ति असल्याचें दिसून येतें. ही प्रवृत्ति स्तुत्य असून लोकांचे उद्देशही चांगले आहेत. परंतु अशा पासून कांहींच श्रम अथवा त्रास न सोसतां शिकण्याची सवय मुलांस लागण्याचा संभव आहे. जरूर लागणारी माहिती, स्वतः परिश्रम न करून, आयती मिळविण्याची एकदां त्यांत सवय लागली ह्मणजे तीं निरुत्साही होऊन त्यांच्या हातून शिकणें होत नाहीं. बुद्धि तरतरित होण्याकरितां, ज्ञान प्राप्त्यर्थ मुलांनीं स्वतः परिश्रम अवश्य केले पाहिजेत. अळंटळं करण्याची संवय लागून तिचा योग्य वेळीं प्रतिकार न झाला तर ती कधींही सुटत नाहीं. आळसा पासून मानसिक श्रम करण्याची अरुची उत्पन्न होते, बुद्धीला मांद्य येतें आणि शेवटीं मनाचें धैर्य नाहींसें होतात. ह्याच आळसापासून खोटा स्वाभिमान उत्पन्न होतो आणि ज्या मुलाला ही वाईट खोड लागली आहे त्याला असें वाटत असतें.

की, आपल्याला आतां शिकण्याचें कांहीं राहिलें नाहीं.

( पुढें चालूं )

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ९ शके १८१६

## राजकीय शिक्षण

नुकतीच मद्रास येथें जी कांग्रेस भरली होती ती संपल्या नंतर त्याच भव्य मंडपांत कांहीं प्रमुख मंडळींमध्यें शिक्षणाच्या तडाख्यांतून बाहेर न पडलेल्या मंडळींनीं चालू असलेल्या राजकीय विषयामध्यें विचार व वाद-विवाद करावा किंवा नाहीं ह्या संबंधानें थोडीशी वाटघाट झाली. त्या संबंधानें चार शब्द लिहिण्याचा आमचा इरादा आहे. इकडे सुद्धां क्वचित् या विषया संबंधानें उल्लेख होतो व कित्येक प्रसंगीं शिष्यवर्गानें या फंदांत पडूं नये असा उपदेश केला जातो. या वादाविवादामध्यें दोन्ही बाजूंचीं मतें प्रतिपादन करण्यांत आलीं. व त्यामुळें हा वादविवाद विशेष महत्वाचा झाला आहे. अध्यक्षस्थान मि. मार्गन ब्राऊन यांनीं स्वीकारलें होतें.

पहिल्या प्रथम नामदार मि. सुरेंद्रनाथ बानरजी हे बोलण्यास उठले. प्रारंभींच मि. सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं सांगितलें कीं मद्रासेंत मी आल्या बरोबर मला विद्यार्थी मंडळींनां चार गोष्टी सांगण्याला वेळ मिळेल किंवा नाहीं या विषयीं विद्यार्थ्यांनीं विचारलें व सध्यां कोणच्या प्रश्ना संबंधानें विशेष वादविवाद सुरूं आहे असें विचारतां 'विद्यार्थी मंडळीनीं राजकीय विषया संबंधानें चर्चा कां करूं नये' हा विषय कळविला. मि. सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं सांगितलें कीं, या विषया संबंधानें माझें ठाम मत झालें आहे. त्यांचे मतानें विद्यार्थी मंडळींनीं हा विषय हातीं कां घेऊं नये त्यांस सयुक्तिक कांहीं कारण नाहीं. जर विद्यार्थ्यांना इतिहास वाचण्यास कोणत्याही रीतीचा प्रत्यवाय नाहीं तर ह्या गोष्टीची चर्चा करण्याचा तरी प्रत्यवाय कां असावा? कारण इतिहास म्हणजे पूर्वीच्या राजकीय गोष्टींची सविस्तर हाकिकत. जर पूर्वींच्या राजकीय हकीकती वाचून आपली विचारशक्ति वाढते, आपली वर्तणूक उत्तम प्रकारची बनते व नीतिशिक्षणाला चांगल्या तऱ्हेचें वळण लागून तें पायाशुद्ध रीतीनें फैलावते तर मग सध्याच्या स्थितींतल्या राजकीय प्रकरणांतील गोष्टींच्या परिशीलनानें व वादविवादानें हेच परिणाम कां होऊं नयेत? इतिहास वाचण्या संबधानें कोणी हरकत करित नाहींत परंतु सध्यस्थितीच्या इतिहासाची चर्चा केली तर लोकांनीं नाकें कां मुरडावीत हें समजत नाहीं. पुनः दुसरी एक गोष्ट सर्वांनीं पुरी ध्यानांत बाळगली पाहिजे ती ही कीं आजचे विद्यार्थी उद्यां समाजाचे अग्रस्थानीं येणार व तसें झालें म्हणजे त्यांच्या डोक्यावर मोठ्या जबाबदारीचीं कामें येऊन पडणार व ह्या स्थितीमध्यें पूर्वीं पासून जर मुळींच अभ्यास नसला तर मग त्यास आपलें कर्तव्य बजावण्यास कठीण जाणार नाहीं काय? आज या समाजांत मला एकही मनुष्य असा सांपडणार नाहीं कीं जो समाजांतील वर नमूद केलेलीं कर्तव्यें महत्वाचीं नाहीत असें म्हणेल. जर हीं कर्तव्यें महत्वाचीं आहेत असें आपण कबूल करालं तर अशीं कर्तव्यें बजाविण्यास लोकांस कांहीं शिक्षण नको असें कधींही होणार नाहीं. जर सर्व गोष्टी मध्यें शिक्षणाची जरूरी आहे तर या गोष्टी मध्यें शिक्षण नको असा कोणीही आक्षेप घेणार नाहीं. यावर मि. सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं इंग्लंडांत वगैरे अशा वादविवाद करण्या संबंधानें विद्यार्थ्यांच्या सभा आहेत व त्या पासून पुष्कळ चांगले फायदे होतात असें सांगितलें. जरी राजकीय गोष्टी संबंधानें विद्यार्थ्यांनीं वाद विवाद करण्यास माझी हरकत नाहीं तरी राज्यशकट हाकण्यांचे संबंधांत त्यांनीं मन घालावें किंवा नये या विषयीं मतभेद असण्याचा संभव आहे व ह्या सर्व गोष्टींचा विचार व वादविवाद नीतितत्वाला अनुसरून पाहिजेत. मुख्य ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं सर्व गोष्टींचा पाया स्वार्थत्याग हा आहे. एकंदर जनसमूहा करितां व्यक्तिमात्र स्वतांचा पैसा किंवा सुख गमविण्यास तयार झाला पाहिजे.

यावर मि० मदन मोहन मालविया व आणखी दुसरे दोन गृहस्थ यांनीं उलट भाषणें भाषणें झालीं. मि. मालवीया यांचे बोलण्याच्याचा मुख्य मुद्दा असा होता कीं विद्यार्थ्यांनां या विषयासंबंधानें चर्चा करण्यास कांहीं हरकत नाहीं परंतु त्यामुळें एक मोठा तोटा होण्याचा संभव आहे. तोटा हाच कीं आज काळच्या गोष्टी संबंधानें मतभेद फार असतो. विषयांच्या निकट संबंधामुळें त्यांची व्हावी तशी फोड होत नाहीं व त्यामुळें विद्यार्थ्यांची विषयामध्यें गती होण्याला चांगला मार्ग नसतो व पुष्कळ वेळां विद्यार्थ्यांचे मनांत कोणत्याही गोष्टीचें ठाम मत होण्याचा रंग नसतो. व पुष्कळ वेळां ठाम ठरविलेल्या गोष्टी त्यांनां सोडून द्याव्या लागतात. यावर मि सुरेंद्रनाथ यांनीं उत्तर दिलें. शेवटील मुद्दा संबधानें बोलतांना तें म्हणाले कीं वर जे आक्षेप घेण्यात आले ते इतिहासा संबधानें सुद्धां घेतां येतील. उदाहरणार्थ १७८९ सालची फ्रान्स मधील राज्यक्रांतिच घ्या. ह्या संबंधानें अजून लोकांमध्यें मतभेद व लढालढी आहेच. असें जर आहे तर मग हा आक्षेप मागें पडतो. देशाच्या इतिहासामध्यें अशी वेळ येते कीं त्यावेळीं सर्व लोकांनां राजकीय गोष्टी संबधानें वाटाघाट करण्याचा प्रसंग येतो. इतिहासाकडे दृष्टि दिली तर असें आढळून येईल कीं जीं मोठमोठीं राष्ट्रें आज स्वतंत्रतेचा सुखानुभव घेताहेत त्यांमध्यें स्वतंत्रतेच्या कल्पना वगैरे प्रथम विद्यार्थी वर्गामध्यें सुरू झाल्या व त्या वाढत वाढत जाऊन पुढें. त्या योगानें सर्व समाज चांगल्या स्थितींत येऊन त्यांची परवशता गेली.

---

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार आल्फ्रेड वेब साहेब झाल्यामुळें आपल्या देशाचा बहुत फायदा झाला आहे. एक थोर मुत्सद्दी आपल्या राजकीय चळवळीला अनुकूल झाले इतकेंच नाहीं तर त्यांच्या साह्यानें पार्लमेंटांतील आयरिश सभासद आमच्या राष्ट्रपरिषदेचे पक्षाभिमानी होतील. उत्तरोत्तर राष्ट्रीय सभेची लोकमान्यता वाढत चालली आहे हें भावी कल्याणाचें पूर्व चिन्ह होय. राष्ट्रीय सभेचे उद्देश सार्वजनिक हिताचे व राजनिष्ठेचे आहेत, तिची कार्यमाला बहुव्यापक व राजमान्य आहे आणि तिचे मार्ग लोकवृंदास व राज्यकर्त्यांस मान्य व प्रतिष्ठित आहेत अशा विषयीं नामदार वेब सारख्या मोठमोठ्या गृहस्थांनीं जगाची खातरी करून दिली आहे आणि इंडियांतल्या राज्यकर्त्यां पैकीं बहुत अधिकाऱ्यांनींही आपला अभिप्राय प्रदर्शित केला आहे. राष्ट्रीय सभेचे विचार अत्यंत शांतपणाचे, तडजोडीचे, व दुरवरच्या विचाराचे आहेत आणि प्रयत्नाच्या सातत्यानें आपल्या श्रमाचें उत्तम चीज होईल. गेल्या दहा वर्षांत राजकीय शिक्षणाचा जो पाया इंग्रजी विद्येच्या प्रभावानें घातला गेला आहे तो फार भक्कम, मजबूत व चिरायु आहे आणि या पायावर जी इमारत उभारली जाणार आहे ती ईशकृपेनें भव्य, रमणीय व स्वातंत्र्याचें माहेर घर होईल आणि त्यायोगें ब्रिटिश राज्य चिरकाल, सुखसेव्य व विजासित होईल!

---

अलिकडच्या काळांत लोकांना विद्येची इतकी अभिरुची लागली आहे कीं लायब्ररी सारख्या संस्था लोकाश्रयावर सुरळीत व बिनधोक चालतात तेव्हां आकोल्या सारख्या मूळ विद्यापीठाच्या स्थलीं लायब्ररी साधारणपणें नीट चालते हें सांगण्यांत कांहीं विशेष नाहीं. गेल्या वर्षीं येथील लायब्ररीचीं कामें ज्या ज्या गृहस्थाकडे सोंपविली होतीं त्यांनीं तीं यथावकाश चांगलीं बजावलीं इतकेंच नाहीं तर त्यांच्या चांगुलपणा मुळें दुसऱ्या होतकरू सार्वजनिक व विद्याभिलाषी गृहस्थांच्या मनांत इर्षा आली आणि मागील सालच्या व्यवस्थापकांस मागें सरण्याच्या उल्हासवृत्तीनें यंदा दुसरें मंत्रिमंडळ लायब्ररींत स्थापित झालें आहे. गेल्या २७ वे तारखेस लायब्ररीची जनरल सभा भरली होती त्या वेळेस पुष्कळ लोक जमले होते हें मामूल वहिवाटीला गालबोट लागल्या प्रमाणें झालें. उत्तरोत्तर पुस्तकालयाच्या उन्नती विषयीं अकोले करांच्या हृदयांत अधिक स्पर्धा व हुरूप उत्पन्न झाला आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. व्यक्तिमात्रांचा नामोच्चार मागील सुव्यवस्थेच्या व्यक्ततेनें केला असतां सर्वांस आवडेल असें नाहीं. आणि किंबहुना कांहीं नांवें चुकीनें विसरून राहिलीं तर एका प्रकारें अपराध केल्या सारखें होईल म्हणून या खटाटोपांत न पडतां आम्ही चालूं वर्षाच्या व्यवस्थापकांचें अभिनंदन करून त्यांस या सत्कार्यांत यशश्री माळ घालो असें इच्छितों.

लायब्ररीस रिपोर्टीच्या वर्षीं ज्या देणग्या मिळाल्या त्या संबंधानें सेक्रेटरी साहेब असें लिहितात कीं:—

"मुंबईहून कावसजी दिनशा लायब्ररीच्या म्यानेजराकडून इंग्रजी मराठी २९ बुकें बक्षीस मिळालीं आहेत व त्याजबद्दल त्यांस आभार पूर्वक स्वीकारपत्र ही गेलें आहे. ही देणगी रा. रा. कृष्णाजी हरी उर्फ दाजी साहेब कोलटकर मलकापूरच ए. अ. कमिशनर यांच्या प्रेरणेनें मिळाली आहे व त्यांच्या या निरपेक्ष आगत्याबद्दल त्यांचे हा आभार मानणें अवश्य आहे. मे. एटकीन साहेब येथील हायस्कूलचे माजी हेडमास्तर हे गेल्या जून महिन्यांत पेनशन घेऊन विलायतेस गेल्या वेळीं त्यांस शहरांतील गृहस्थांनी पानसुपारीचा समारंभ केला होता. त्या समारंभाच्या म्यानेजिंग कमेटीकडून साहेब महशुरांचा आईल पेन्टिंग बस्ट व त्या बरोबर सुमारें १५।२० रुपयाचीं पुस्तकें लायब्ररीस देण्याचें ठरलें आहे पैकीं फोटो आपल्या समोरच आहे. पुस्तकें दाखल झाल्यावर त्याजबद्दल आभार मानणें होईल."

रिपोर्टींतील इतर माहिती पुढील अंकीं आम्हीं देण्याचा विचार केला आहे.

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY, 4, 1895

Litigation in Indian courts of Law presents a very sorry aspect. The law and procedure have become stereotyped and the parties in a court go home with a feeling that justice has its own *perverse* ways also. Morality and truthfulness are at a discount and men strive every nerve to fight at their arm's length in the assertion of their rights and liabilities. There is no where the spirit of compromise and the village communities of India have lost their hold over the people's heart and mind. People resort to law-courts oftener than they used to do previously. The administration of justice is no more a burden to the state but has become a resourceful branch of revenue.

The latest number of 'India' contains a suggestive article on the disintegreting effect of the English law-courts on the Indian society. The writer's picture of Modern India is certainly faithful and there is no doubt that litigation becomes ruinous to both the contending parties in the long run. A renowned historian has been rightly quoted to testify to the correctness of the picture. His observation runs as follows:—

"Incompatible as such a state of things must be . . . with the feelings and principles of Europeans, its effects upon the conditions of the inhabitants of India were not wholly subversive of their happiness. The persons placed over them belonged to themselves, were assimilated in religion and language, conversant with their usages; and not regardless of their good opinion. Their decisions, although not guided by a code of laws, were founded upon an accurate knowledge of persons and things; and, when not distorted by sinister influences, were commonly conformable to equity and good sense. The proceedings of the self-constituted courts were simple, and their sentences summary; they were not embarrassed or retarded by complicated forms and technical pleadings; and the people escaped the tax upon their money and time which more elaborate judicature imposes. Another advantage contribute to counteract the defects of the system. In the absence of courts of justice provided by the State the people learned to abstain from liti-

सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्र० क्लास १३ आर्जीचा नंबर १/९५.

दिवाणी सि० जज्ज साहेब जि० अकोला. यांचे कोर्टांत.

अर्जदार गणेशगीर

बापाचं नांव गुरू कल्याणगिरी

जात गोसावी

रहाणार मेरगांव भाकऱ्याचे

अज्ञान रोहागीर गुरू शिवरामगीर गोसावी रहणार मेरगांव भाकऱ्याचे ता० अकोला जि० अकोला (यांणें त्याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटिफिकीट मिळावे म्हणून) अर्ज दिला आहे यातव मृत्यु पत्राचे आधोर किंवा दस्तैवजा वरून किंवा अगदी जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास. सदर्हू अज्ञानाचे मालमिळकतीवर संभाळ करतां या नात्याने कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणी ता० ९ माहे फेब्रुवारी सन १८९५ इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे. ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल कराव्या ता० २९ माहे जानेवारी सन १८९५ इ०

V. N. Daudekor.

सि० जज्ज

---

विद्यमान दि० जज्ज साहेब बहादूर जिल्हा आकोलें.

गणेशगिरी गुरू कल्याणगिरी गोसावी राहणार मेरगांव भाकऱ्याचे ता. आकोला अर्जदार

सन १८९० चा आक्ट ८ प्रमाणें सरटीफिकेट मिळण्याबद्दल

मी सदरील लिहिलेला अर्जदार अर्ज करितों.

१ रोहागिरी गुरू शिवरामगिरी गोसावी अज्ञान हा शिवरामगिरीचा मुंडलेला चेला आहे. धर्मगृहस्थ गोसावी जन्माची तारीख माहित नाहीं पण त्याची उमर वर्षे सुमारें ११ची आहे राहणार मेरगांव भाकऱ्याचे तालुके आकोला जि० मजकूर.

२ अज्ञानाची व अर्जदाराची समाइक मिळकत स्थावर जंगम मेरगांव भाकऱ्याचे ता. आकोला व त्याची किंमत अजमासें रुपये ३४६२० आहे ह्याबद्दल तपशिलाची यादी या सोबत जोडली आहे.

३ अज्ञानाची मिळकत [ समाईक ] अज्ञानाचा गुरू शिवरामगिरी याची दुसरे पाटाची बायको इच्या पहिल्या नवऱ्याच्या पोटचा मुलगा शंकर भारथी व तिसरी पाटाची बायको रुखमाई राहणार मेरगांव भाकऱ्याचे ता. अकोले यांच्या ताब्यात असुन अज्ञान मूल रुखमाई जवळ आहे.

४. अज्ञानाचे जवळचे नातलग सर्व राहणार मेरगांव भाकऱ्याचें.

(१) अर्जदार गणेशगिरी गुरू कल्याणगिरी.

अर्जदाराचे पुत्र संतोषगिरी व रतनगिरी (१) रुखमाई मर्द शिवरामगिरी.

५ अज्ञानाचा गुरू हा ता. २८ आगस्ट सन १८९३ इसवी रोजीं मरण पावला यानीं लेखी मृत्युपत्र केलें नसून मरणापूर्वी तोंडी अज्ञानाचे समाईक मिळकतीचा व शरिराचे पालन करण्यासाठी अर्जदाराची नेमणूक केली आहे.

६ पूर्वी पालन करण्याचा अर्ज याच कोर्टांत एप्रील सन १८९४ इ० महिन्यांत अर्जदारानें केला होता. पण त्या अर्जाची प्रोसेस दिली नाहीं म्हणून कोर्टानें तो अर्ज रद्द केला.

७ अज्ञानाचें शरीराचे पोषणाची मिळकतीचे संरक्षणाचा पालन करणारानें केला जावा म्हणून हा अर्ज आहे.

८ अर्जदार हा अज्ञानाचा आजा असून त्याचे शरीराचे व मिळकतीचे संरक्षण करण्या विषयीं योग्य आहे

९ शास्त्र प्रमाणें अर्जदार गणेशगिरीचा से समाईक कुटुंबातील पुतण्या शिवरामगिरीने मुंडून केलेला चेला अज्ञान असून रोहागिरि हा अर्जदाराचा नातू असून त्याचा गुरु मरण पावला आहे. अर्जदार हा आजा असल्यामुळें अज्ञान हा सज्ञान होईपर्यंत त्याचे शरीराचे व मिळकतीचे संरक्षण करण्याचा हक्कदार आहे

१० अर्जदाराचा पुतण्या शिवरामगिरीनें दुसरी पाटाची बायको केली तिच्या पहिल्या नवऱ्याचा पोटचा मुलगा शंकर भारती आहे त्यानी आई मरण पावल्यावर तिची वहीण इशी पाट लावून शिवरामगिरीनें तिसरे बायको केली तिचे नांव रुखमाई. ही शंकर भारतीची मावशी आहे. अज्ञान मुलगा रोहागिरी. शिवरामगिरीचा मुलगा नसून मुंडलेला चेला आहे. याचा बाप तुकाराम पाटील भाकऱ्याचे व त्याचे भाऊबंद वगैरे यांचे सल्ल्यानें शंकर भारती व त्याची मावशी रुखमा बाई ही इस्टेटीची विल्हेवाट करीत आहेत. कित्येक शेते व शेतें शंकर भारतीनें आपले नावे करून घेतलीं आहेत व रोकड व दागदागिने वगैरेची विल्हेवाट केली आहे शंकर भारती आणि रुखमा बाई ही दोन्ही आज्ञानाचे अगत्य बाळगणारी नसून आज्ञानाचे माळाचा अभिलाश करण्यास इच्छीत आहेत करितां आज्ञानाचें शरीराचें पोषण व मिळकतीचें संरक्षण करण्या बद्दल अर्ज करण्यास कारण झाले आहे.

११ अर्जदार हा स्वतः गार्डीयन होण्यास कबूल आहे.

सदर्हू प्रमाणें अर्ज केला आहे तर चवकशी होऊन सरटीफिकिट मिळवावें.

तारीख

१ राजपुरी गुरु भवानपुरी दस्तुर खुद.

१ अमृतराव आवाजी कर्णिक द० खुद.

( सही )

गणेशगिरी गुरू कल्याणगिरी दस्तुर संतोषगिरी नि० खुद.

मी अर्जदार गणेशगिरी गुरू कल्याणगिरी प्रतीज्ञा करितो कीं या अर्जांत लिहिलेला मजकूर खरा आहे तारीख मजकूर.

( सही )

गणेशगिरी गुरू कल्याणगिरी नि० खु० दस्तुर संतोषगिरी.

खरी नकल

Tukaram Waman

शिरस्तेदार

---

क्लास १३ नं० १/९५

अर्जांतील ( क २ ) खालीं मिळकतीची यादी रोहागीर गुरू शिवरामगीर आज्ञान याचे मिळकतीची.

५००० मुक्काम मेरगांवची हवेली १ हांस चतुःसीमा पू० बखळ जागा या ढोर गांव. त्या जागा गांवकुसाचे दिवाणी पश्चिमे दिल्या पडीकेहेस उत्तर भागास जयराम वाठी व दक्षिण भागी बापुऱ्या वा मरूती माळी याची घरें जागा द० या मकानाचे खली जागा त्यांत विहिर आहे तेथ पांतो पडीकेडस रस्ता व त्या पडीकेहेस ढिगी भित. ५० मरूती दिनानाथ गारपगारी याची जागा व त्यात बर ह० व हेत जमीन आमचा मक्ता सर्वे नंबर २.

५९७० शेते मौजे मेरगांव भाकऱ्याचे तालुके व जिल्हे अकोले येथील.

९०० सर्वे नंबर १ पैकी एकर २०१६ आ. रु० ११ शिवरामगीर याचे नावे सालीम.

१०० नंबर २ एकर २८ आ. रु. ०८ शिवरामगीर याचे नावे सालीम

२०० नंबर १२ पैकी ३०३६ आ० रु० ७ जयरामगीर याचे नावे सालीम.

४०० नंबर २५ एकर ७०१६ आकार रुपये १२ जयरामगीर याचे नावे सालीम.

१९०० नंबर २९ एकर १४०२६ आ० २८ रुपये शंकरभारती याचे नावे सालीम.

८० नंबर ४९ एकर २१०१० आकार रुपये ३९ अमृता कुणबी याचे नांवें यांत ½ अंश.

३९० नंबर ४९ एकर १९०३९ आ० रुपये ३१ विठोबा पाटील यांचे नावे यांत ½ अंश.

४२५ नंबर ९२ पैकीं एकर ८०१७ आ० रु० १३ माणिक नानजी गुजर याचे नावे सालीम.

३०० नंबर६०एकर १७०२८ आ. रु.२७ विठोबा पा याचे नावे यात ½ अंश

४२९ नंबर ६१ एकर २५०१२ आ. रुपये ३७ विठोबा पा. याचे नावे यात ½ अंश.

८४० नंबर ७४ एकर १६०२९ आ० रुपये २१ जानकीराम याचे नावे सालीम.

४५० नंबर ८१ एकर १७०१७ आ० रुपये २३ गणू माळी याचे नावे यांत ½ अंश.

---

५५७०

१०५०० सोने पत्र कांची व इतर नग गोटी मिळून अदमासे तोळे ५००

१९०० चांदी दागिने वगैरे सुमार २००० तोळे.

२०० भांडी तांब्याची पितळेची वगैरे सुमारें

२०० कापड दर जिनशी सतरंज्या वगैरे

७५० बैल १०, म्हशी ३, गाई ४, कालवडी १० व गोऱ्हे घोडी १ शिंगरु १

१०५०० लोकाकडे येणे वहिखाता वरून पुरज्या वरून अडमास धान्याची पेवे सहीत.

---

३४६२०

उभयताची मिळून एकंदरीची मिळकत अदमासे इतकी आहे.

सही अर्जदाराची

खरी नकल

शिरस्तेदार

## वर्तमानसार.

gation; and when disputes among them arose submitted them to the arbitrament of judges chosen among themselves."

But we have serious doubts as to whether this change of things could have been averted.

---

Before Mr. A. Webb the President of the Madras Congress left the Indian shores his reception and farewell, throughout the whole nation were most hearty and cordial. His speech from the chair had its sequel in that delivered at the public meeting held under the auspices of the Bombay Presidency Association. The latter speech is replete with a number of golden thoughts and sound advice of which the following specimens are worth a careful study at the hands of every Congress-walla. The speech is so inviting and instructive that we cannot help the mental proneness to quote at least the best portions of it:—

Moderation in the Congress proceedings.

"We must judge everything by experience and upon its own merits. The world is older and soberer than it was in 1789. You and we at home have entered into a heritage of experience and example gained through the tears and sufferings of previous generations; and we would be unwise if we did not profit thereby. The sequence of events which have followed the liberation and enfranchisement of the slaves in the Southern States of America deserve the closet study at our hands. Their liberation was a complete success. The Southern Blacks have shown themselves more truly Christians than the Southern Whites. For a hundredth time in the history of reform, and under conditions scarcely likely ever again to be equalled in severity, the anticipations have been belied of those who urged that misfortunes were certain to come from the doing of what was but manifest justice. I wish I could speak with as great certainty concerning the effects of enfranchisement. Perhaps it will prove to have been the wisest policy in the end. But hitherto it has been attended with many and grave complications. An uneducated class were upon the moment enfranchised, open to be worked upon for selfish ends by designing men, and sufficient in number to swamp out the educated intelligence of the country. Nothing but confusion has ensued. A lesson has been afforded the world of the difficulty of always applying cut and dry principles to politics. If we desire to preserve coolness and equanimity in political action, we must ever bear in mind that politics after all effect but the framework and margin of human possibilities. The vast proportion of those possibilities depend upon men themselves. This truth was perhaps never better put than by Mr. Froude, holding that if progress is to be anything worth the name, it should have to face and solve these questions—"First, personally, are the individual citizens growing more pure in their private habits? Are they true and just in their dealings? Is their intelligence, if they are becoming intelligent, directed towards learning and doing what is right, or are they looking only for more extended pleasures and for the means of obtaining them? Are they making progress, in what old-fashioned people used to call the fear of God, or are their personal selves and the indulgence of their own inclinations the end and aim for their existence? That is one question, and the other is its counterpart. Each nation has a certain portion of the earth's surface allotted to it, from which the means of its support are being drowned. Are the proceeds of labour distributed justly, according to the work which each individual has done, or does one plough and another reap in virtue of superior strength, superior cleverness, or cunning?

The Congress, a sheet anchor.

"You must hold to this Congress movement as your sheet anchor and sure shield of defence; nothing can imperil or destroy its existence but the abandonment of the safe lines upon which you have hitherto proceeded. (cheers.) Build up the fabric of your liberties upon sober sense, upon ascertained and well digested facts, well put forward, upon adherence to the law, upon a charitable construction of the motives of your opponents. Every effort has been made and will be made to break you up,—to set you at loggerheads amongst yourselves—to set class against class in this country. None can be truly safe but in the other's weal. Cultivate wide and all-embracing spirit. If you feel intolerable the assumption of any class here which seeks to set itself above you think how those must feel who in your midst are still by others marked off from general sympathy. For none have I felt more compassion than for the very poorest, the most despised classes of your people. Surely the brotherhood of man, that great principle upon which the Congress is mainly founded, is a noble idea worthy of all acceptance. It is to that Christianity in its better and higher manifestations owes its vital force. There is a joy in the principle of human equality that once experienced can never be forgotten away. Inequalities there will always remain &c."

The lesson of history.

"How can the Anglo-Indian Government in its heart of hearts continue to regard your movements with aught but approval. It is in truth—"the richest fruit of that noble mission of which we, the citizens of the United Kingdom, should be proud—the greatest combined peaceful effort for the good of the largest number of the human race that history has recoded. Wherever I went in schools and colleges I found your young men studying English History—and what other lesson is to be learned from that history, but the desirability for men and nations alike of the steady progress of constitutional liberty. If the Congress is to be by the official classes regarded with jealousy—if it is to be dispised—they should at least have been mindful in time, and like the Southern slaveholders have made it penal to teach you to lead. There was no halting between the two paths. They deliberately chose the better that which has led to the Congress. This path cannot be retraced. But now another serious bifurcation is before them. Are they prepared by opposition to embitter and complicate or by their sympathy and their advice to help to guide into a secure haven and still waters. Whatever may be the temporary aberrations of baffled ascendency, I have little doubt as to the path into which the sound sense will direct which in the long run has hitherto characterised the people of the United Kingdom."

---

Under exports raw cotton grain and pulse and oilseeds form the chief items. Under the first exports were in quality very little less than the quinquennial average, the good crop of the year causing a brisk recovery from the figures of 1892-93. Grain and pulse exports fell off from a quinquennial average of maunds (thousands) 1,038 to 77 only. Wheat exports were maunds 36,739 only against 413, 567 in 1892-93: a falling-off in tde demand for wheat for shipment to Europe was the chief cause of the decreased export This decrease is to a large extent counterbalanced by an increase in the exports of oilseeds: exports of linseed, rape, mustard and castor-oil seeds to Bombay all largely rose.

Trade Report.

---

## वऱ्हाड

हवामान—थंडीचें मान कमी कमी होत चाललें आहे. पीकें मध्यम स्थितींत आहेत. सार्वजनिक आरोग्य चांगलेंसें नसून किरकोळ दुखणीं नरीच चळावलीं आहेत.

कर्नल मेकझी कमिशनर यांची स्वारी आकोल्याहून उमरावतीस जाऊन नंतर परत आकोटास गेली आहे. साहेब बहादूर रेसिडेंट झाले असल्यामुळें आणि त्यांचें आकोटास आगमन बहुतेक अखेरचें असल्यामुळें आकोटचे शिष्ट लोक साहेब बहादुरांस मोठ्या गौरवानें अभिनंदनपूर्वक मानपत्र देणार होते.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर यास वाशिमास क्लार्क आफ कोर्ट नेमिलें पण बदलीच्या गांवीं न जातां त्यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली आहे असें कळतें.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. हे दर्यापूर तहशिलीचा चार्ज घेण्यासाठीं काल रात्रीं येथून रवाना झाले.

आणि रा. रा. गोविंदराज अय्या एक्स्ट्रा असि. क. हे स्माल काज कोडताचे न्यायाधिशाचें काम पाहूं लागले.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांची स्वारी या आठवड्यांत राजश्री देसाई यांच्या वरच्या मौंजीच्या कार्या निमित्त येथें आली आहे.

पंडित सुरज नारायण हे पुन्हां असिस्टंट कमिशनरचे जागीं वऱ्हाडांत परत येत आहेत.

राष्ट्रोदय प्रवर्तक नाटक मंडळी येथें आली असून तिनें तीन खेळ करून दाखविले पडदे वगैरे चांगले आहेत.

गेल्या सोमवारीं आकोला जिल्ह्याचे अबकारीचा हरास झाला त्याचा तपशील येणें प्रमाणें:—

| | रुपये |
|---|---|
| अफू— | ७२६०० |
| गांजा— | ४३५० |
| कलाली— | २३८३०० |

अबकारीचें उत्पन्न थोडें कमी आहे तथापि हें उत्पन्न झालें इतकें होण्यास देखील मे. हेअर साहेब यांची कसोशी व दक्षता हीं कारणीभूत आहेत.

गेल्या २४ वे तारखेला उमरावतीस बा. लवक्तृत्वोत्तेजक सभेचा समारंभ सुरू होऊन चौथे दिवशीं संपूर्ण झाला. ५७ उमेदवार बोलण्यास होते व ७५ रुपयांचीं बक्षिसें वाटण्यांत आलीं. सभा चांगली आहे परंतु तिची उठावणी विद्यार्थ्यां हातून होतांना त्यांचा पुष्कळ वेळ वृथा जातो.

आकोल्याचे तहशीलदार मि. मीर अनवरअली यांनीं नवाब सुलतान उल मुल्क यांस मुलकी काम चांगलें समजाऊन दिलें म्हणून नवाब साहेबांनीं एक घड्याळ सोन्याच्या सांखळी सह तहशीलदार यांस बक्षीस दिलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

---

नमुना (जी)

नादारी मुकदमा नंबर १ सन १८९५ विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं, बनश्या व० दऊ महार राहणार डोंगरगांव ता. बाळापूर हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे १ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १६ माहे २ सन १८९५ हा दिवस नादारांचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्यां नोटिशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्याकरिता नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदावेणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्युडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी. म्हणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें तारीख २६-१-९५ इ०

B. B. Sule
Judge
B. Court
Akola District

---

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

आज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकेट मिळण्या विषयी अथवा आज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमण्या विषयी

☞ पुरवणी पहा.

हा कालमहात्म्याचा प्रभाव आहे कीं, मनुष्यास ज्या गोष्टी अत्यंत त्याज्य वाटतात व तो ज्या करण्याविषयीं स्वतः नाखुष असतो, त्याच गोष्टी त्यास नकळत कालचक्र त्याच्या हातून इतक्या सफाईनें करवितें, कीं तें त्यास मुळींच कळत नाहीं. व पुढें त्याच गोष्टी त्यास अत्यंत ग्राह्य वाटूं लागून मग तो खुषीनें करतो. या करितां जुन्या चाकोरी धरून राहण्याचा दुराग्रह धरणाऱ्या लोकांनीं, देशकाल वर्तमानास अनुसरून तसें राहतां येणें हें मुळींच अशक्य आहे हें लक्षांत आणून, चांगला पोक्त विचार करून, हळू हळू सुधारणा करण्यास लागावें आणि स्वतः त्यांच्यानें असें करवत नसल्यास, जे हल्लीं सुधारणा करूं पाहतात, त्यांस तरी हरकत आणूं नये ही त्यांस सविनय प्रार्थना आहे.

दे० सि०

गहूं, तांदूळ, कापूस, शिरस, तीळ, खसखस, भुयमूग, एरंड्या, इत्यादि मालाचा निर्गत व्यापार करणें ह्मणजे, आपण आपल्यास अन्नाला, कापडला, तेलाला, व इतर जिन्नसाला महाग करून घेण्यासारखें आहे, व युरोपियन लोकांस आपल्या श्रमाचा फायदा देण्यासारखें आहे. ते लोक इकडील कच्चा माल तुह्माला, प्रसंग पडला तर, ज्यास्त किंमत देऊन नेतात, व तिकडून पाव, बिस्कीट, तेल, एरंडेल, मेणबत्त्या वगैरे पक्का माल तयार करून वाटेल तितकी किंमत ठेवतात व नफा मिळवितात.

आस्ट्रेलिया सिडनी शहरांत एका चिनई स्त्रीस ६०० रुपये पडतात. चीनमध्यें जोडीस ६३० रुपये पडतात. या साठीं लोक चीनाहून जोडी मागवितात, त्यांतील पसंत होईल तिच्याशीं लग्न लावितात, आणि दुसरीचा लिलाव करून टाकितात. व्या०

पुढील राष्ट्रसभा पुण्यास होणार आहे. आमचे बंधु केसरीकार यांणीं त्या राष्ट्रीय सभेस कसें स्वरूप द्यावें या बद्दल आपले विचार नुकतेच प्रसिद्ध केले आहेत, तेव्हां आमच्या पुढारी मंडळींनीं स्वस्थ न बसता केसरीकारांच्या सूचनांचा विचार करून मि० ह्यूम साहेबांच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा निश्चय करावा व त्यांनीं सुचविल्या प्रमाणें आपल्या प्रत्येक मागणीची किंवा दुःखाची खुलासेवार माहिती एकत्र होण्यासाठीं जय्यत पुरावा गोळा करण्याच्या तयारीस एव्हांपासूनच लागावें ह्मणजे पुढच्या राष्ट्र सभेचें महात्म वाढून ती खरोखर विशेष सामर्थ्यवान होईल. शु० सू०

नगर येथील एका ग्रॅज्युएट झालेल्या इसमानें खानदेशचे कलेक्टरांकडे नौकरी मिळण्याकरितां अर्ज केला होता. त्यास त्यांनीं १२ रुपये पगारावर बेलिफाची नौकरी मिळेल असें उत्तर पाठविलें. न्या० सिं०

नार्थ वेस्ट प्रांतांत डोळ्यांस चष्मे लाऊन मोठे श्रीमंती पोषाक करून हिंडणारे कांहीं पंजाबी लोक चोरीचा धंदा करणारे आहेत असें सांगतात.

हिंदुस्थान सरकारानें आपलें भारी व्याजाचें कर्ज ३॥ टके व्याजाचें केल्यामुळें सरकारास सालिना निवळ बेचाळीस लाख रुपयांचा फायदा झाला आहे. ह्मणजे सुमारें एक कोटीचा नवा मुलूख मिळाला असें होतें.

पर्शियांतील कुचन नांवाच्या शहराचा धरणीकंपानें विध्वंस झाला. पुष्कळ माणसें ठार झालीं. एका इमारतींत तर १०० स्त्रिया गर्द झाल्या.

अबिसीनीयाच्या फौजेशीं झालेल्या दोन दिवसांच्या लढाईत इटालीचे १२० मेले व ९० घायाळ झाले.

अमेरिकेंतल्या मजुरांनीं कट करून काम सोडलें व दंगा करण्यास प्रवर्तक झाल्यामुळें त्याच्या बंदोबस्ताकरतां सरकारानें ७,००० फौज पुढें आणली आहे, आणि त्या दंगेखोरांचे त्या फौजेशीं कांहीं सामनेही झाले.

दिवाळें निघालें:—पोमा तेजा नांवाचे एका प्रख्यात व फार जुन्या अशा पेढीचें दिवाळें निघालें असें बाहेर आलें आहे. एकंदर रक्कम तीस लक्ष रुपयांचें दिवाळें आहे. या पेढीच्या दिवाळ्यामुळें मुंबई शहरांतील पुष्कळ लोक नुकसानींत येऊन पडले आहेत.

श्रीमंत सर सयाजीराव महाराज हे आपले महाराणीसह युरोपच्या प्रवासांतून गेले पंधरवड्यांत बडोद्यास आले ते त्याच दिवशीं रात्रीं बडोद्यास गेले. त्यांचें प्रजेकडून त्यांचा चांगला सत्कार झाला. महाराज साहेब हे आतां सर्व कामें मोठ्या दक्षतेनें पाहूं लागले आहेत, बापट कमिशन संपलें, कमिशनचा रिपोर्ट तयार होत आहे. दी० बं०

सोलापूरचे कलेक्टर मि. वुड्चेस्टर यांनीं आजारीपणामुळें विलायतेस जाण्यास २॥ महिन्याची रजा घेतल्यामुळें मि. लक्ष्मण गोपाळ देशमुख सी. एस. यांस तेथील कलेक्टरचें काम करण्यास मिळालें, हें कळविण्यास आह्मांस फार आनंद होतो. मुंबई इलाख्यांत कलेक्टरच्या जागीं एतद्देशीय गृहस्थांस नेमल्याचें हें बहुधा पाहिलेंच उदाहरण आहे. लार्ड हारिस साहेबांनीं जातां जातां योग्य मनुष्याची योग्यस्थळीं केलेली ही नेमणूक पाहून सर्व लोक त्यांचे आभारी झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

शोचनीय मृत्यु— मद्रास हायकोर्टांतील न्यायासनावर विराजमान झालेले एतद्देशीय जज्ज जस्टिस मुथुस्वामी अय्यर यांस ता. २५ रोजीं दुष्ट मृत्यूनें गांठलें! ह्या गृहस्थाला न्यायमूर्ति हें नांव शोभण्यासारखेंच त्यांचीं जज्जमेंटें फार भारदस्तपणाचीं असत. हिंदु लोकांत उदयास आलेला असला एखादा दुसरा मोहरा दुष्ट काळाच्यानें पाहवत नाहीं, हें आमच्या देशाचें खरोखरच दुर्दैव आहे!

नाम० मेथा यांणीं अशी योग्य सूचना सरकारास केली आहे कीं, शेतकऱ्यांचें ऋणमोचन करण्याचा सरकारचा हेतु हल्लींच्या कायद्यानें अंशतः साध्य होतो; तो जर पूर्णत्वें करून सफल व्हावयास पाहिजे असेल तर जमिनीवर वाढलेले सारे कमी व कायमचे होण्याचे व शेतकीच्या जमिनीची स्थिति सुधारण्याचे उपाय योजण्याची फारच अवश्यकता आहे. हल्लींच्या कायद्यानें जो वरवर बेगडी रंग आलेला दिसतो, तो टिकाऊ नाहीं. स० शो०

ग्लासांत फारच ऊन पाणी घातल्यास तो फुटण्याची भीति असते, परंतु त्यांत एक चमचा टाकून ठेवला ह्मणजे झालें. कारण त्या पाण्याच्या उष्णतेचा बराच भाग त्या चमच्याचा धातू आपल्या कडे ओढून घेतो.

फुलांचा वास घेण्याची मख्खी जी काय आहे ती ही कीं अगदीं मृदूपणानें हुंगून असलल सुवास कसा द्यायचा तें समजलें पाहिजे. फुलाच्या मध्यभागीं नुसतें नाक खुपसून कांहीं होत नाहीं. अस्सल अत्तराचा जोकाय उगम तो कांहीं सांपडत नाहीं. उलट पाकळ्यांचा व पानांचा उग्रदर्प प्राप्त होतो. सुवास जो आहे तो रजाच्या मुळाशीं असतो, तेथें हलकेंच नाक नेऊन मृदूपणानें हुंगलें कीं सुगंधाचा अर्क मिळतो. क०

चेफू बंदरावर असलेल्या परदेशीय लोकांच्या रक्षणाच्या करणासाठीं ह्मणजे इंग्लन, अमेरिकन, फ्रेंच, आणि जर्मन अशीं चार लष्करें, चेफू बंदरावर येऊन उतरलीं आहेत. ही या चार राष्ट्रांची तयारी या लढाईत कोणता भाग बजवितें तें पहाणें आहे.

ह्मैसूरच्या कैलासवासी महाराजाच्या चिरंजिवांस गादीवर बसवून, ते वयांत येई पर्यंत श्रीमती राणी साहेबांच्या, दिवाणाच्या व ह्मैसूरच्या मुख्यसभेंतील कांहीं सभासदांच्या सल्यानें कारभार चालावा अशा बद्दल, ह्मैसूर व बंगलोर येथें जंगी सभा होऊन, ठराव पास झाले. त्या ठरावांची एक नकल व्हाइसरायाकडे व एक ह्मैसूरच्या राणी साहेबांकडे पाठविण्यांत आली आहे. कलकत्त्यास प्रत्यक्ष ह्मैसूरचे रसिडेंट व मि. लॉवार्नर साहेब गेले आहेत; तेव्हां विचारांनीं काय ठरतें तें पहावें.

टेलिफोनमुळें स्पर्शजन्य रोगांचा फैलाव होतो असा नवा शोध फ्रान्समध्यें निघाला आहे. व त्या प्रमाणें तिकडच्या टेलिफोनवर काम करणाऱ्या स्त्रियांत अनुभव हा आला आहे असें सांगतात. स० वि०

लार्ड हरीसचें स्मारक करण्याकरतां पुण्यास मि. दोराबजी यांच्या घरीं डा. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली व लार्ड हारीस यांच्या न्यायीपणाबद्दल डा. भांडारकर यांणी स्तुती केली. शेवटीं वर्गणी जमवून मुंबईच्या वर्गणीत द्यावी असें ठरलें. एकंदर लोक दहा पंधरा होते.

मद्रास हायकोर्टांतील सरकारी लघुलेखक (शार्ट हॅन्डरायटर) नाताळच्या सुटींत मद्रास मेल पत्रकर्त्यांच्या तर्फे यंदाच्या काँग्रेसमध्यें बातमीदार गेलेले होते असें समजतें. सरकारी नोकर इंग्लिश पत्राचे बातमीदार होऊन गेलेले चालतात काय! शो०

मुषकोपद्रव— लोहारापासून फिरोजपूर जिल्ह्यापर्यंत मुषकोपद्रवानें पिकांची फार नासाडी झाली!

जपानी रेशीम— जपान देशांत होणाऱ्या रेशमाची मागणी यूरोप व अमेरिका ह्या खंडांत फार आहे. १८९२ सालीं त्या देशांतून एकंदर ५७,५८,५६० पौंड किंमतीचें रेशीम पाठविण्यांत आलें.

प्रेतदहन प्रसार— ज्यास्त ज्यास्त होत चालला आहे. ता. १ डिसेंबर १८९३ पासून एक वर्षांत म्यांचेस्टर येथें बांधलेल्या प्रेतदहनगारांत ४७ प्रेतें दहन करण्यांत आलीं. ह्मणजे तें दहनगार स्थापन झाल्यापासून आजपर्यंत ७५ प्रेतें जाळण्यांत आलीं.

मृत्यु— इंग्लंडचे प्रसिद्ध मुत्सद्दी व कन्सर्वेटिव्ह पक्षाकडून हळूहळू लिबरल पक्षाकडे वळणारे लार्ड र्‍याडाल्फ चर्चिल यांस गेले आठवड्यांत मृत्यूनें ओढून नेलें. त्यांचें वय अवघें ४६ वर्षांचें होतें. हे फार स्वतंत्र विचाराचे, निःस्पृह व निर्भिड असत हे उत्तम लेखक व तसेच उत्कृष्ट वक्ते होते. ज्ञा० च०


## जाहिरात,

हे पाक पौष्टिक पहा, व त्वरित गुण—पण—तो मजेदार—किंमत थोडी, व फायदा ज्यास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन सर्दीमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरतरीत होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकुन बाळंतिणीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्हाल्यूपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पौष्टिक खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥; गोखरू पाक शेरास रु० ५ पाव; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.



## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मागरा, कांटे रास्कोपप्रमाणें, आंकडे ठळक चिनीचे काचेचें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां वेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ज्यास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास .................. ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ....... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetin r line 3 asot;

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY II FEBRUARY 1895 NO. 6

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ११ माहे फब्रुवारी सन १८९५ इ० अंक ६

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्द गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर वि- कल्या, रोग पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें कॅपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धांशिशि, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपण। निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा- गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणाकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तें व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सर्टीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट नंबर ७ प्रमाणें ( वर्ग १५ ) दि. की. मि. नंबर १/१८९५

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव पारवती उर्फ काशीबाई.

जवजे जैराम कुणबी

राहणार जवळ तालुके एलिचपूर.

जिल्हा एलिचपूर यास मयत.

जैराम बायाचे नांव सिवाजी राहणार जवळ तालुके एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्यांच मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख ६ माहे मार्च सन १८९५ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २० मोहे जानेवारी सन १८९४ इ०

H. Godwin Aust n
Offg. Deputy Commissioner.
दि० जजन एलिचपूर.

## मुलांचा शिक्षण क्रम

( मागील अंकावरून पुढें चालूं )

बुद्धीला नेहमीं व्यासंग असल्या शिवाय ती वाढत नाहीं. योग्य काळीं न येतां आळस रूपी जंग बुद्धीवर चढूं दिला ह्मणजे, ती स्वभावतः कितीही तीक्ष्ण असली तरी तिचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. लहानपणीं जमावलेल्या व्यर्थ वेळाची उणीव मोठेपणीं भरून काढतां येणार नाहीं. या करितां शिक्षणाचें काम ज्यांच्या हातीं आहे त्यांनीं ही गोष्ट लक्षांत बाळगून त्या प्रमाणें व्यवस्था ठेवावी.

मुलांना शिक्षण देण्याच्या कामीं धाकपेक्षां ममतेचा ज्यास्त उपयोग करावा. अपजय प्राप्त झाला असतां मुलांची निर्भत्सना करण्या पेक्षां, जय प्राप्त झाला असतां आपला संतोष दाखविणें, हें अधिक श्रेयस्कर आहे. अशानें त्यांस अधिक प्रयत्न करण्यास खेर उत्तेजन येईल एखाद्या मुलानें चांगलें काम केलें असतां, त्याची योग्य स्तुति केल्याविना तो प्रसंग फुकट जाऊं देऊं नये. चांगलें काम केलें असतां लोकांनीं आपली स्तुति करावी ही आवड ईश्वरानें मानवी स्वभावांत ठेविली आहे. ईच्या मुळें आपली सुधारणा होऊन अधिक प्रयत्न करण्यास उत्तेजन मिळतें. मुलांच्या मनात तर ही आवड फार असते. ह्मणून, त्यानें एखादे चांगलें काम केलें असता जर, आपण शाबासकी दिली नाहीं तर ही आवड त्याच्या मनांत जागच्या जागीं जिरून जाईल. व त्या मुलाचा पाण उताग होईल. इंग्लंडांतील प्रसिद्ध चित्रकार सरजान रेनाल्ड यानें एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं आपण लहान असतांना एखादें ओबड धोबड चित्र काढून आईकडे नेलें असतां तिनें आपलें प्रेमानें चुंबन घ्यावें. आणि ह्या चुंबनाच्या प्रभावानेंच चित्रकलेंत आपली प्रवीणता होऊन अजरामर कीर्ति मिळाली. ह्मणून स्तुति करण्याचा योग्य प्रसंग आला असता वाया जाऊं देऊं नये. आपण चांगलें कृत्य केलें असतां आपल्यास वाड वडिला कडून शाबासकी मिळावी एवढीच काय ती मुलांनां आशा असत आणि त्यांची ही आशा पुरी न करणें, हें फार निर्दयतेचें आहे. मुलांच्या शिक्षणक्रमांत वडिलांनीं व शिक्षकांनीं नेहमीं आपली पसंती अथवा ना पसंती दाखविली पाहिजे. अर्थातच ही दर्शविण्यांत पक्षपात करतां कामा नये. पक्षपात केल्यानें मुलांनां मनस्वी वाईट वाटेल. तशीच त्यांची व्यर्थ स्तुति करूं नये कारण असें केल्यानें तीं गर्विष्ठ होतील. चुकी दिसण्यांत किती ही लहान दिसो, अथवा तिचें महत्त्व कितीही कमी असो, ती मुलाच्या मनांत राहू देऊं नये. रोपा लहान असतांना प्रयास न पडतां उपटतां येतो परंतु त्याच रोप्याचीं मुळें जमिनींत खोल जाऊन मोठें झाड झालें म्हणजे तें उपटून टाकण्यास महा आयास लागणार आहेत. चुकीची गोष्ट ही अशीच आहे. म्हणून मुलांचे समज चुकीचे होतात न होतात तोंच ते काढून टाकले पाहिजेत.

बुद्धीची वाढ आणि सुधारणा होण्या करितां जे परिश्रम घेतले पाहिजेत त्याही पेक्षां मनाची सुधारणा करण्या करितां ज्यास्त परिश्रम घेतले पाहिजेत. बुद्धि तरतरीत असणें, कल्पना शक्ती विशाळ असणें आणि विद्या पुष्कळ असणें हे गुण खरोखरी फार चांगले आहेत; परंतु नीती आणि उत्तम अंतःकरण यांशी तुलना केली असतां त्यांची किंमत किती तरी कमी होईल! उत्तम बुद्धीशी सदृश असें उत्तम अंतःकरण नसेल तर ती अगदीं कवडी मोल आहे इतकेंच नमून ती फार घातक ही आहे आहे. देव परम दयाळू व निर्मळ आहे. त्याचें अनुकरण करण्यास मानवांनां तसें झालें पाहिजे.

या करितां मुलांनां नीतिशिक्षण दिलें पाहिजे व मुलांनां प्रेमानें कह्यांत ठेविलें पाहिजे, धाकानें नाहीं. मुलें सुखभावीं होण्यास होण्यास प्रमतेचा किती उपयोग होतो इकडे

दुर्लक्ष करणें म्हणजे, मानवी स्वभावाच्या मूल तत्वा विषयीं शुद्ध आपलें अज्ञान दाखविणें होय. मुलींच्या शिक्षणा संबंधानें तर ही गोष्ट विशेश लागू आहे. आपण जें कांहीं करूं तें मना पासून केलें पाहिजे हें मुलांस समजून दिलें पाहिजे. सत्कृत्यांचा व कर्तव्यांचा धर्माशीं काय संबंध आहे हें त्यांस समजून देऊन, त्यांच्या मनांत ईश्वरा विषयीं विचार उत्पन्न होतील अशी योजना केली पाहिजे.

ज्यांच्या हातीं शिक्षण देण्याचें महत्कृत्य आहे ते निश्चयी स्वभावाचे असले पाहिजेत. उतावळी आणि अनिश्चित स्वभावाचीं माणसें शिक्षकाच्या कामीं नालायक होत. शिक्षकानें निश्चयी पण ममताळू असलें पाहिजे. बक्षीस देण्याची आशा अथवा शिक्षा देण्याची धमकी एकदां दिली म्हणजे ती पुरी केलीच पाहिजे. ह्या कामीं हयगाय अथवा अनिश्चितपणा दाखविल्याचा परिणाम वाईट होतो. ज्याला आपण सुस्वभाव म्हणतों, त्याचा मुलें स्वाभाविक पणें दुरुपयोग करून घेतात. अशानें गैरशिस्त वर्तन केलें असतां शिक्षा देण्याचा जो आपण धाक घालूं त्यास न जुमानण्याची मुलांस संवय होते कारण मागील अनुभवा वरून मुलांची खात्री झालेली असते कीं शिक्षकानें आपणास घातलेल्या धाकाची अमलबजावणी होणार नाहीं. याचा परिणाम असा होईल कीं, मुलें आपली अवज्ञा करून गैरशिस्त वर्तन पुन्हा पुन्हा करतील, मात्र तसें करण्या विषयीं त्यांस कांहीं मोह उत्पन्न झाला पाहिजे. मुलांनीं आपल्या वडिलांच्या आणि शिक्षकांच्या आज्ञा अगदीं शिरसामान्य केल्या पाहिजेत. परंतु असा आज्ञा धारक पणा, मुलांना आज्ञा सारखा दुस्सह वाटूं नये म्हणून, तो प्रीतीनें आणि सदयतेनें सुसह केला पाहिजे. वडिलांच्या आज्ञा मुलांना वेदवचना प्रमाणें अनुल्लंघनीय असाव्या आणि अशी स्थिति ठेवण्यास वडीलांनी न्यायास व सत्यास पराङ्मुख न होण्यास जपलें पाहिजे. असें झालें म्हणजे मग वडिलांची आज्ञा मोडून आज्ञाभंगाचें प्रायश्चित भोगण्यास मुलांनां प्रयोजनच राहणार नाहीं. आपली आज्ञा मोडली असतां खरपूस शिक्षा केली जाईल असा धाक, घालण्या पेक्षां असें करण्याचा प्रसंग आला असतां आपल्यास फार वाईट वाटेल ही गोष्ट मुलांच्या मनावर ठसविली पाहिजे.

(पु० चा०)

---

# वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य २ शके १८१६

---

गेल्या तीस चाळीस वर्षांमध्यें या देशांत व्यापार व पत्रव्यवहार किती वाढले आहेत याची अटकळ पोस्ट खात्याच्या भरभराटी वरून चांगली होईल. पोस्ट आफिसा सारखें सर्वत्र व शृंखलेच्या परंपरेनें संकलित असें दुसरें खातें कोणतेंच नाहीं. अव्याहत, नियमित व नेमस्त अशी पोस्टल कामाची तारीफ आहे आणि या खात्याच्या मुळचा सर्व पृथ्वीभर व्यापलेल्या असल्यामुळें सर्व देशांतील लोकांनीं या खात्याचें कार्यबाहुल्य समजून घेऊन त्याच्या नमुन्या प्रमाणें स्वकीय व्यवहारांत दक्ष व व्यवस्थशीर होण्यास शिकावें. सांप्रत जीं सुधारलेलीं राष्ट्रें आहेत त्यांच्या इतिहासावरून पाहातां पोस्टल खातें हा सुधारणेच्या रथावरील अहणच आहे अशी मनाची खात्री पटेल. हिंदुस्थानांतील पोस्ट आफिसांच्या वार्षिक रिपोर्टावरून लक्षात येईल कीं सन १८९३-९४ सालांतल्या पोष्टाकडील सुव्यवस्थेनें व दळणवळणाच्या प्रसारानें मागील तीस चाळीस वर्षांस गुदस्त सालानें अगदीं मागें सारलें. गेल्या वार्षिक रिपोर्टांत काहीं गोष्टी ध्यानात ठेवण्या सारख्या आहेत त्या आह्मी संक्षेपानें खालीं दाखल करितों.

पोस्ट आफिसाच्या संबंधानें औध प्रांत निराळा होता त्याचा समावेश यापुढें वायव्य प्रांतात केला आहे. शहरातून व खेड्या पाड्यातून ज्या कलोक्याच्या पेट्या किंवा खाने असतात त्यामधून वेळच्या वेळीं पत्रें काढलीं जातींत आणि त्याचा योग्य तपास वारंवार होत जावा अशा हेतूनें एक निराळी योजना अमलांत आणिली आहे आणि तिचा उपयोग चांगला फलद्रूप होत आहे. मध्य प्रांतांत साऱ्याचे रुपये पोस्टा मार्फत सरकारांत भरण्याची पद्धती जारीनें चालूं आहे. क्विनाइन सारखें गुणकारी औषध बंगाल ब्रह्मदेश इत्यादि इलाख्यातुन पोस्ट आफिसात विकण्यास ठेवण्याचा सरकारनें प्रघात घातला आणि तोच सर्वत्र चालूं होईल असा अंदाज आहे. इंडियातील पोष्ट आफिसांचा संबंध बाह्य द्विपान्तरीं फार वाढला आहे. सिलोन, इटली, न्यूझीलंड, केपकालनी व आफ्रिकेंतील अन्य प्रदेश इत्यादिकां कडे मनिआरडरनें पैसे पाठविण्याच्या सोयी पुष्कळ झाल्या आहेत.

एकंदर पोष्ट आफिसें इंडियांत ८९७८ आणि ३२६०६२२१९ इतके लखोटे व कार्डें मिळून पत्रव्यवहार झाला आणि वर्तमानपत्रें ९६३६२७९३ इतकीं ग्राहकांस वाटण्यांत आलीं. वर्तमानपत्रांची संख्या देशाच्या विस्ताराच्या मानानें फार थोडी आहे आणि ही गुदस्त वाढली नसून थोडी कमीच आहे. सरासरीनें १८,३९,३४००८ इतक्या रकमेच्या ८७५४९४० मनी आरडरी धाडण्यात आल्या. पोस्टल व्यांकेंत ४,४०,७२,७५४ लोकांची खातीं असून एकंदर ठेवींची रकम सव्वा आठ कोट रुपये आहे. पोस्ट खात्याचें उत्पन्न दीड कोटी पावणे सहा लक्ष रुपये असून सुमारें उत्पन्नाच्या बरोबरीनें खर्च आहे.

हल्लीं इनसुअरन्स, मनिआरडर वगैरेंचे जे हाशिलीचे दर आहेत ते फार जबर आहेत. ते क्रमशः कमी करण्यांत येतील तर पोस्टल खात्याची अभिवृद्धी फार सत्वर व अप्रतिम होईल. जर्मनी सारख्या राष्ट्रांतल्या पोस्टाच्या सोयीच्या मानानें इंडियांत पुष्कळ मार्गांनीं सुधारणा व्हावयाच्या आहेत.

---

गेल्या कांग्रेसचे प्रेसिडेंट मि. वेब यांनीं रोवटचा निरोप घेते वेळीं जें भाषण केलें तें इतके कळकळीचें व शहाणपणाचें आहे कीं हिंदुस्थानची संपत्ति राजनिष्ठा वाजवी मागण्या इत्यादिकां विषयीं विलायतच्या लोकांचे ग्रह चांगले होण्यास व त्यांना खऱ्या स्थितीची माहिती होण्यास हें भाषण उत्तम साधन आहे. मि. वेब हे स्वतः ऐरिश असल्या मुळें त्याना राजनिष्ठ व हितकरू प्रजेच्या हक्काची पायमल्ली करणें, त्यांच्या वाजवी मागण्यांकडे सर्वथैव दुर्लक्ष करणें इत्यादि सरकारच्या जुलमी वर्तना पासून प्रजेचीं मनें कशीं कलुषित होतात व समाजाची भरभराट कशी कुंठित होते याची कल्पना आमच्या मानानें त्यांना थोडा तरी आहे. त्याचे भाषण फारच मुद्देसूद असल्यामुळें त्याचा सारांश येथें आम्ही सादर करितों:—

हिंदुस्थाना संबंधी बोलतांना ते म्हणाले कीं हिंदुस्थानचा कारभार हा मोठा महत्वाचा प्रश्न आहे. ह्या संबंधानें मोठ मोठ्या विद्वान व राजकारणी पुरुषां मध्येंहि फार मतभेद आढळतो. सर विल्यम वेडरबर्न, दादाभाई नवरोजी यांनीं जीं विधानें केलीं आहेत तीं टैम्प व सरचा॰ वेस्ती ह्यांच्या मताशीं अगदींच जुळत नाहीं. मी जे थोडे दिवस ह्या देशात घालविले त्या वरून मला येथील स्थितीची कल्पना करतां येते. हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्या विषयीं जें मी बोललों तेंच मला कायम ठेवावें लागतें. ऐर्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशात ब्रिटिश राज्याची स्थापना अशी झाली हें सांगण्यास माझें मन भितीनें कचरतें. परंतु त्या नंतरचा इतिहास मात्र दोन्ही देशांत निराळ्या तऱ्हेनें आढळतो. ह्या देशात ब्रिटिश राज्यानें विष्णू (संरक्षक) चा अवतार धारण केला. ऐर्लंड मध्यें शिवचा (नाशक) प्रभाव दाखविला. येथें त्यांनीं उभारणी केली व तेथें पाडापाड केली. राणीचें जुबिली साल ऐर्लंडमध्यें कोअर्सिव्ह (जुलुमी) अक्ट पास होऊन गाजलें गेलें. इकडे तोच प्रसंग फार आनंदाचा झाला.

सिव्हिल सर्व्हिसचे लोका संबंधानें त्यांचे मतांत कांहीं फरक झाला नाहीं. ह्या लोकां मध्यें हुशार, बुद्धिमान व मेहनती असे पुष्कळ आढळतात. परंतु त्यावरून हिंदुस्थानचा कारभार त्यांच्या वरच सोंपविला पाहिजे हा समज चुकीचा आहे. जरी ते लोक राज्यशकट हांकारण्या करितां जरूरीचे आहेत तरी ते हिंदुस्थानचे रहिवाशी नाहींत ही गोष्ट विसरूं नये त्यांची नोकरी हिंदुस्थाना सटीं आहे हिंदुस्थानचें अस्तित्व त्यांचे सठीं नाहीं. परकी अंमल कितीही उत्तम असला तरी तो एककिरण झाला. जनतेस्या कष्टमयच भासला पाहिजे माझे विचार ह्या बाबतींत इंग्लिश मनुष्यापेक्षा भिन्न असतील मी ब्रिटिश राज्याचा पूर्ण भक्त आहे व माझी भक्ति पुढें ही कायम राहील. परंतु मज सारखा ज्या ऐरिश लोकांस अनुभव आहे अशांस गत गोष्टी विसरण्यास व सद्यः स्थिती मध्येंच संतोष मानण्यास अद्यापि बराच वेळ गेला पाहिजे. आम्हाला आमचें कर्तव्य बजाविण्यास झटलें पाहिजे परंतु ब्रिटिश सत्ता व ब्रीद या संबंधानें 'आम्ही' असे शब्द योजणें पुढील प्रजेवरच सोंपविणें भाग पडतें. ज्या 'आम्ही' शब्दाची योजना माझ्यानें करवत नाहीं तो शब्द एका एतद्देशीय मार्गदर्शक (गाईड) नें योजल्या मुळें मला फार आश्चर्य वाटलें. मी मला तुमच्या पैकींच एक असें समजतों व माझ्या कर्तृत्व शक्ती प्रमाणें संधि प्राप्त झाली असता मी तुह्मास मदत करीन परंतु माझ्या खटपटींत तुह्मी निकळे आहां अशी कल्पना बिलकुल असणार नाहीं. अंग्लो इंडिअन्स संबंधानें साहेब मजकुराचे विचार फार मनन करण्या सारखे आहेत. त्यांचा त्यांनां जो अनुभव आला त्या वरून व त्यांच्या रोंखा वरून मि. वेब याची खात्री झाली आहे कीं इकडील साहेब लोकांनां त्यांच्या स्थितीचें महत्व कळलें नाहीं व ज्या लोकांशीं त्याचा विशेष निकट संबंध पडतो त्यांच्या संबंधानें ते बेपरवाईनें वागतात. अशाच तऱ्हेच्या ऐर्लंड मध्यें असलेल्या इंग्लिश लोकाच्या वर्तना मुळें तिकडे जे भयंकर परिणाम ओढवले आहेत त्या वरून इकडे ही संकटें उद्भवतील असें मला वाटतें. राज्यकर्त्यांच्या वर्गानें मर्चंट आफ व्हेनिसमध्यें जु आणि ख्रिश्चन याचीं इंद्रियें अवयवपरिमाण मनोविकार इत्यादि बाबतींत केलेली तुलना नेहमीं लक्ष्यांत ठेवली पाहिजे. जर एक मनुष्य दुसऱ्यास इजा करील तर त्या बद्दल सूड किंवा प्रतिकार त्यालाच भोगावा लागेल.

इंग्लिश लोक पुष्कळ गुणांनीं मंडित असता त्यांच्या मध्यें दुसऱ्या लोकां विषयीं बेपरवाई व निष्प्रेम बुद्धि हे अवगुण कां असावे हें मला कळत नाहीं. त्यांचा उद्देश स्तुत्य परंतु रीतभात निराळी असें ह्मणणें चुकीचें आहे. मानवी स्वभावांत बुद्धीलाच सर्व प्राधान्य नाहीं. मनोविकारांचाही त्या मध्यें बराच भरणा आहे. स्तुत्य हेतू देखील नीट रीतीनें प्रकट न केल्यास विफल होतात. इंग्लिश लोकांच्या अशा वर्तनाचें मला एकच स्पष्टीकरण सुचतें तें हेंच कीं त्यांना स्वदेशामध्यें पराजय होणें हें गेल्या ८०० वर्षांत माहींत नाहीं. असें जर नसतें तर दुसऱ्यांनां काय व कसें वाटतें याची कल्पना त्यांनां आली असती.

कित्येकाचें ह्या वर्तना संबंधानें असें ह्मणणें आहे कीं नेटिव्ह व इंग्लिश लोक यांच्या चाली रितींत बराच फरक असल्या मुळें त्यांचें संघट्टन व्हावें तसें होणार नाहीं. यावर उत्तर हेंच कीं इंग्लंड मध्येंही निरनिराळ्या धंद्याचे व दर्जाचे लोक हरएक कामा करितां मंडळ्या (क्लब) स्थापन करितात. परंतु त्या पासून पुष्कळ कुटुंबांतील दळणवळण वाढतें किंवा वाढलेंच पाहिजे असें नाहीं. मी लंडनमध्यें पार्लमेंन्टच्या ५ सेशन्स (बैठकी) साठीं राहिलों आहे. व पुष्कळ मंडळ्यांतून माझें जाणें येणेंही आहे. परंतु ५ पेक्षां अधिक सभासदांच्या कुटुंबांमध्यें माझा परिचय झाला आहे असें माझ्या अनुभवास आलें नाहीं.

सिव्हिल सरव्हंन्टसनीं हेंही लक्षांत वागविलें पाहिजे कीं राज्यप्रकरणांत पोकळ विचार करणें व विनाकारण कोटिक्रम लढविणें हें सोडून दिलें पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा आपल्या अनुभवा प्रमाणें साधक बाधक रितीनें विचार केला पाहिजे. १७८९ साल पेक्षां जग अधिक वयस्क शहाणें व व्यवस्थित झालें आहे. आपल्या वाडव

हिकांनीं अतिशय संकटें भरटें सासून जो अनुभव आपण साठीं जमवून ठवला आहे त्याचा आपण योग्य रितीनें फायदा करून घेतला पाहिजे. अमेरिकेंतील दक्षिण संस्थानें स्वतंत्र झाल्यावर ज्या घडल्या गोष्टी त्यांचा आपण फार बारकाईनें विचार केला पाहिजे. दक्षिण आफ्रिकेंतील गोऱ्या सुधारलेल्या लोकां पेक्षा तेथील रानटी लोक अधिक चांगले ठरले आहेत जेथें निवळ न्याय झाला तेथें पुष्कळ अनेक प्रकार वहतील असें जें पुष्कळांस वाटलें होतें तें खोटें आहे असें तिकडील सुधारणेच्या इतिहासात पत्ययास आलें. मनुष्याच्या हातून ज्या कृती घडण्या योग्य आहेत त्यावर राज्य कारणाचा फारच थोडा परिणाम होतो हें शिकण्या सारखें आहे. त्या कृती घडून येण्यास मुख्यतः मनुष्येच कारणभूत होतात.

कांग्रेस मधील एकेक ठराव घेऊन साहेब मजकुरांनीं त्यामध्यें केलेल्या नेमस्त मागण्या विषयीं बरीच तारीफ केली. त्यानीं इतिहासापासून काय शिकलें पाहिजे ह्याचें ही थोडक्यांत दिग्दर्शन केलें त्याचे मतें कांग्रेस सारखी मोठी संस्था प्रत्येक मनुष्यांच्या पसंतीस पडली पाहिजे. तिच्या भक्तांनीं आजपर्यंत ज्या रीतीनें ती चालविली जात आहे ती रीत मात्र सोडतां कामा नये. आज हजारो विद्यार्थी शाळा व कालेज या मधून इंग्रेज लोकांच्या इतिहासाचा अभ्यास करणार आहेत त्यांना आपले हक्क पाळण्याविषयीं व शिक्षणानुरूप अधिकाधिक ते मिळविण्या विषयीं इच्छा उत्पन्न व्हावी हें अगदीं साहजिक आहे साहेब मजकुरांनीं इतकेंच सांगून न मंडळीचा प्रेमपूर्वक शेवटचा निरोप घेऊन टाळ्यांच्या गजरांत खालीं बसले.

---

नामदार फेरोजशहा मेथा यांचे आम्ही त्रिवार धन्यवाद गातो. त्या एका विद्वन्मणीच्या तेजोराशीनें कायदे कौन्सिलांतील वादविवादांत निस्पृहता, दीर्घ परिशीलन, विषयाचें यथार्थ दर्शन इत्यादि बहुत सद्गुण चांगले प्रकाशित झाले आहेत. लोकमताचे प्रकाशक जरी संख्येनें थोडे आहेत तथापि नामदार फेरोजशहा मेथा यांचें अलौकिक वाक्कौशल्य, अप्रतिम विचारसामर्थ्य, व अद्वितीय सत्यवादित्व, हीं पाहून त्यांच्या अनुकरणानें व विचारस्वातंत्र्यानें या थोड्याच कौंसिलदारांनीं कौंसिलचा सरकारी शिष्टवर्ग हालवून सोडला आहे.

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY, 11, 1895

The good townspeople of Akot are to be congrtulated on the complete success they have achieved in being the first and foremost in the expression of joyous feelings towards our popular Commissioner and would-be Resident Colonel Mackenzie. His recently anounced elevation to the headship of the Government of Berar and to the highest representative position cf a first class political official in the premier Native State in India has given an unalloyed pleasure to all classes and races in the province. The appointment is the more welcome as it is given to few to rise from the omparatively low position in the Commission to its highest pinnacle Colonel Mackenzie is well known for his liberal and high minded policy in the administration of the province and it is a sincere pleasure that his long and prosperous career is vividly characterised by his being always on the side of the poor. The valedictory speech that was made at Akot is a fitting monument to his services in Berar and we would, though not altogether unmindful of his bureaucratic tendencies, subscribe to each and every word that was said in his honor. The speech runs as follows:—

"The people of Akot feel very grateful to your honour for paying a visit to this town practically on the eve of your departure to Hyderabad to assume the reins of the Government of this Porvince. On behalf of them we beg to approach your honor to bid you welcome both for ourselves personally and on their account.

It is a matter of sincere congratulation to every body in and associated with this province that a gentleman of your attainments and life long associations with varied experience in all the departments of administration and with a personal knowledge of all the local problems that await the decision of Government is called to the helm. You have watched the formation and growth of this province, seen the younger generation grow under the happy auspicies and under the beneficial influence of Educational and other institutions inaugurated by wise policy and your honour is therefore naturally in sympathy with the aspirations and the movements set on foot by the intelligent section of the community here. They, very properly, regard your elevation as a personal triumph and feel proud as Berarees that, for the first time in the history of this province they are to have a Resident who began his life in this province, and successfully and most deservedly has risen to the highest post that Government has in its power to give. They most sincerely trust that the sphere of your usefulness, so increased, will, under the nourishing care of Providence continue to widen still farther and they will have the benefit of your prolonged and supreme connection with the affairs of this province.

Of local matters we pray for permission to mention a permanent road between here and Telhara, and the erection of a bridge on the road leading from here to Akola to render the Purna always passable. This last project is just now, we hear, under your consideration, and we hope your decision will be entirely in accord with our wishes. The opening of Melghat has given rise to a new trade in wood and its route naturally lies through Akot to Akola. This in addition to the old cotton industry renders it imparatively necessary that the road between Akot and Akola should be as good as it can be rendered and the inconvenience of fording a large river like the Purna be at once removed.

Situate in the heart of an agricultural District with a population nearly 95 per cent of which is dependent on soil we naturally feel anxious about the Revenue operation of revised survey and assessment which has reached the neighbouring Taluka Balapur. It is believed that Government have settled the lines on which it is to be conducted and fixed the limit beyond which the assessment of any particular Taluk is not to be raised. But individual cases still remain and they will demand in some cases exceptional treatment. Rumour has it, and we know it to be true that your honour fought hard to secure low assessments for the people, and the present limit, whatever it may be, is a compromise between your merciful proposals and the hard demands of others. We feel exceedingly thankful to you for your honour's kind exertions on behalf of the agricultural classes and trust that the higher powers, now about to be devolved on you, will materially help to lighten the burden of peasants and so effectually put them beyong want as to remove all reasonable causes of their growing indebtedness.

Most of us may not have the opportunities of paying our respects to you before you leave for Hyderabad, so we take this opportunity of publicly congratulating your honour heartily on your most well earned promotion, and pray to God that kind Providence will give you health and strength to continue your kind offices to the Province for many years to come. We thank your honour for kindly accepting our invitation to this humble social function and beg to subscribe ourselves &."

Colonel Mackenzie expressed his heartfelt gratitude for the kindness of the people and showed himself to be in full sympathy with their wishes and demands though he was candid enough to admit his inability to give them due effect in consequence of financial difficulties. He however held forth hopes of a sure project of erecting a bridge over the Purna at Andura. One important fact which he dropped in his reply was that the dream of Amraoti—Ellichpur Railway will be shortly realized to the greatest delight of the people of the Eastern Berar.

## वऱ्हाड

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. याची चिफ्लेहाट क्लार्क आफ कोर्टच्या जागीं वाशीमास झाली होती परंतु तो हुकूम रद्द करून त्यांस एक्स्ट्रा असि० कमिशनरचे जागीं नेमल्याची सुवार्ता कर्णोपकर्णी ऐकूं येते. मे० कर्नल मेकेंझी दयेची खाण आहेत तेव्हा आपल्या हाता खालील गृहस्था ची पूर्व बढती त्यांच्या हातून कायम राहिली हें आनंदकारक होय.

रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे नायब तहशिलदार, मंगरूळपीर हे तीन महिन्यांच्या रजेवर मोंगलाईंत आपल्या चुलत्याकडे गेले आहेत.

पुढील सोमवार पासून अकोल्यास सेशन कोडताचें काम सुरूं होईल.

लेफ्टनंट हेग असि० कमिशनर यांस मुलकी कडील पाटील पटवाऱ्यांचे खटले चालविण्याचे डेपुटी कमिशनरचे अधिकार देण्यांत आले आहेत.

रा. रा. गणेश गोविंद, तहशीलदार, चिखली यांस पुढील २० वे तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

आणि त्या रजेंत रा० रा० शाहू दाजी नायब तहशिलदार यांस तहशिलदार नेमले.

'राष्ट्रोदय प्रवर्तक' नाटक मंडळीनें परवा रात्रीं 'बाजीराव व मस्तानी' हा प्रयोग करून दाखविला. ही मंडळी नवीन असून पत्रें होतकरू आहेत पण नाट्यशिक्षणाची उणीव मोठी आहे. व प्रत्येक दोन प्रवेशा मध्यें बहुत वेळ जातो तो नाट्यशास्त्रा विरुद्ध आहे.

रा. रा. पंडित सुरज नारायण असि० कमिशनर हे उमरावतीस येऊन आपलें काम पाहूं लागले.

मि० ग्यारेट लांड रेकार्डचे डायरेक्टर हे रजेवर जाऊन त्यांच्या रजेंत मि० हेग अ० कमिशनर यांस डायरेक्टर नेमिलें आहे.

मूर्तिजापुरास एक वेदशाळा स्थापित झाली आहे हें तेथील लोकांत भूषणास्पद होय.

येथील बिरार ट्रेडिंग कंपनीची वार्षिक सभा काल रोजीं भरली. या कंपनीची उत्तरोत्तर भरभराट होत आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

## वाशिम जिल्हा.

ता. ६-२-९५

हवामान:— सकाळीं थोडी थंडी पडते. दुपारी ऊन बरेंच भासतें. गहूं हरबरा वगैरे रब्बीची पिकें तयार होत आलीं आहेत. जिल्ह्यांत हिवतापाचे आजार सुरू आहेत.

आगमन— आमचे डे. कमिशनर साहेब खा. ब. शमसुद्दिन अलीखन हे दोन महिन्याचे रजेवर गेले होते ते तारीख ३ रोजीं वासीम येथें येऊन ता. ४ रोजी प्रातःकाळीं त्यानीं आपले कामाचा चार्ज घेतला.

सभा. ता. ३ रोजीं सायंकाळीं पांच वाजता वासीम येथें ज्युबिली टाऊन हाल्लांत नेटीव जनरल लायब्ररीच्या जनरल कमेटीची सभा भरली होती त्या वेळीं सन १८९४ सालचा वार्षिक रिपोर्ट पास होऊन १८९५ साला करितां म्यानेजिंग कमेटी, सेक्रेटरी व ट्रेझरर ह्यांच्या निवडणुकी झाल्या, असें समजतें.

हरास. ता. ४ व ता. ५ रोजीं वासीम जिल्ह्यांतील कलाली, अफु, गांजा व शिंदी ह्यांचे मक्त्याचे लिलाव झाले. त्याचें उत्पन्न पुढें दिले प्रमाणें झालें.

| | सन. १८९५ | सन. १८९४ |
|---|---|---|
| कलाली.... | ६१९०७ | ८०२०० |
| अफू .... | १२७५० | १४९०० |
| गांजा .... | ११२५ | १०२५ |
| शिंदी .... | ६६०० | ५७७५ |
| एकुन | ८२३७५ | १०३९०० |

ह्या साली २१५२५ गेले साला पेक्षां कमी आले. ह्या वरून लोकांजवळ दिवसें दिवस त्राण नाहींसा होत आहे, हें स्पष्ट दिसत आहे.

डिस्ट्रीक्ट बोर्डाची सभा ता, ११ फेब्रुवारी रोजीं आहे. वासीम म्युनिसिपालिटीची वार्षिक निवडणूक ता. ९ रोजीं आहे. पहिले वार्डांत दोन व तिसरे वार्डांत १ जागा रिकामी आहे. ह्या करितां पहिले वार्डांत ६ व तिसरे वार्डा करितां ३ उमदवाराचे अर्ज आले होते. परंतु ३ रे वार्डांत जे तीन अर्ज आले होते, त्यां पैकीं एक अर्ज नामंजूर झाला म्हणून समजतें. जो अर्ज नामंजूर झाला त्यास काय कारणें आहेत तें समजलें नाहीं. तरी ज्याचा अर्ज नामंजूर झाला त्यानें ह्या बद्दल आपला हक्क ( खरोखर असल्यास ) कायम राखण्याची योग्य तजवीज करावी.

ले. मारीस अ. क. ह्यांची स्वारी इंगोलीस मुकदमे चालविण्या करितां गेली आहे

मे. सुपरिन्टेंडींग इंजिनिअर ह्यांची स्वारी येथून तपासणी करून परत गेली.

मे. डे. ए. इन्स्पेक्टर साहेब हे एक-दोन दिवसांत पुसद तालुक्याकडे जाण्यास निघतील.

## वर्तमानसार.

म्हैसूरच्या महाराणीस मुलगा वयांत येई पर्यंत म्हैसूर कारभाराचें रीजंट नेमलें असून तिच्या सल्यानें कारभार चालेल. राज्यकारभारांत कांहीं विशेष फेरफार व्हावयाचा नाहीं असें ठरलें.

चीन व जपान यांची हल्लीं जी लढाई चालूं आहे त्यांत मूळ कोरियाचें राज्य असून तें राज्य चीनच्या ताब्यांतून काढून आपल्या ताब्यांत घेण्याचा जपानचा इरादा आहे हें प्रसिद्ध आहे, पण रशिया जपानास तसें करूं देण्यास तयार नाहीं. निशाणाच्या कामांत पटाइत अशी रशियाची सैबेरियन फौज त्यांत रशियानें युरोपांतून नवे आफीसर वगैरे पाठवून जास्त भरती केली आहे. वंदरकाठच्या छावण्यांत १९,६०० फौज आहे. लढाईच्या वेळची अमूर प्रांतांतली फौज ३१,३९० असून शांततेच्या वेळची २९,३४० आहे. एकादी लढाई सुरू झाल्यास त्या भागांत रशिया सहा महिन्याच्या आंत आपली ४०,००० फौज जमा करूं शकेल. त्या प्रांतांत रशियाची ही जी इतकी जंगी तयारी आहे त्यावरून चीन व जपान यांच्या चालूं लढाईंत शिरण्याचा रशियाचा निश्चय झालेला आहे. असें होतें. सैबेरियन फौज अगदीं वेळच्या तयारीनें आहे व त्यांतील रिझर्व फौजेस रजेवर न जाऊं देतां कामावरच ठेवलें आहे. इतकेंच नव्हे तर जे नवे लोक भरावयाचे तेही नियमाच्या दुपट भरले असून इतक्यांत ते शिकवून तयारही होतील. जपान कोरिया खालसा करूं लागेल तर अगर आपला ताबेदार करूं लागेल तरीही जपानच्या त्या करण्यास रशिया हरकत आणील. प्रशिया व जर्मनी यांस इतक्या तयारींत राहूं देण्यास २रा अलेक्झांडर झार याण सवड दिली ही चूक केवढी असें रशियांतील लोकांचें ह्मणणें आहे. एशियांत आपला शेजारी असा असणें रशियास आवडत नाहीं व त्याकरतां जपानासही इतका वरचढ होऊं देणार नाहीं. या बाबतींत इंग्लंड व रशिया यांच्यांत कांहीं करार मदार झाला असावा असेंहि अनुमान आहे. एकंदरींत आज त्या भागांत रशियाची २०,००० फौज सज्ज असून ती व इंग्लंडची फौज ही एकत्र झाली कीं, या चीन जपानी लढाईचा अमुक प्रकारें निकाल लावा असें ह्मणण्याचा इंग्लंड व रशिया यांस हक्क येईल. याकरितां जपानानें कितीहि लढाया मारल्या किंवा तो जरी पेकिनवरही गेला तरी आपणास दटावणारे आहेत असें त्यानें समजावें हेंच चांगलें आहे. इंग्रजसरकार रशियाचे अगदीं मित्र आहे अशी रशियन राजधानींतील लोकांची पक्की समजूत आहे.

हिंदुस्थानच्या दिवाणी कायद्यांतली जीं कांहीं कलमें अमलांत आणतां येण्यासारखीं नाहींत तीं त्या कायद्यांतून लवकरच काढून टाकण्याचा विचार आहे.

हिंदुस्थानांत खेचरे जास्त होतील अशी तजवीज सरकारानें करावी अशी कित्येक कामदारांची ओरड आहे. खेचर ही घोडा व गाढवांच्या मिश्रणाची जात आहे. घोड्या पेक्षां खेचराचा उपयोग भारी होतो.

चिनःहिल लोकांस बिनहत्यारी करण्याचें काम बिनतकरार चालू आहे. कित्येक हत्यारें सरकारच्या स्वाधीन झाली.

सीकीम व तिबेट यांच्या दरम्यानची सरहद्द कायम करण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. अ० द०

आश्चर्य! बंगाल प्रांतांत बारिशालकाला कटीकेवडा येथें एका वैद्याची स्त्री बाळंत झाली. तिला एक पिशाच झालें. त्याचा एक पाय बकऱ्यासारखा व दुसरा घोड्यासारखा होता. त्यानें बाळंत होतांच मेघगर्जने प्रमाणें आवाज केला. तो आवाज ऐकून ती स्त्री, आणि एक कुत्रा व एक मांजर मेली. पिशाच पळून गेलें, पण बाळंत झालेल्या जागेंत कोणी जाऊं शकत नाहीं असें ह्मणतात.

पंजाब, बिहार वगैरे प्रांताकडे धान्याची महर्गता होऊं लागली आहे.

दक्षिण अमेरिकेंतील अर्जेन्टाईन देशांत गहूं अतिशय पिकत असल्यामुळें, हिंदुस्थानच्या गव्हाच्या व्यापाराला जास्त मंदी येण्याचा संभव आहे. तितक्यांतून या देशानें तागाचीही उत्पत्ति चालविली आहे. यासाठीं हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांनीं फार लक्ष देऊन व्यापार केला पाहिजे.

ब्यारिस्टराची गंमत— रंगून येथें दोन ब्यारिस्टर, वाण्याचे पिठाचे पैसे न दिल्यामुळें खटल्यांत सांपडले होते, जागेचें भाडें न दिल्यामुळें तीन, दारूचे पैसे न दिल्यामुळें एक, खाणावळीचे पैसे न दिल्यामुळें एक आणि कांहीं नोकरांचा दरमहा न दिल्यामुळें तीन, असें दहा ब्यारिस्टर कोर्टांत ओढले गेल्याची बातमी आहे.

✓ खोकला, क्षय, व दमा यांस औषध.— अडुळशाचीं वाळलेलीं पानें, रिंगणमूळ, अक्कलकाढ्याचीं बोंडें, तिधारी निवडुंगाचें फूल हीं सर्व समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें. मद्यप प्रकृतीस दिवसांतून एक वेळ चवली भार मधांत द्यावें. व फारच प्रकृति बिघडली असल्यास सकाळ संध्याकाळीं देणें. दूध फार खाऊं नये. तेलगट, आंबट वगैरे हें वर्ज.

✓ कंवठाचें सरबत— इतर सरबतां प्रमाणें पिकलेल्या कंवठाचें हें सरबत करावें. याच्या योगानें जठराग्नी प्रदीप्त होतो. जीर्णत्वक दोषांस हें सरबत फायदेकारक होतें अंगांत भिनलेल्या गर्मीत कंवठ हें हितावह आहे.

✓ अंगांत भिनलेली गर्मी निघावयास.— सबज्याचें बी व मोंगली बेदाणा तोळा घेऊन तुपांत परतून दुधांत खीर करून खाणें. याप्रमाणें १४ दिवस करावें, ह्मणजे अंगांत भिनलेली गर्मी निघून जाते.

✓ आमांश अतिसारावर— वासनेवला (खडीवेली) ची मुळी पाण्यांत उगाळून दिवसांतून दोन वेळां तोळा तोळा घेत जावें.

✓ कुष्टास— भुईतरवड, कुडा, बाहवा, मुंढी, माका, निंबाचीं पंचांगें, कोष्ट, बावची, हीं समभाग घेऊन चूर्ण करावें व उष्णोदकाशीं घ्यावें. अष्टादश कुष्टें नासतील. दिवस ३०;(२) त्रिफळा, त्रिकटु चित्रक, मुस्ता, वावडींग, वचा, समभाग घेऊन चूर्ण करून ऊन पाण्याशीं १ तोळा रात्रीं घेणें, १८ कुष्टें नासतील- वळीपळीत जाईल. (३) वावडींग, चिफळा, चव्य, वचा, द्राक्षा, मंडूकी पिंपळी, चित्रक, शंखपुष्पी, बावची, माका, समभाग चूर्ण करावें. कांजींत वाटून अंगास लावावें. १८ कुष्टें नासतील. शि. वे.

गुदस्तसालीं सदर्न मराठा रेलवेचें उत्पन्न कमी झालें ह्मणतात. उतारूंची सोय न पहाणारी कंपनी नाहींशी होईल, तर आह्मांला कधींही वाईट वाटण्याचें नाहीं.

निजाम इलाख्यांत चांदीवर जबर करोडगिरी बसल्यामुळें तिकडे चांदी जाण्याचें मान कमी झालें आहे. व सोनें तेथून बाहेर प्रांतीं जातें. संस्थानिकांच्या निरभिमानाचा हा परिणाम होय असें संस्थानिक मिळाल्यावर देशोन्नति कसली होणार?

मुंबई व कलकत्ता यांच्या मधील रेलवेचें भाडें कमी करण्याचा विचार चालू आहे. बंगाल नागपूर रेलवेस बुडविण्याचा हा विचार आहे. अशी चढाओढ उभयतांचीही घात करितें, हें लक्षांत ठेऊन काय करणें तें करावें.

खाऱ्या मातीचा उपयोग परवानगीवांचून करूं नये, अशाबद्दल एक हुकूम सुटल्याचें कळतें. आमच्या लोकांस माती सुद्धां सरकार सुखानें वापरूं देत नाहीं. या अन्यायाला या दुष्टपणाला, या मनाच्या दुर्बलतेला या निर्दयतेला काय ह्मणावें?

लंडन येथील ब्रिटिश म्युझियममध्यें हल्लीं १७५०००० पुस्तकें आहेत. हिंदुस्थानांत इतकीं पुस्तकें एके ठिकाणीं मिळतील काय? वानवाच!

समुद्रांत पोलिप नांवाचा एक प्राणी आहे, तो मरण्यास फारच चिकट असतो. त्याला उभा अथवा कसाही चिरा, त्याचे अंगाचे ५१६ तुकडे हाल चाल करीत असतात. या सृष्टींत ईश्वरानें नानाप्रकारचे आश्चर्यजनक प्राणी उत्पन्न केले आहेत, यांचें हें एक प्रत्यंतर होय. व्या.

## सुहृत्समाजाचा वार्षिक समारंभ

सालाबाद प्रमाणें सुहृत्समाजाचा चवथा वार्षिक समारंभ चालूं फेब्रुवारी महिन्याच्या २८ वे तारखे पासून सुरू होऊन तारिख ३ मार्च रोजीं पुरा होईल. नेहमीं प्रमाणें व्याख्यानमालिका चार दिवस चालूं राहील. या वेळीं खालील सद्गृहस्थांनीं त्यांच्या नांवा समोर असलेल्या विषयांवर व्याख्यान देण्याचें अथवा लेख वाचण्याचें कबूल केलें आहे.

रा. रा. प्रल्हाद नारायण जोग— Ethics.

रा. रा. गोपाळ वामन बापट— फ्रेंच राज्यक्रांती पासून घेतां येण्या जोगा उपदेश.

रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले— मोरोपंतांचें मंत्ररामायण.

रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी— वेळेवर एखादा विषय घेतील.

या शिवाय समाजांतील सभासदां पैकीं:—

रा. रा. गोविंद नारायण काणे— Roman and Greek India.

रा. रा. गंगाधर नारायण घाटे— निद्रा आणि तिची मीमांसा.

रा. रा. बळवंत यादव खोलकुटे— आमचें शिक्षण.

हेही बोलणार आहेत. व्याख्यान विषय महत्वाचे असून वक्तेही बहुश्रुत आहेत तेव्हां प्रसंग मनोवेधक होईल यांत संशय नाहीं. व्याख्यानें उमरावती शहर लायब्ररी मध्यें होतील. सर्वांस येण्याची मोकळीक आहे.

B. Y. Kholkute,
अध्यक्ष सुहृत्समाज.

नमुना नंबर १४१

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं.

वर्ग सन १८९० चा आक्ट ८ कलम प्रमाणें:—

अर्जीचा नंबर १ सन १८९५ वर्ग १३ डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार सिताराम व अमृता अज्ञान पालन करणार आई भिमाबाई व लक्ष्मीबाई.

बापाचें नांव —उकर्डे

जात—मानभाव

राहणार वडनेरभुजंग

ता. एलिचपूर

वरील सीताराम व अमृता (अज्ञान) बापाचें नांव उकर्डा जात मानभाव राहणार वडणेर भुजंग तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर याणें (याचें पालन व माल मिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमला जावा ह्मणून) अर्ज दिला आहे. यास्तव, मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ६ माहे मार्च सन १८९५ इसवी रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टास हजर होऊन आपआपल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी. ता. २० माहे जानेवारी सन १८९५ इसवी.

H. Godwin Austen
offg. Deputy Commissioner
Ellichpur District.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेलवे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनोरी काचेचे सुदाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ........... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ....... ०।

Single copy........................ 4 as

Advertisement
Below 10 lines.. 2R
Per line over 10... 4 a
Repetition line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 18 FEBRUARY 1895 NO. 7

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १८ माहे फब्रुवारि सन १८९५ इ० अंक ७

ESTABLISHED IN 1880.
HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.
जी. बी. नाईक कंपनीच्या
जग प्रसिद्ध गुणावह.
विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टे वगैरे
प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोग पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ म.फ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातींचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस वऱ्हाड म्युनसिपल कायद्याप्रमाणें ठरविलें नियमांतील कलम ४७ प्रमाणें या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं ज्या ज्या ठिकाणीं पाण्याचें नळ बसविले आहेत त्या त्या ठिकाणीं कोणीं स्नान करूं नये व भांडीं घासूनयेत व धुणेंही धुवूनये वरील गोष्टी कोणी केल्यास त्याजवर म्युनसिपल कायद्याचें कलम १३८ प्रमाणें मुकदमा केला जाईल कळावें तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १८९५ ईसवी.

Md. Husain.
Secretary.
M. C. Akola.

## जाहिर खबर

या खालीं सही करणार याज कडून सर्व लोकांस कळविलें जातें कीं, मुक्की मर्द महादु निलखण रहाणार शिरलें तालुके बळापूर. ही माझी साक्षांत चुलत बंधुची बायको असून तिचे नावें शिरलें तालुके बाळापूर येथील शेत सर्व्हे नंबर १०६ पैकीं एकर ०८०२४ आकार रुपये १० चें आहे. हें शेत वडिलार्जित असोन याचा मालक मी आहे हें आणि राहण्याचें घर सदरील मुक्की ही विकून दुसरा घरठाव करण्याचें बेतात आहे या साठीं कळविलें जातें कीं, ही मिळकत कोणीं कोणतेही रीतीनें घेऊं नये. या साठीं अगाऊं कळविलें आहे. या विरुद्ध झाल्यास कायदेशीर रीतीनें त्याजवर जोखीम राहील कळावें तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी.

( सही )
निशाणी ह्मसाजी वल्लद कृष्णाजी
निलखण रहाणार शिरलें
याची असे.

## मुलांचा शिक्षण क्रम

( मागील अंकावरून पुढें चालूं )

वरील विवेचनावरून शिक्षा देण्यासंबंधी मुद्दा निघाल्यामुळें त्या विषयीं आपल्याला विचार केला पाहिजे. शिक्षा देतांना लक्षांत ठेवण्याची मुख्य महत्वाची गोष्ट ही आहे कीं, अपराध केला असतां मुलास जी शिक्षा देण्याची ती, फक्त त्याची सुधारणा होण्यास्तवच, देण्याची आहे. मुलांना चांगला धडा लागावा येवढ्याच करितां जर, त्यांना शिक्षा केली पाहिजे असें आहे तर, तिजपासून अपराध करणाऱ्यास जितकें दुःख होईल तितकेंच दुःख शिक्षा देणारासही झालें पाहिजे. रागाला वश होऊन अथवा पक्षपात करून शिक्षा देण्याची नाहीं, हें आतां येथें सांगण्याची जरूर राहिली नाहीं. आपल्याला शिक्षा करण्याची शिक्षकास आवड नसून, उलट तसें करण्यापासून त्यास दुःख होतें हें मुलांच्या मनांत अवश्य भरलें पाहिजे त्याना असें समजून आलें पाहिजे कीं, गैरशिस्त वर्तन केलें असतां अथवा आज्ञा मोडली असतां आपल्यास शिक्षा तर होईलच, परंतु अशा प्रसंगीं कराव्या लागलेल्या शिक्षेपासून वडिलांस फार दुःख होईल. क्षुल्लक चुकीला सरेसर तो मार मिळेल असा त्यांचा ग्रह होऊं देऊं नये. शिक्षा नेहमीं अपराधाच्या मानानें असावी आणि ती देण्यापूर्वी अमक्यानेंच अपराध केला आहे अशी पक्की खात्री करून घ्यावी. आपल्याला विनाकारण फार जबर शिक्षा झाली असें मुलांस दिसून आलें ह्मणजे वडिलांवरील त्यांची असलेली पूज्यबुद्धि कमी होते. असा प्रकार नेहमीं घडतांना आपण पाहतों आणि त्याचे परिणामही फार वाईट झालेले दिसून येतात. वडीलांच्या अन्यायी वर्तनाबद्दल व निष्कारण कडकपणाबद्दल मुलें, आपल्या मनांत त्यांस दोष देत असतात. ज्या अंतःकरणांत प्रेम व पूज्यबुद्धि असावी, त्या अंतःकरणांत वडिलांविषयीं द्वेष आणि आपल्यावर विनाकारण जुलूम होतो अशी भावना उत्पन्न होते. त्यांच्या मनाची हीच स्थिति कायम राहिली ह्मणजे तीं अविचारी हट्टी आणि बंड निघतात. एका तत्ववेत्त्याचें ह्मणणें आहे कीं शारीरिक शिक्षा अगदीं देऊं नये. होय शारीरिक शिक्षा देण्याचा परिणाम शिक्षण क्रमांत हितावह होणार नाहीं तिजपासून मुलांना स्वतःच्या अप्रतिष्टे बद्दल पुढें पुढें कांहीं वाटेनासे होऊन, ती निबरघट्ट व खुनशी बनतात. "लालनात् बहवो दोषा स्ताडनात् व हवो गुणः" ह्या मतांच्या लोकांचें म्हणणे कीं मुलांना ताळ्यावर आणण्यास व त्यांस आज्ञा धारक बनविण्यास शारीरीक शिक्षे शिवाय इतर शिक्षेचा चांगलासा उपयोग होत नाहीं. परंतु हें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं. शारीरिक शिक्षेच्या परिणामापेक्षां ज्यास्त कडक परिणाम होईल असे दुसरे शिक्षेचे पुष्कळ प्रकार आहेत. एखाद्या योजक शिक्षकाला, कोणत्याही गोष्टीचा उपयोग, शिक्षे दाखल अथवा बक्षीस दाखल करतां येईल. इतकेंच नाहीं. तर शिक्षकाला आपल्या एकाच वर्तनाचा प्रसंगानुरोधानें तसा उपयोग करतां येईल. मुलांना खाऊं देणें, खेळण्याच्या जिनसा देणें, सणावाराचे दिवशीं कांहीं विशेष करूं देण्याची परवानगी देणें, इत्यादि ज्या गोष्टी आहेत त्या त्यास न करूं दिल्या म्हणजे मारण्याचा जितका परिणाम होईल तितकाच परिणाम ह्यांचा ही होईल. असें करण्यांत हा एक फायदा आहे कीं मारण्याचे जे कांहीं वाईट परिणाम मनावर होतात ते टळतील. पुष्कळजण मुलांना सुधारण्याचें काम निराशेनें सोडून देतात परंतु असें निराश होऊं नये सुधारणा करण्याचा कार्यमार्ग जर एके प्रकारच्या शिक्षेनें होणार नाहीं तर, दुसरा प्रकार योजावा मनुष्याच्या मनावर दुर्गुणाचा

किताही पगडा बसलेला असो तरी, फटक्याचा आणि माराचा उपयोग करण्यापेक्षां, दया आणि उपदेश ह्यांचा उपयोग केला असतां, अधिक फायदेशीर होणार आहे. आपल्या मुलांच्या दिवसं दिवस वाढत जाणाऱ्या दुष्ट मनो विकारांस ज्यास आळा घालतां येणार नाहीं, त्यांनीं शिक्षण देण्याचा ज्या दिशेनें क्रम ठेविला आहे, ती खास चुकीची आहे, असें समजलें पाहिजे.

वाडिलांनीं आणि शिक्षकांनीं शिक्षण देण्याच्या कामीं जे नियम आहेत, त्यां पैकीं ज्या नियमाकडे त्यांनीं फार लक्ष दिलें पाहिजे तो हा आहे कीं, मुलांच्या वर्तनांत यत्किंचितही कपटाचा भाग दिसून अल्यास तिकडे हल्लीं एक मुख्य दुर्गुण होऊन बसला आहे. मुलांच्या मनांत ह्या दुर्गुणाचें बीजारोपण होऊं देऊं नये. दृष्टीस न आलेले पहिल कपट, आणि दृष्टीस न येतां शिक्षे विरहित राहिलेली पहिली लबाडी मुलें पुनः पुनः करतील असं झाल्यानें जगांतील एका अत्यंत निंदास्पद दुर्गुणाचा पगडा मुलांच्या मनावर बसेल. सौम्य शद्बानें ह्या दुर्गुणाचा हलकटपणा, खोटेपणा आणि दुष्टपणा उत्तम रीतीनें त्यांना दाखवून द्या; आणि असा अपराध करणाऱ्या मुलानें आपला अपराध मोकळेपणानें कबूल केला असतां त्यास माफी मिळेल असें आश्वासन द्या. हरएक प्रसंगीं खरें बोलण्याबद्दल त्यास उपदेश करा. क्षुल्लक अपराध लबाडीनें छपविण्याचा यत्न केला असतां द्विगुणित पाप लागतें असें त्यांस वाटायास लावा. आपलीं पापें कबूल केलीं असतांच देव क्षमा करील असें त्यांना शिकवा.

[ पुढें चालेल ]

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ९ शके १८१६

वऱ्हाडांत प्रथम ट्रेडिंग कंपनीचि कल्पना आकोल्यास निघाली. आणि येथील ट्रेडिंग कंपनीच्या पद्धतीवर इतर जिल्ह्याच्या सदर ठिकाणीं दुसऱ्या मंडळ्या निघाल्या. हल्लींच्या या कंपन्यांच्या स्थितीवरून या चांगल्या चालतात असें निदर्शनास आलें आहे आणि अशा दुकानापासून गिऱ्हाइकांस माल योग्य व ठरीव किंमतीला मिळतो व फसवणूक होण्याचा संभव बिलकूल नसतो. चोख, व्यवस्थेशीर व प्रामाणिकपणानें ज्या कंपन्यांचीं कामें चालतात त्या बिनघोक चालतात; पण ज्या दुकानांत गैरशिस्तपणा व बेभरंवसा एकदां उत्पन्न झाला तीं काळचक्राच्या तडाख्यांत समूळ बुडालीं आहेत. कोणत्याही दुकानदारींत सोज्वळ व्यवहार शहाजोग गिऱ्हाइकांशीं होतो तेथें बुडण्याचा संभव नसतो. आकोला, उमरावती, खामगांव वगैरे ठिकाणचे सावकार कच्चे पडले व वारंवार दिवाळीं काढतात कारण धंदे सच्यामुळें सोहतीच्या स्वरूपाचे असून आपल्या आटोक्याच्या बाहेर उठाठेवी करूं लागले आणि द्विपान्तरीं कापूस व धान्य यांचा व्यापार या देशासंबधानें फिका पडल्या कारणानें मुख्य मुख्य पेठा सुस्त व बेरोजगारी होत चालल्या आहेत. आह्मी वर ज्या बिरार ट्रेडिंग कंपनीला उद्देशून लिहिल तिचा व्यापार कपडालत्याचा असून अगदीं सरळ व माफक आहे. व्यापार कसा करावा हें या कंपनीच्या लेटेखानी इतिहासावरून लक्षात येईल. ही कंपनी इतर कंपन्यां प्रमाणें सामान्य आहे पण मध्यंतरीं गेल्या सात वर्षापूर्वीं ही कंपनी राम ह्मणण्याच्या बेतांत होती परंतु कांहीं मंडळीच्या खटपटीनें ती पुन्हा सुयंत्र चालूं लागली. साराश इतकाच कीं दुकानदारी बुडण्याची कारणें जेव्हां दूरदर्शी सभासदांनीं दूर केलीं तेव्हां त्या दुकानच्या सुदीनाला आरंभ झाला. आणि आह्मास कळविण्यास आनंद वाटतो कीं येथील कंपनीचीं दुसरी दुकान शाखा पेठेंत स्थापण्या विषयीं बोर्ड आफ डायरेक्टर्स पैकीं रा. रा. मुकूंद बाळकृष्ण व जयराम बळवंत तळेकर यांच्या सूचनेवरून पुढील वर्षा करितां ठराव झाला आहे. या कंपनीचें भांडवल १० हजार असून गेल्या वर्षीं नफा ६७३८५८३ झाला हें विशेष चांगलें आहे.

मुंबईचे गव्हरनर लार्ड हारिस हे गेल्या शनिवारीं निजगृहास चालते झाले. यांची पंच वार्षिकी कारकीर्द चांगली किंवा वाईट झाली अशा नकल तिकडे मतभेदानें दोन पेठे तट पडले आहेत. त्याचे जात भाई अर्थात त्यांचा नामघोष मोठ्यां आनंदानें करित आहेत आणि आमच्या नेटिवा पैकीं कांहीं राजेरजवाडे, पार्शी मुसलमान व हिंदु लोक वरील नामसंकीर्तनांत मेजवान्यांत व खेळण्यांत नाचत बागडत आहेत तेव्हां लार्ड हारिस यांची कारकीर्द वाईट होती असें ह्मणण्याची कोणाची छाती झाली नसती. परंतु लार्ड साहेबांनीं दक्षिणेंतील हिंदु लोकांवर जो अपशद्बांचा वर्षाव केला तो लोकांच्या मनांतून काडीमात्र जाण्या सारखा नाहीं, आणि या क्रिकेट–पटु हारिस साहेबांनीं जातां जातां पुण्याच्या सार्वजनिक सभेला जो खोडसाळपणाचा जबाब दिला तो साहेब महसूफांच्या कारकीर्दीच्या दोषांचा प्रतिध्वनिच आहे. मुंबई इलाख्यांतील वर्त्तमान पत्रांतून आणि मुख्यत्वें करून ‘ केसरी ’ पत्रांतून लार्ड हारिस साहेबांची आरती केली आहे ती यथास्थित आहे आणि तेंच खरें लोकमत आहे. असो, एकदां शनि पालटला हें कालमाहिम्यानें उत्तम झालें.

लार्ड हारिसच्या पद्धतीचे अधिकारी आमच्या प्रांतीं नाहींत असें नाहीं. परंतु त्यांच्या राज्यांतलीं सुखदुःखें वर्णन करण्यास समर्थ असें लोकमत अद्याप प्रचलित नाहीं आणि त्या कारणानें हाजी हाजी करणाऱ्यांचा हल्लीं चलतीचा दिवस आहे. पण कालान्तरानें शिक्षणाच्या प्रसारा मुळें हा मनु सत्वर बदलेल अशी उमेद आहे.

हल्लीं वऱ्हाडांतील कोर्टांतून जीं नकलनवीसांचीं खातीं आहेत त्यांच्या संबधानें वरिष्ठ अधिकाऱ्यांचा फार बारकाईचा शोध चालला असतो. या चौकशीच इत्यर्थ इतकाच कीं कांहीं तरी नवीन भानगडी व अडचणी नक्कलखात्यांत उत्पन्न करून तेथील कारकुनांस स्वतांचें काम सोडण्याच्या परिणामाला पोंचवावें. नक्कल कारकुनानें दिवसांतून अमुक शद्ब लिहिलेच पाहिजेत आणि तसें घडलें नाहीं तर त्याचा तो रोज खरा नाहीं. कांहीं कांहीं अधिकारी इतके क्षुद्रदृष्टी असतात कीं त्यांच्या अनुदार वर्तनाला सीमाच नाहीं आणि सांपत त्या खात्याच्या सुस्थिती वरून आह्मास या व्यर्थ खटाटोपीचें प्रयोजनही दिसत नाहीं.

प्रथम, या खात्याचें उत्पन्न सालोसाल वाढत आहे आणि हजारो रुपये सरकारच्या तिजोरींत या खात्याचे शिल्लक आहे. सालिना जें उत्पन्न होतें त्याच्यातून सर्व खात्याचा खर्च भागला जाऊन पुष्कळ पैसा जमेंत राहतो. या खात्यांत नवीन लोकांची भरती कामाच्या जरूरी प्रमाणें पाहिजे तितकी देखील होत नाहीं. आणि उलट त्यांत विनाकारण काटकसर करण्याची चालच पडली आहे. नक्कलखातें ह्मणजे बिनवारशीं खातें असून त्याला कोणी वाली नसतो. मे० आबडे साहेब जुडिशियल कमिशनर होते तेव्हां या खात्यांत अधिक लोक ठेवण्या संबधानें व्यवस्था चालली होती पण त्या सर्व तजविजी बाजूस पडल्या आणि असें ठरलें कीं प्रत्येक कारकुनानें प्रत्येक दिवशीं पंधराशे शब्द तरी निदान लिहिले पाहिजेत. पण हा नियम करिते वेळीं असा कोणी विचार केला नाहीं कीं कांहीं अधिकाऱ्यांची लेखनपद्धति दुर्बोध व अवघड असते तेव्हां असे लेख वाचून नंतर नक्कल करणें ह्मणजे मोठ्या प्रयासाचें काम असतें. ज्यावेळीं शब्दाच्या संख्ये बद्दल नियम झाला त्यावेळीं ह्या यकोर्टा मार्फत अशी ताकीद निघाली पाहिजे होती कीं अधिकाऱ्यांनीं आपले लेख सुवाच्य, स्पष्ट व मोकळे मोकळे लिहावेत परंतु असा नियम होणें मोठें कठीण होतें तेव्हां देवोदुर्बल घातकः या नांवानें फक्त नक्कल खात्यावर मात्र वक्रदृष्टी झालेली आहे. आमच्या मतें या खात्यांच्या उत्पन्नाच्या मानानें नक्कल कारकुनाच्या नोकऱ्या पेनशनांत दाखल कराव्यात किंवा नक्कल फीचे दर कमी करावेत. या सूचना वरिष्ट अधिकारी लक्ष्यांत घेतील अशी आह्मी उमेद धरितों. पण त्या अर्थीं हल्लींचे फीचे दर भारी असल्या विषयीं ओरड नाहीं त्या अर्थीं नक्कल कारकुनास पेनशनें मिळण्याची कांहीं व्यवस्था सरकारांतून झाली ह्मणजे चांगले हुषार लोक या खात्यांत अधिक काल राहतील व खात्याची उत्तम सुधारणा होईल.

खामगांव व जळगांव या तालुक्यांतून जमिनीचे घारे वाढविल्या विषयीं लोकांस ताकिद होत आहेत. आणि नवीन साऱ्याचे दर फार जबर ठेविले आहेत ह्मणून शेतकरी लोक अगदीं हवालदील व चिंताग्रस्त आहेत आणि ते मोठ्या आशेनें आह्मास विचारतात कीं आकोल्यास जी जाहिरसभा भरली तिनें काय केलें व पुढें काय झालें. खरोखर आह्मी देखील या प्रश्नाचा जबाब देण्यास असमर्थ आहों तेव्हां लोकांच्या वतीनें आह्मी सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीस विनंती करितों कीं त्यांनीं आपल्या जवळील आज तागाईतची बातमी लोकांस जाहिर करावी ह्मणजे लोकांच्या शंका थोड्या बहुत तरी दूर होतील.

आकोल्याच्या मुनसिपल सभासदांच्या सात जागा मंगळवार, बुधवार व गुरुवार मिळून तीन दिवसांत भरल्या जाणार आहेत यंदा निवडानिवड होतांना कांहीं चळवळ उठेल असें बिलकूल वाटत नाहीं. एकंदर जागा सात आहेत व उमेदवारांची संख्या आठ आहे. तेव्हां निवडा निवडीची कांहीं मौज दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं. जे सहा लोक फेरपाळीनें निघाले तेच पुन्हा उमेदवारांत आहेत आणि एक जागा रा. रा. रघुनाथ बळवंत यांच्या बदलीमुळें रिकामी पडली होती तीही याच वेळीं भरली जाणार आहे. नवीन दोन गृहस्थ सार्वजनिक व स्थानिक कारभार चालविण्यास मदत करण्यासाठीं उमेदवार ह्मणून आले आहेत ते मि० सेखअबदूल अजीज अकोल्याचे नायब तहसीलदार, व रा. रा. वामन नारायण काळे हे आहेत. उभयता गृहस्थ आमच्या ओळखीचे आणि ते लोककार्याला पुढें आले आहेत ह्मणून आह्मी त्यांचें अभिनंदन करितों. यंदाच्या निवडानिवडीला उमेदवार थोडे आहेत हें पाहिलें ह्मणजे वरवरच्या पाहुणाऱ्यांस येथील लोकांत सार्वजनिक कामाविषयीं उत्सुकता नसते असें वाटेल आणि तें कांहीं अगदीं खोटेंही नाहीं. पण दुःखांत सुख एवढेंच कीं जे लोक सभासद होते आणि पुन्हा उमेदवार झाले आहेत त्यांच्या अंगीं एका प्रकारची धमक, उत्तम कर्तबगारी, व अतुल उल्हासवृत्ति आहे हें निराळें कळवायाला नको. आह्मांस मोठी उमेद आहे कीं मताधिकारी लोक जुन्या उमेदवारांस आपापल्या मतप्रकाशानानें संतोषवितील व त्यांच्या पूर्वीं झालेल्या चांगल्या कामा बद्दल त्यांचे उतराई होतील.

इंडियांतील कायदे कौंसिलें सुधारण्याच्या निमित्तानें १८९२ सालीं नवा कायदा झाला आणि त्याच्या दोनच वर्षांच्या अंमलबजावणीनें अद्भुत व चमत्कारिक गोष्टी घडून येत चालल्या आहेत. नव्या कायद्या अन्वयें लोकनियुक्त प्रतिनिधीस कायदे कौंसिलदार नेमणें किंवा न नेमणें सरकारच्या खुषीवर ठेविलें आहे आणि अशा प्रतिनिधींची संख्या देखील अगदीं नियमित व स्वल्प आहे व त्यामुळें सरकार मार्फत बनलेला कौंसिलदारांचा अधिकारी–वर्ग नेहमीं बहुमतानें आपल्याच सूचना पसार करूं शकतो. प्रतिनिधितत्वाला किंचित मान देण्याचा नव्या कायद्यानें जो थोडा प्रयत्न झाला त्या योगानें लोकमताचा कायदे कौन्सिलांत अद्याप विजय झाला नाहींच परंतु लोकमताचें विडंबन विचारपूर्वक होत गेल्यानें सरकारची पातशाही सुलतानगिरी अगदीं स्पष्टपणें लोकदृष्टीस पडूं लागली आहे.

**The Berar Samachar**

MONDAY FEBRUARY, 18, 1895

In the Imperial Legislative Council, the Police Act V of 1861

is receiving important amendments. The bill has been well criticized through the press and in the Council itself before it went to the Select Committee. The main change in the Act invests the District Magistrate in his executive capacity with the extraordinary powers to impose heavy fines on individual persons on proof of their contributing to or causing a public disturbance or riot. It is this executive power which is the most reprensible principle in the bill. The true nature of the present amendment is very eloquently expressed by the Honorable Mr. P. M. Mehta in the following memorable words:—

"I cannot conceive of legislation more emperical, more retrograde, more open to abuse or more demoralizing. It is impossible not to see that it is a piece of that emperical legislation so dear to the heart of executive officers, which will not and cannot recognize the scientific fact that the punishment and suppression of crime without injuring or oppressing innocence must be controlled by judicial procedure and cannot be safely left to be adjudged upon the opinions and moral certainties of men believing themselves to be capable, honest and conscientious. The British rule has trained the people of this country to the conception of law, and it has been a matter of just pride that the highest justification of that rule consists in its steady administration of justice in judicial form. I venture to say that nothing can be more unfortunate and impolitic than to depart from a policy so bound up with the good name and credit of the English Government. Empirical and retrograde as it is, this new proposed legislation would be no less demoralizing to the executive officers concerned."

District Magistrates are most likely to be baised in disturbed localities by the false reports and assumptions and misguiding notions of their subordinates. The probabilities are 99 to 1 in favour of a signal miscarriage of justice. We do not question their capacity, judgment and wisdom but with all that, they move in a sphere the contamination of which they will not drive away by all human efforts. Even if they succeed in the right direction the chances are to create in the amendment an engine of oppression, tyranny and despotism.

By the by we are glad to say that Mr. R. Obbard's opinion on the subject in dispute has been quoted with approval and gladness. He is the only gentleman in the judicial line whose straightforwardness, convictions and legal acumen command our respect and admiration. He is noble in his mind and quite free from the bureaucratic influences of the officialdom. Whatever he writes reflects a good deal of his firm and sure grasp of the subject. We take down the next piece from the speech of the honourable gentleman:—

"The Civil and Sessions Judge of the Hyderabad Assigned Districts, Mr. Obbard, points out that, 'if the guilty only are to be charged, their guilt should be established by some sort of public enquiry at which parties should be represented and witnesses heard, and that the grounds of the order should be such and supported by such evidence as to satisfy the public that the differentiation had been fairly made'. The comment of the Resident of Hyderabad on this opinion is instructive, for I believe it represests the gloss by which the real character of the proposed legislation is sought to be disguised.

'The Magistrate's decision,' says the Resident, 'affirming payment by certain persons only, determines the question of their liability to pay a certain tax; it does not purport to convict them of any offence."

In these legislative efforts of the Council to put down all attempts to disturb and break a Government the Government has undertaken a very harsh measure which lacks the preserving principle of calm discrimination, tact, and sympathetic treatment.

---

In the court of discussions over the recent Tariff Act, the President of the Council observed that the mandates of the Secretary of State should be given priority over every piece of legislation. But the theory was overthrown by the Honorable Mr. Mehta on the following argument:—

'So far as the natives of this country are concerned, we must take care not to be carried away by the bait of so tempting a phrase as Home rule. Home rule to us, for a long time to come, can only mean the substitution of the rule of the Anglo-Indian bureaucracy for that of the House of Commons and the Secretary of State as controlled by it. Under either rule the country cannot always be safe against the occasional attacks of powerful interests, but after all it is safer to rest upon the ultimate sense of justice and righteousness of the whole English people, which in the end always asserts its nobility, than upon the uncontrolled tendencies of an officialdom trained in bureaucratic tendeneies, and not free from the demoralising prejudices incident to their position in the country.

There is nothing in its creative statutes or in the declarations of intention and policy surrounding them to justify the supposition that this Council was designed to be a deliberative body without the power or freedom of deliberation, or of carrying that deliberation into effect. The remedies and safeguards against both paralysis of legislation on the one hand, and of mischievous activity on the other, have not been provided by making it impotent for all free or deliberative action; but they have been carefully constructed in other ways. Against paralysis of legislation the right of Parliament to continue to legislate for India is unreservedly retained; and there is, besides, a power given to the Viceroy to meet cases of urgency by the promulgation of ordinances having the force of law."

## वऱ्हाड

हवामान— हल्लीं हवा अगदीं बिघडली आहे. थंडी मधून मधून पडते, आकाशांत ढग वारंवार येतात व उष्माही पुष्कळ होतो गांवांत किरकोळ दुखणीं व ताप वगैरे फार बळावले आहेत. मध्यंतरीं थोडा पाऊस पडला.

---

वडनेरा कोडताचे जज्य मि० आंग्रेडी एक्स्ट्रा असि० क० हे सहा महिन्यांचे रजेवर जाणार आहेत.

---

बुलढाणा व वाशिम या दोन जिल्ह्यांस मिळून एका नव्या सबडेपुटी इनस्पेक्टरची जागा रावसाहेब पटवर्धन यांच्या सूचनेवरून आलिशान रेसिडेन्ट यांनीं मंजूर केली.

---

मलकापूर ता० १६-२-९५ इ.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस.

वि० वि० यंदाचा वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज खामगांव ता. येथें ११-१२ माहे मार्च सोमवार व मंगळवार या दिवशीं भरणार असल्याचें वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे व या मजकुराच्या निमंत्रण चिठ्याही वाटल्या गेल्या आहेत. पण वऱ्हाड शाळा पत्रकांतून प्रसिद्ध झालेल्या शाळाखात्याच्या सुच्यांवरून दिसतें कीं शाळांना फक्त सोमवारींच सुट्टी आहे ह्मणून स्कूल मास्तरांना समाजास येण्यास अडचण पडेल व सर्वांनाच एकेवेळीं रजा मिळेल हेंही संभवत नाहीं. समाजाच्या एकंदर समासदांमध्यें स्कूल मास्तरांची संख्या इतर सर्व खात्यांतील सभासदांपेक्षां जास्त नसली तरी पण फारशी कमी नाहीं. तेव्हां इतक्या लोकांच्या गैरसोयींचा नीट विचार न करणें हें न्यायाचें होईलसें वाटत नाहीं ह्मणून समाजाचे सेक्रेटरीला माझी सूचना आहे कीं शाळा खात्याच्या अधिकाऱ्यांकडून मंगळवारची सुट्टी घेण्याचें शक्य असेल तर तसें करावें. नाहीं तर समाजाचे दिवस सर्वांच्या सोयींकरितां रविवार व सोमवार ह्मणजे ता० १०-११ हे नेमावे.

व० हा० समाजाचा एक मेंबर,

---

नोटीस

रा. रा. सुरजमल मनसुखदास मारवाडी दुकान तळेगांव तालुके आकोट व मुखत्यार वल्लद पामाजी राउत राहणार पिंवदळ बुजरूख तालुके अकोट या उभयतास नोटीस देणार तुकाराम वा। उदेभान पाटील राहणार घुसर नोटिसीनें असे कळवितो कीं तुह्मी उभयतानी ता. १९ माहे ज्यानेवारी सन १८९१ इसवी रोजीं बुनकाई मर्द रामजी टाकळे राहणार घुसर इजकडून शेत सरवई नंबर ३२७ एकर २४०१८ गुंठे आकार रुपये ४० चाळीसची व शेत सरवई नंबर ३५७ एकर ३४ गुंठे १४ आकार रुपये ५२ बावन यादोन्ही शेतामध्यें आमचा अनुक्रमें हिस्सा आहे तो पहिल्या शेतात ⅓ व दुसऱ्यांत ⅙ असे माझे हिस्से पूर्ण मालकीचे आहेत बुनकाई मर्द रामजी टाकळे ही माझी भावजई असोन अन्नवस्त्राची मालकीण आहे. इजपासून तुह्मा उभयतास सदरील शेतें खरीदी अगर गहाणवट घेण्याचा तुह्मास कोणत्याही प्रकारानें घेण्याचा काही इतका अधिकार नाहीं. व बुनकाई इजला विकण्याचा अधिकार नाहीं. असें असून तुह्मी उभयतांनीं मागील बाकी ता. १९-१-९१ रोजीं रुपये ४०० चारशें निवतात ह्मणून सदरील शेतें खरीदी करून घेतली.

रामजी व. विटोबा वाकळे यांनें तुह्मा उभयतां पासून केव्हां व किती रुपये कसे कसे घेतले व कोणच्या हिशेबानें ४०० चारशें दाखवून शेतें खरीदी करून घेतलीं हें आह्मांस कांहीं समजत नाहीं तर ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसांचे आंत रामजी वल्लद विठोबा याचे खातें दाखवून देणें घेणें निवत असेल ते मी रीतशीर देण्यास तयार आहे तर नोटीशींत लिहिल्या प्रमाणें सर्व हिशेब दाखवून पै पैई रुपये घेऊन जावे व आमचीं शेतें आह्मास द्यावीं. असें झालें नाहीं तर तुह्मी बुनकाई मर्द रामजी इजबरोबर जो तुह्मी उभयतांनी व्यवहार केला आहे तो कोणत्याही प्रकारानें रीतशीर नाहीं ह्मणून आमचे जे नुकसान झालें आहे त्याबद्दल व सदरील व्यवहार रीतशीर झालेला नाही ह्मणून माझी सर्व प्रकारची जी नुकसान झाली व होईल त्याजबद्दल जें नुकसान होईल तें सर्व ह्या नोटीशीच्या खर्चासह भरून घेतले जाईल. ह्मणून दिली नोटीस सही ता. १४-२-९५ इसवी

[ सही ]

तुकाराम व० उदेभानजी वाकळे दस्तु

आत्माराम व० लक्ष्मणजी पाटील

वृ० खुद.

---

No. 44

Order of Dissolution of Partnership

Section 215 of the Code of Civil Procedure

In the Court of Civil Judge at Akola

Civil Suit No. 131 of 1894.

Gurumukharai Sukhanand trading in the name of Gurumukharai Sukhanand Dukan Akola by Mukhtiar Oomediram Jetmull of Akola. Plff

Warjang Deoraj Bhatia of Akola. Deft.

Claim Rs. 1028.

It is declared that the partnership in the plaint mentioned between the Plff. and Deft. do stand dissolved from the 8th. day of December 1894.

Akola 15-2-95 } V. N. Dandekar Civil Judge

---


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, स्लाटर हाऊसचा, कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, व स्टेशन धर्मशाळेचा कर वसूल करण्याचे हक्काचा लिलांव सन १८९५।९६ सालाचा तारीख १८ माहे मार्च सन १८९५ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस हजर होण्याचे करावें. कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी.

Md. Husain
Secretary
A. M. C.


---

## वर्तमानसार.

वजिरिस्थानची सरहद्द कायम करण्याच्या कामांत इंग्रज कामदार व अफगाण कामदार यांच्यांत कांहीं महत्वाचा मतभेद होऊन सरहद्द कायम करण्याचें काम तूर्त तहकूब झालें आहे.

उमराखान व चित्रळ यांची लढाई झाली चित्रळचा दक्षणप्रांत काफरिस्थानांत जाण्यास रस्ता पाहिजे या सबबीनें उमराखानानें घेतला वजिरी लोक टोश किल्यावर चाल करीत आहेत खुद्द चित्रळ किल्यावरही हल्ला झाल्याची बातमी आहे.

रतलाम व उज्जन यांच्या दरम्यान रुंद रस्त्याची रेल्वे करण्याचा खर्चाचा अदमास ३६॥ लाख रुपयांचा झाला आहे.

येत्या हिशेबी वर्षांत पाट बंधाऱ्याचीं कामें करण्या करितां पाऊण कोट रुपये बजेटांत घालणार आहेत.

रेल्वे कंपन्यांनीं रेल्वे तयार करण्याचें काम चालूं असतांही भांडवलांतून भागीदारांस व्याज दिलें पाहिजे असा कायदा होणार आहे.

इंग्लंड व स्काटलंड या देशांत हल्लीं थंडी विलक्षण प्रकारची पडत आहे, व त्यामुळें मोठा कहर उडाला आहे.

उमराखान चित्रळ येथें असून त्याची पुष्कळ फौज आसपास आहे.

बडोद्याचे रेसिडेन्ट क. बिडल्फ रजेवर जाणार व त्यांचें काम क० मटॅली हे करणार.

बडोद्याच्या गायकवाडांनीं लार्ड हॅरिस यांच्या स्मारकास १,००० रुपये देऊं केले आहेत.

चालूं महिन्याच्या शेवटच्या दोन तारखा व मार्च महिन्याची पहिली तारीख या तीन दिवस मुंबईस घोड्यांचें प्रदर्शन होणार असून चांगल्या घोड्यास मोठाली इनामें देण्यांत येणार आहेत.

उमरखान चित्रळ येथें आला असून त्यास प्रतिबंध करण्यांत येत नसल्यामुळें यानें चित्रळच्या तरूण राजास आपल्या ताटाखालच्या मांजरा प्रमाणें करूत ठेवलें आहे.

हल्लींचा काळ सरहद्दी कायम करण्याचा आहे असें गव्हरनर जनरल यांणीं पर्वा लाहोरच्या दरबारांत बोलून दाखविलें असून त्याप्रमाणें अनुभवही आहे.

वजिरि लोकांनीं इंग्रजसरकारच्या अटी कबूल केल्या व आणखी कांहीं नेलेलीं हत्यारें परत आणून दिलीं.

चित्राहिल लोकांस बिनहत्यारी करण्याचें काम जारीनें चालूं आहे.

काबुलांत व त्या आंगच्या भागांत हल्लीं अति थंडी आहे.

अमिरानें विलायतेहून मागविलेलीं यंत्र वगैरे जड सामान काबुलास जाऊन दाखल झालें.

आह्मांस एक चांगला नेटिव डाक्टर द्या असें काबुलच्या अमिरानें हिंदुस्थानसरकाराजवळ मागणें केलें आहे. कोण जातो पहावें.

यंदा बुखारा प्रांतांत रेशमाचें पीक चांगलें आलें आहे व भावही चांगला आहे. तें रेशिम पूर्वी हिंदुस्थानांत येण्यास मस्कोवरून सहा महिने लागत, पण आतां बाटमच्या नव्या रस्त्यानें ६० दिवस बस होतात.

बेलफास्ट कंपनीच्या गोद्या पांच डॉकट यांवर फिर्याद होऊन समाप्त झालीं,

हावा लोकांनीं बटेवर तोफांचा मार केला, पण फ्रेंचांनीं त्यास हाकून लावलें.

जर्मन सरकारानें आपल्या लढाऊ गलबतांत लाकडाचें काम बिलकूल करूं नये. सर्वच काम लोखंडाचें असावें असें ठरविलें आहे, चालू चिनी जपानी लढाईत लाकडाचें काम असल्यास तें पेट घेतें असें अनुभवास आलें आहे. टा० अ०

एक महत्वाचा ठराव—विलायतेंतील सुधारणा करण्याबद्दल सिलेक्ट कमेटीनें जे ठराव मंजूर केले आहेत त्यांत पुढील प्रकारचा एक उपयुक्त ठराव आहे:—"दुसऱ्याला कंटाळा उत्पन्न होईल अशा प्रकारें कोणतेंही बिभत्स कृत्य जाहिर जागेंत किंवा त्याचे नजीक कोणी करील अथवा बिभत्स गाणें, वाक्य किंवा शब्द उचारील, त्यास तीन महिन्यापर्यंतची कोणत्याही तऱ्हेची शिक्षा देण्यांत येईल" चावट पदें, लावण्या किंवा बिभत्स शब्द बोलणारांना किंवा सभ्यतेविरुद्ध वागणारांनीं व स्त्रियांचा उपमर्द करणारांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें व आपलें वर्तन सुधारावें.

## चीन व जपानची लढाई.

तह करण्यासाठीं गेलेल्या चिनच्या वकीलांनीं नीटसे कागदपत्र आणले नाहींत ह्मणून त्यांस, जपानच्या प्रधान मंडळानें परत लावलें आहे. तहाचें बोलणें लौकर आटोपावें व एकदाची शांतता व्हावी ह्मणून चीन सरकारची विनंति, इंग्रज, रशियन व अमेरिकन वकीलास एक सारखी चालूं आहे. इकडे लढाईचें काम थोडें बहुत चाललेंच आहे. वेई हाई-कई बंदर अद्याप चीननें सोडलें नाहीं. परंतु लढाई जारीनें चालून, एक किल्ला जपाननें सर केला असून, गलीनचु भागाकडे चीनचें लष्कर बरेंच मागें हटूं लागलें आहे. थंडीचा विशेष कडका पडत असल्यामुळें या लढाईचें काम बरेंच थंडावलें आहे. वेई-हाई-कई बंदरावरील चीनचें लष्कर जपानी लष्कराच्या सपाट्यांतून पळून गेलें असल्याची नुक्तीच तार आली आहे.

ध्यानांत ठेवा. एक धनगर मुंबईहून राजापुरास जात होता तो, बोटींत बसला असतां, सोडावाटरची बाटली घेऊन, ती उघडून, तिचा जोस जाऊं न देतां प्याला; आणि त्यामुळें दम लागून, त्याचा त्वरित प्राण गेला.

कलकत्ता—हिंदू मुलींनां हिंदूंच्या रीतीभाती प्रमाणें संस्कृत व बंगाली भाषेचें शिक्षण देण्याकरितां 'महाकाली' नांवाची पाटशाळा, कलकत्यास चांगली चांगली चालली असून, गेल्या शनिवारीं तिचा बक्षीस समारंभ फार थाटानें झाला. पहिल्या तारखेस हीरापुऱ्यांतील हिंदूंनीं सरस्वतीची पालखी काढली होती; त्या वेळीं तिचा मुसलमानांनीं देवतामंग केला ह्मणून त्यांस पकडण्यांत येऊन, त्यांच्यावर खटला सुरू आहे.

मडागास्करमध्यें फ्रेंच लष्करानें जय मिळविल्याची तार आली आहे.

नाण्याची लढाई—सोनें व रुपें असें दोन्हा प्रकारचें नाणें चालूं करण्याविषयीं इंग्लंडांत जारीनें वादविवाद चालला आहे. पण "त्यापेक्षां पौंडापौंडाच्या नोटाच काढणें बरे" असें ह्मणणारा एक तिसराच पक्ष उभा राहिला आहे. त्याचें ह्मणणें कीं, "रुप्याचें नाणें चालू केल्यानें तें खजीन्यांत अतिशय पडून राहील, व शेवटी त्याची फारच हलकी किंमत उतरून जाऊन शेवटीं सोन्याचें नाणें सुरू करणें भाग पडेल. पण सोनें इतकें मिळणें कठीण होईल. त्यापेक्षां नोटांचाच (कागदाच्या तुकड्यांचाच) प्रसार जास्त करावा हें फार चांगलें!" पहावें या झटापटींत काय निष्पन्न होतें तें.

निजाम हैद्राबादेपासून मिडकनांदेद व औरंगाबाद इकडून मनमाड पर्यंत रेल्वे होण्याचें घाटत आहे.

ही गप्प म्हणावी कीं खरी!-अर्मीनिया देशांत ख्रिस्ती लोकांवर तुर्क लोकांनीं जुलूम केल्याची अफवा निघाल्य मुळें इंग्लंडें रशियाच्या सल्ल्यानें, त्याचा शोध करण्याचें तुर्कस्थानच्या सुलतानास भाग पाडलें, ह्मणून तर्कींतील बऱ्याच मुसलमानांस राग आला. आहे व त्यासाठीं हिंदुस्थानांतील मुसलमानांना इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास ते उत्तेजन देण्याच्या तजविजींत आहेत असें, डेली टेलिग्राफच्या बर्लिन येथील बातमीदारानें लिहिलें. अहे ही गोष्ट भरवसेदार व जोखमाची आहे असें म्हणवत नाहीं.

इंग्रजी लष्करास, लढाईचें थोडें बहुत काम करण्यास हल्लीं बरेंच फावूं लागलें आहे. वझिरी लोकांचे मागें लागून, त्यांची व्यवस्था होते आहे तोंच वायव्य सरहद्दी वरील चित्रालच्या मुलखांत कांहीं हमरा तुमरी होण्याचा संशय आल्यावरून, तिकडे थोडेसें लष्कर पाठविण्याच्या विचारांत, इंग्रज सरकार असल्याचें कळतें.

पूतमेहावर—नारळीच्या मुळाच्या पावशेर रसांत जिरें नऊ टांक वाटून व त्यांत थोडें पाणी व नऊटांक खडीसाकर घालून, दिवसांतून दोनवळ घेणें.

नळगंड किंवा सर्वांग सुजेवर—आंबाड्याची धुपी द्यावी व ह्मशीच्या ताज्या शेणाचा रस १ तोळा दिवसांतून १ वेळ द्यावा. ते लवण, आंबट, तिखट वर्ज्य.

ओंव्याचा अर्क—ओंवा शेर एक घेऊन, शेळीच्या मुतांत पुटें १ देऊन सुकवावा. मग मक्याच्या रसाचीं दहा पुटें द्यावीं व सुकवावा. मग कोऱ्या हंडीत रुईच्या पानाचें १ थर करून, त्यावर ओंवा घालावा. नंतर त्यावर वाटी ठेवावी. वाटीचे तोंडावर रुंद मडकें भरून ठेवावें. त्यावर उडदाच्या पिठाचा लेप करून दम जाऊं देऊं नये. अग्नि १ प्रहर द्यावा. ओंवा भरलेल्या मडक्याच्या खालीं लहान भोंक पाडून त्या खालीं दुसरें एक मडकें ठेवावें; त्यांत अर्क उतरेल. मग अर्क घेऊन विड्याच्या पानाशीं खाणें. दिवस ८ आधीं कांहीं खाऊन मग अर्क प्यावा; ह्मणजे प्लीहा, कास, श्वास, जलोदर, संग्रहणी, ओकारी, पित्त इत्यादि बरें होतें.

केंस काळे होण्यास—बाभळीचा कोंवळा पाला, किंवा इतका; किंवा कोरफडाचा गीर १॥ तोळा; अथवा एक खोबऱ्याची वाटी; या पैकीं कोणतेंही एक सतत वर्षभर खाल्यानें कधींही केस पांढर होणार नाहींत, व झालेले काळे होतील असें एके ठिकाणीं लिहिलेलें आहे.

विषूचिका, प्लीहा, अग्निमांद्य, गुल्म, अजीर्ण, संग्रहणी, कास, श्वास, वातरोग या सर्वांवर— [illegible] ऊनारखार, व मीठ यांचें, मडक्यांत रुईच्या पानावर थरांवर थर देऊन, व तें लिंपून अग्निपूट द्यावें. नंतर भस्म काढून त्यांत त्याच्या चौथा भाग—त्रिकटु (सुंठ मिरें, पिंपळी) चित्रक, वावडींग हिंग यांचें चूर्ण घालून तें सर्व एकत्र करून ठेवावें, व जरूर लागेल तेव्हां शक्तिमानाप्रमाणें तें १।२ किंवा ३ गुंजा, ताकाबरोबर द्यावें; असें रसकुमुदिनी नांवाच्या एका फार जनाट लेखी ग्रंथांत लिहिलेलें आहे. याचीं औषधें व क्रिया यांवरून हे गुण करणोर होईल असें वाटतें. अनुभव घेऊन कोणी कळविल्यास लोकोपयोगी होईल.


## जाहिरात,

हे पाक पौष्टिक पहा, व त्वरित गुणपण—तो मजेशाज—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्यापासून धातवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बादीत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळांतिणीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य—सौभाग्यसुंठ. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्हाल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पोंटास खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २।८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंठ उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर

दवाखाना अकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती कारखानें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जारत काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें कें० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ,, ७ ,, १८८
किरकोळ अंकास ............... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०।

Six monthly ......... 3 ,, 8 as
Single copy.............................. 4 as

Advertisement
Below 10 lines... 2 as
per line over 10... 4 as
Repetin r line 3 asotr

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 25 FEBRUARY 1895 NO. 8

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २५ माहे फेब्रुवारी सन १८९५ इ० अंक ८

## नोटीस

रा. रा. सांगीदास शालिग्राम रहाणार दताळे तालुके मलकापूर यासी शालिग्राम छगनलाल वहिवाटदार मालक पृथ्वराज बक्तावरमल रहाणार अकोलें यानकडून देण्यांत येते कीं, तुह्मावर खामगांवाले सरदारमल तेजमल याणी मे. स्पेशल आसिस्टंट कामिशनर साहेब यांचे कोर्टात दिवाणी मुकदमा नंबर ६९ चा हुकुमनामा मिळविला आहे तो १८९०

त्याणी आह्मास गहाण लिहून दिला आहे सबब या नोटिशीनें पुन्हां कळविण्यांत येते कीं, सदर्हू हुकुमनाम्याचे फेडींत आपण बसूल देणें तो सदर्हू सरदारमल तेजमल यांस न देतां आह्मास द्यावा. आपण तसें न केलें तर जबाबदारी आपले माथ्यावर आहे. कळावें तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८९१ इसवी.

( सही )
पृथ्वीराज बक्तावरमल
याची मारवाडींत.

## जाहिरात.

आफु मक्तेदार जिल्हा अकोला यांजकडून तमाम लोकांस प्रसिद्ध करण्यांत येते कीं. अकोला जिल्ह्याचा आफिणीचा मक्ता सन १८९५।९६ साळचा आमचे नांवें सरकारांतून कायम झाला आहे.

अकोला जिल्ह्यांपैकीं कांहीं तालुके व गावे पोट मक्त्यानें ता० १ एप्रील सन १८९५ चे तारीख ३१ माहे मार्च सन १८९६ अखेर देण्याची आहेत.

सदर्हू पोटमक्ता ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांणीं खालीं लिहिले तारखेस नेमले वेळीं नेमले ठिकाणीं गावचे पाटील पांडे याचे सहीचा दाखला लायकी बद्दल घेऊन हजर राहावें पोट मक्ता ज्याचें नांवे कायम होईल त्याजकडून पेषगी $\frac{1}{4}$ घेऊन पावती देण्यांत येईल.

मक्त्यांच्या शर्ती सरकार कानुन प्रमाणें आहेत त्या व इतर लिलाव समयीं कळविण्यांत येतील.

नंबर १ तालुके १ खामगांव, २ जळगांव
तारीख— २६ व २७।२।९५
ठिकाणा— खामगांवचे सराईंत अगर गांवांत

नंबर २ तालुक बाळापूर, व अकोला
तारीख— ८ मार्च १८९५
ठिकाणा— अकोलें शहरांत

नंबर ३ तालुका अकोट
तारीख— १३ मार्च सन १८९५
ठिकाणा— अकोट येथील सराईंत

येणें प्रमाणें नमूद केलें तारखेस पेषगी वगैरे सह हजर व्हावें कळावें तारीख २१ फेब्रुवारी सन १८९५ इ०

मुक्काम अकोलें

काशीनाथ बापु एजंट
वाळसेट पुंडुसेट
सदर मक्तेदार आफीणीचे.

## मुलांचा शिक्षण क्रम

( मागील अंकावरून पुढें चालू )

असत्य आणि कपटरूपीं आडवाट दिसण्यांत जरी मोहक असली तरी ती दग्याची आणि वाईट आहे. सत्य रूपीं मार्ग सरळ व धोपट असून सुरक्षित आहे. सत्य मार्गानें गेले असतां आपला फार फायदा होईल. सद्गुणांचा आश्रय करण्यांत आपलें हित आहे. दुस्व्यास अपकार करणें आणि अनीतीनें वागणें ह्यांचा दिसण्यांत जरी विजय झाला. तरी, त्या विजयानें मनास खरोखर स्वास्थ्य मिळणार नाहीं; ह्या गोष्टी मुलांच्या मनांत जितक्या लहानपणीं ठसल्या जातील तितकें चांगलें. परंतु तीं थोडीं मोठीं होऊन त्यांचा समज वाढला ह्मणजे, चांगल्या गोष्टी केल्यापासून आपला कांहीं फायदा आहे. या करितांच त्या कराव्या, असें नसून त्या चांगल्या आहेत एवढ्याच करितां आपल्याला केल्या पाहिजेत व शुद्धवर्तनाचें आणि अहेतुक प्रेमाचें खरें सौरस्य काय आहे हें त्यांस शिकवा आणि ईश्वराची भक्ती त्यांच्या मनांत बाणेल अशी योजना करा.

लहान मुलांच्या हाती योग्य पुस्तकें देण्याची काळजी घ्या. मुलांच्या अभ्यासा करितां जीं पुस्तकें नेमलीं नेमलीं जातील, करमणूकी करितां, त्यांच्या हातीं पडतील, तीं चांगलीं पाहिजेत. कारण त्यांचा परिणाम मुलांच्या वर्तनावर फार घडतो. लहान मुलांकरितां हल्लीं जीं पुस्तकें तयार केलीं आहेत, त्यांत पुष्कळ सुधारणा होणें अवश्य आहे. दिवस दिवस वाढत जाणाऱ्या मुलांच्या कल्पना शक्तीला नेहेमी कांहीं तरी खाद्य पाहिजे. कादंबरींचीं पुस्तकें आणि ज्यांत यक्ष किन्नरांच्या गोष्टी आहेत अशीं पुस्तकें मुलांनां साहाजिक फार आवडतात. अशीं पुस्तकें त्यांस वाचण्याची मनाई करूं नये कारण, शिक्षणाच्या अवश्य भागापैकीं हा एक भाग आहे.

छापखान्याची युक्ती निघाल्या पासून अलीकडे नाना प्रकारचीं पुस्तकें होऊन तीं सर्वांस मिळण्या सारखी आतां सुलभ झालीं आहेत. लोकांत ज्ञानाचा प्रसार आणि आवड वाढविण्याच्या कामीं ह्यांचा फार उपयोग झाला आहे व पुढें ही होईल. हल्लीं आपणांत प्रत्येक बाबतींत जी चळवळ उडालेली दिसते तिचें पुष्कळ अंशीं श्रेय ह्यास दिलें पाहिजे. अनीति वाढविणारीं, ज्यांत दुर्गुणाचें मोहक वर्णन केलें आहे. अथवा स्त्री पुरुषांच्या प्रेमातिरेकाचे शृंगार विलास ज्यांत वर्णिले आहेत, अशीं पुस्तकें मुलांच्या हातीं पडूं नयेत. कारण या वेळीं मुलांचीं कोवळीं असून तीं स्वतःचें नियमन करण्यास असमर्थ असतात. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांकडे पाहिलें असतां वरील दोषांनीं भरलेलीं पुस्तकें आपल्या भाषेंत फार झालीं आहेत असें दिसून येईल लोकांना करमणूक होऊन उपदेश व्हावा असा, पुस्तक रचण्यांत आपला उद्देश असल्या बद्दल, ग्रंथकार प्रस्तावनेंत लिहितात; परंतु वास्तविक पाहतां तसें न होतां त्यापासून वाचकाची सदभिरुची दूषित होते व ग्रंथकर्त्यांच्या सुंदर आणि मोहक वर्णनशैली खालीं वहात असलेला अविचार रूपीं विष प्रवाह वाचकांच्या अंतःकरणात न कळत शिरतो. शिवाय अशा पुस्तकांत, लोक स्थितीचें घातक आणि खोटें चित्र काढलेलें असतें. अशीं पुस्तकें मुलांच्या हातीं न जाऊं देण्याबद्दल पालकांनीं खबरदारी घ्यावी.

लोकांची अशीं एक चुकीची समज झालेली दिसते कीं मुलानां इतर प्रकारचें शिक्षण देण्याची वेळ आल्या शिवाय त्यांस नीतिशिक्षण देण्याची जरूर नाहीं आणि पुष्कळांच्या मनांत तर पुस्तकी विद्ये शिवाय इतर शिक्षण देण्याची अवश्यकता आहे कीं काय हा विचार ही येत नाहीं. त्यांना वाटतें कीं मुलांना लिहितां वाचतां येत आलें ह्मणजे झालें. ज्यांना नीति शिक्षणाची अवश्यकता वाटते त्यांची समजूत अशी असते कीं मुलांना लिहिणें वाचणें शिकविण्याची वेळ येण्या पूर्वीं आपल्याला करण्या सारखें कांहीं नाहीं परंतु हा समज फार चुकीचा आहे, व याचा परिणामही वाईट होतो. मुलांचा जन्म झाल्या बरोबरच मनही अस्तित्वांत येतें. त्यांच्याठायीं मनोविकार बीजरूपानें असतात. तीं लहान असतांनाच त्यांच्या आंगीं जिज्ञासा असते आणि जसजसे अवयव वाढत जातात तसतसे मनोधर्म वाढत जाऊन बाह्य उपाधीचा त्याजवर संस्कार घडून येतो. वेलास फुले येऊन तीं आपला परिमळ जसा हवेंत पसरतात तसें मुलांचें ज्ञान हळूहळू वाढत जाऊन त्यास शोभा आणि बळकटी येते. मुलांच्या मानसिक धर्मांची वाढ आणि शरीराची वाढ बरोबरच होत जाते. ज्या अर्थी जन्मतःच मुलांचें मन जागृतावस्थेंत असतें त्या अर्थी, तेव्हां पासूनच त्यांची काळजी घेणें अवश्य आहे जशी आपण मुलांच्या शरीराची काळजी घेतो तशीच त्यांच्या मनाचीही घेतली पाहिजे. यावरून मुलांच्या कोंवळ्या मनाला मार्गीं लावून देण्याचें जोखीम आई बापावर किती आहे हें समजून येईल. मुल उपजतांच आईचे जें प्रथमचें कर्तव्य कर्म आहे त्या बरोबरच शिक्षणाची योजना झाली पाहिजे. शिक्षणाचा अर्थ फक्त लिहितां वाचतां येणें येवढाच नसून शिक्षण ह्या शब्दाचा फार व्यापक असलेला अर्थ घेतला पाहिजे. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, शिक्षण ह्या शब्दाची योजना हल्लीं फार चुकीची केली जाते. शिक्षण शिक्षण ह्मणजे शाळेंत दिलें जाणारें विद्यादान होय, असेंच पुष्कळ लोकांची समज आहे. वरील विवेचना वरून कळून येईल कीं मुलांना लिहिणें वाचणें शिकवण्याचो वेळ येण्यापूर्वींच त्यांना नीति शिक्षण दिलें पाहिजे सदर्हू महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यानें असें घडून येते कीं अगोदरच मुलांचे स्वभाव बनतात, त्यांना संवई लागतात आणि त्यांच्या मनावर कांहीं गोष्टीचे बळकट ग्रह झालेले असतात. अशा प्रकारें लागलेल्या सवई व वर्तन वगैरे चांगलें असण्याचा संभव कमी असून उलटें वाईट असण्याचा ज्यास्त संभव आहे. एकदां वरील प्रमाणें स्वभाव बनला ह्मणजे कितीही काळजी पूर्वक श्रम घेतले तरी त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

मुलांचे विचार कोते असतां व त्यांची बुद्धि अगदीं कोंवळीं असतां त्यांस अनेक विषय शिकविण्याची हल्लीं चाल पडली आहे; ती चांगली नाहीं. अवेळीं मुलांच्या बुद्धीची स्थिति अनेक विषय ग्रहण करण्या सारखी नसते. मुलांनां बुद्धीनें ग्रहण करितां येणार नाहीं अशीं प्रमेयें व नियम सांगणें शिक्षकांना अवश्य व हितावह आहे असें वाटतें. ह्या प्रमेयांच्या सत्यते विषयीं मुलांनीं विचार करण्याचें कारण नसून, ते त्यांनीं मुकाट्यानें खरें मानले पाहिजेत, असें शिक्षकांना वाटतें. अशा शिक्षकांनां विचार करण्याचें काय महत्व आहे हे समजत नाहीं; आणि जी विचार शक्ती अप्रतिहत खर्च केल्यानेंच पूर्णतेस येते तिची वाढ अश्या रीतीनें विनाकारण लांबणीवर टाकली जाते. ह्या योगानें कित्येक वेळा तर योग्य निवड करण्याची शक्ती मुलांच्या आंगीं मुळींच येत नाहीं. योग्य वय प्राप्त झालें असतां एखाद्या गोष्टी विषयीं स्वतः विचार करून त्या विषयीं त्यांच्या झालेल्या मता प्रमाणें जर योग्य मोकळीक दिली नाहीं तर इतरांच्या मताविषयीं कांहीं संशय न घेतां, त्यावर पराकाष्टेचा भरंवसा ठेवण्याची त्यांस सवय लागते, आणि असें झालें ह्मणजे मग तीं कोणत्याही गोष्टीवर भरंवसा ठेवतील. या वरून कोणी असें समजूं नये कीं हरएक गोष्टीबद्दल संशय घेऊन आपलें झालेलें मतच खरें मानावें, परंतु हें येथें सांगण्याचा उद्देश इतकाच कीं, मुलांना आपल्या स्वतःच्या विचार शक्तीचा उपयोग करितां येऊन त्या प्रमाणें त्यास वागतां यावें, मात्र लहानपणा पासूनच योग्य मार्गानें विचार करण्याची त्यांस दिशा दाखवून दिली पाहिजे. समाजाची सुधारणा होण्यास ज्यांत विचार करणारीं स्त्री पुरुष पाहिजेत. परंतु अश्या स्त्रिया व पुरुष उत्पन्न होण्यास ज्या दिशेनें विचारशक्ती योग्य रीतीनें वाढेल, त्या दिशेनें शिक्षण क्रम दिला पाहिजे.

शिक्षण मार्गांत अडथळा आणणारी दुसरी गोष्ट ही आहे कीं, मुलांना संगत कोणाची आहे इकडे आईबाप लक्ष देत नाहींत. परंतु ह्या संगतिपरिणामानेंच पुष्कळ मुलें व्यसनी, दुष्ट, उनाड आणि अनीतिमान झा-

त्याची उदाहरणें आहेत. आहेत. आईबापांना व शिक्षकांनीं इकडे विशेष लक्ष द्यावें.

लोक समाज अज्ञानी असणें ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. दोषाचें जनकत्व अज्ञानाकडे आहे. दुर्गुण, गुन्हे आणि दुर्भिक्ष, ही अज्ञानाची प्रजा आहे. हल्लीं लोकसमाजांत जी अनीति आहे आणि दुर्वर्तन आहे त्याचें मुख्य कारण लोकांत असलेली शिक्षणाचा वाण होय, असें आतां सर्वांस कळून आलें आहे. लोकसमाज अज्ञानी असल्यामुळें वर्तमान काळाची त्यास माहिती नसते आणि भविष्य काळा विषयीं तो बेफिकीर असतो.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती फाल्गुन शुद्ध १ शके १८१६

---

युनिव्हर्सिटीचा दरसाल पदवीदानाचा समारंभ होत असतो आणि त्यासाठीं फेब्रुवारींतील तिसरा मंगळवार हा दिवस नेमिलेला आहे परंतु यंदा लार्ड हारिस साहेब त्याचे अगोदर इंग्लंडास जाणार असल्यामुळें व्हाईस—चान्सेलर साहेबांनीं त्यांचे करितां एक निराळें जादा कान्व्होकेशन एक आठवडा आधीं केलें, व त्याच वेळीं पदव्या देण्याचें ठरविलें. परंतु लार्ड हारिस साहेबांची इतकी योग्यता आहे असें कित्येकांस न वाटल्यामुळें वार्षिक समारंभाचे वेळीं पदव्या मिळतील किंवा नाहीं असा प्रश्न त्यांनी रजिस्ट्रार यांस केला होता. त्यांस असें उत्तर मिळालें का उमेदवारांनीं पाहिजे त्यावेळीं ह्मणजे १२ तारखेस अगर १९ तारखेस समारंभास यावें. दोन्ही वेळा त्यांस पदव्या मिळतील. तें पत्र वर्तमान पत्रांतून छापलें ही गेलें. त्यामुळें पुष्कळ उमेदवारांनीं दुसऱ्या ह्मणजे वार्षिक समारंभास पदव्या घेण्याचा निश्चय केला. ज्या साहेबांनीं शिक्षणाकरितां अगर लोककल्याणाकरितां कांहींच प्रयत्न केला नाहीं अगर करण्याची इच्छाही दाखविली नाहीं त्यांचे अंगची गुप्त योग्यता डाक्टर भांडारकरां प्रमाणें या उमेदवारांस दिसून आली नाहीं.

शेवटीं तारीख १२ रोजीं कानव्होकेशन होऊन हारिस साहेबांचे चहात्यांनीं आपलें काम उत्तम तऱ्हेनें तडीस पाडलें. त्यावेळीं पदवी घेणाऱ्या पैकीं सुमारें निम्मे हजर होते तेव्हां व्हाईसच्यान्सेलर यांच्या पायांतील आग मस्तकास गेली आणि बाकी राहिलेले उमेदवार बंडखोर आहेत असें आपल्या मनांत भरवून घेऊन त्यांस कडक शिक्षा करण्याचे ठरविलें. पदव्या घेणारे लोकांनीं कॉनव्होकेशनचे पूर्वीं दहा दिवस अगोदर आपण त्या समारंभास पदवी घेणार असें रजिष्ट्रार यांस अर्जद्वारें कळवावें असा नियम आहे. परंतु या नियमाचा अमलबारी आजपर्यंत कधींच केली नव्हती. परंतु बंडखोर लोकांस शिक्षा करण्याचा निश्चय केल्या बरोबर हा नियम त्यांस एक शस्त्रच मिळालें. व त्या शस्त्रानें पुष्कळांस शिक्षा करण्याचें जमलें. तथापि बरेच उमेदवारांस या नियमामुळें अडथळा येत नव्हता कारण त्यांनी १० दिवसाचे पूर्वींच अर्ज केले होते. तेव्हां त्यांस शिक्षा करण्या करितां अशी एक कल्पना डोक्यांतून काढिली कीं त्यानीं येत्या (ensuing) समारंभाचे वेळीं येऊं असें लिहिलें असून ते १२ तारखेस आले नाहींत ह्मणून त्यांचा अर्ज १९ तारखेस कुच कामाचा झाला असें साफ सांगावें. त्यांत एवढें लक्षांत ठेवावयाचें कीं त्या अर्जा पैकीं पुष्कळ १२ तारखेचे अगोदर फक्त पांच सहा दिवस केले होते. तेव्हां नियमा अन्वयें १२ तारखेचा समारंभ त्यांस उपयोगीं नव्हतां तर त्यांचे उपयोगीं १९ तारीख हाच दिवस होता. अशा दोन्ही शस्त्रांच्या सहायानें या बंडखोरास शिक्षा करवावी असें मनांत आल्या बरोबर सिंडिकेट मध्यें वर सांगितलेल्या उमेदवारांस पदव्या देऊं नये अशी एक सूचना आणिली व तिजबद्दल दोन्हीं पक्षीं सारखीं मतें पडल्यामुळें व्हाईस चॅन्सेलर साहेबांनीं आपलें मत देऊन बहुमत करून ती सूचना पास केली व या शस्त्रांनींही ज्या वीस पंचवीस उमेदवारांस कोणत्याही रीतीनें शिक्षा करितां येत नव्हती त्यांस ही १९ तारखेस आह्मी पदव्या देत नाहीं व रजिष्ट्रारनीं पाहिजे त्या दिवशीं पदव्या मिळतील असें लिहिलें तें त्यांस अधिकार नसतां लिहिलें असें उत्तर सांगावयाचें असें बोलून सुद्धां दाखविलें परंतु त्या कृत्यानें आपल्या अंगावर घेरपड येऊन दुसऱ्यासही फळ भोगावें लागेल हें वेळेवर समजून त्या २० अगर २५ लोकांस १९ तारखेस पदव्या द्याव्या असें ठरविलें.

हा ठराव पासिद्ध झाल्या बरोबर किती एक गरीब उमेदवार व मुख्यत्वें करून एल. एल. बी. वाले आपणांस यंदा पदवी न मिळाल्यामुळें वकीली करण्याची सनद एक वर्ष मिळणार नाहीं व त्यामुळें नुकसान होईल हें समजून डाक्टर साहेबांस स्वतः भेटून त्यांची प्रार्थना करण्या करितां त्यांचे घरीं गेले. परंतु त्यांचे प्रार्थनेनें हे मानवी देव प्रसन्न तर झाले नाहींतच परंतु उलट तुह्मीं आमचे शिष्य, आह्मीं तुमचे गुरु या हक्काचे आश्रयानें डाक्तर साहेबानीं आपले शिष्यांवर असा कांहीं गहजब उडविला कीं तो कांहीं पुसूंच नये. त्यांचे मतें या बंडखोर लोकांचा अगदीं चुराडा करावा. त्यांस दुर्गीचे पायांखालीं घालून मारावें ही या शिष्यांची योग्यता. फार तर काय व्हाईसच्यान्सेलर साहेबांस अधिकार असतां तर त्यांनीं ग्राजुएट लोकांच्या सगळ्या परीक्षा रद्द केल्या असत्या असा रंग दिसला.

तेव्हां निरुपाय झाल्यामुळें निरुपाय झाल्यामुळें कांहीं उमेदवारांनीं १२ तारखेचे वेळीं आपणास कांहीं कामें होतीं, आपण आजारी होतों व त्या बद्दल सरटिफिकिटेंही आहेत असें सांगितलें. तरी त्या सरटिफिकीटावर विश्वास ठेवावा अगर न ठेवावा. हाच प्रश्न उभा राहिला. परंतु विश्वास ठेवीत नाहीं असें साफ सांगतां येईना. कोणतीं योग्य आहेत हें ठरविण्या करितां दुसरी एक सिंडीकेटची सभा भरविली. व त्यांत नामदार रावबहादूर रानडे, डाक्तर देशमूख प्रभृती मंडळीच्या परिश्रमानें सर्वांस पदव्या द्याव्या असेंच ठरलें. व त्या वेळीं मात्र डाक्टर भांडारकर यांनीं अनर्थ आढेवढे घतले नाहींत या बद्दल ग्राजुएटवाले त्यांचे फार आभारी आहेत. त्यांत असें ठरलें कीं या कॉन्व्होकेशनच्या वेळीं कोणत्या ही प्रकारचा समारंभ अगर भाषण न करितां केवळ युनिव्हरसिटीच्या फेलोजची सभा भरवून त्यांत पदव्या लेवढ्या द्याव्या. व या प्रमाणें तरी बंडखोर लोकांस शिक्षा करावी.

शेवटीं १९ व्या तारखेस सिनेटची सभा भरली. त्यांत पदवी घेणारे ग्राजुएट आले व कितीएक प्रेक्षक आले. सभ्य लोकांस निमंत्रण न केल्या मुळें प्रेक्षक लोक ह्मणजे शाळेंतील मुलें आणि कालेजांतील अंडर ग्राजुएट एवढेच लोक होते हें सांगावयास नको. फेलोजमध्येंही लार्ड हारिसचे विरुद्ध बंडखोर लोकांस पदव्या देण्याचे वेळीं हजर रहाणें पाप आहे असें वाटल्या मुळें अनेक सुशिक्षित बडे युरोपियन फेलोज हजर नव्हते. होते ते कॉलेजचे प्रोफेसर लोक ह्मणजे पदव्या घेणारांचे गुरु व दोन एक दुसरे लोक. बंडखोर लोकांना पदव्या देण्याचे समारंभास आपण गेलों तर आपणासही बंडखोर समजतील व आपण अधिकाऱ्यांचे मर्जीतून उतरूं अशी भीति वाटून कीं काय कोण जाणें पुष्कळ नेटीव फेलोजनींही हजर न रहाण्या विषयीं विशेष काळजी घेतली होती.

प्रथम ग्राजुएट लोकांना नांवबारीनें बसवून प्रेक्षक लोकांस त्यांचे पुढें दसविलें पुढें एक एक फेलो येऊं लागले तेव्हां मि. दाजा, सयानी, गोखले, डाक्टर देशमुख, भाटवडेकर हे आले तेव्हां टाळ्यांचा गजर झाला. पुढें नामदार जस्टिस रानडे आले तेव्हां तर कांहीं वेळ पर्यंत टाळ्यांचा गजर सुरूच राहिला.

पुढें कांहीं वेळानें (हिसिज) हुश हुश असें शब्द ऐकूं येऊं लागले. पहातांत तों डाक्टर भांडारकर आणि कांहीं युरोपियन फेलोज हॉलचे दरवाज्यांत धडकलेले. ही मंडळी पुढें जाऊन व्हाईस चान्सेलर साहेब चान्सेलरचे खुर्चीवर बसेपर्यंत हिसिज चाललेच होते. पुढें शांतता झाल्यावर रीतीप्रमाणें पदव्या देण्यांत आल्या. त्यांत कांहीं कमी जास्ती झालें नाहीं याबद्दल संतोष वाटतो. पुढें व्हाईस चान्सेलानीं "मी कानव्होकेशन बरखास्त करितो." असें एक लंगी भाषण केलें. त्याबरोबर हिसिज पुनः झाले. अशा प्रकारें १८९५ चा वार्षिक कानव्होकेशनचा समारंभ आजपर्यंत कधींही न झालेल्या व पुढें कधीं न होणाऱ्या थाटानें झाला. त्याचें स्मरण बहुत काळपर्यंत ग्राजुएट लोकांस राहीलच पण, डाक्टर भांडारकरही तें आपलें कृत्य कधींही विसरणार नाहींत यांत शंका नाहीं.

एकंदरीनें घडलेला प्रकार वाईट खरा! डाक्टर भांडारकरा सारख्यांची विद्वत्ता, अधिकार, व वयोवृद्धपणाही लक्षांत घेऊन पाहतां वरील सोहळे अयोग्य होते असें वाटल्या वाचून रहावत नाहीं. परंतु डाक्टर भांडारकरांनींही आपले वडून मंडळीच्या अपमान या कडेलोट केला ह्मणूनच गोष्टी या थरास पोंचल्या असाव्यात यांत शंका नाहीं.

---

सरकारनें आपला सारा वाढविण्याचा क्रम झपाट्यानें चालविला आहे. आणि लोक दिवसानुदिवस निकृष्ठ स्थितीला येऊन पोंचत आहेत तेव्हां अखेर परिणाम कोणत्या प्रकाला येऊन बसणार याचें कांहीं अनुमानच करितां येत नाहीं. जमिनीचा कर फार कमी झाला, शेतकरी दरिद्री असून रेटीला मोताद होण्याची वळ आली व तशांत अकाली पावसानें सालासोल पिकांची नासाडी आरंभिली ह्मणून हल्लीचाच वायदा कसा वेळेवर फिटेल अशा फिकिरींत लोक पडले आहेत आणि दुसरीकडून तर नवी जमाबंदी अगदी जलदीनें चालूं आहे आणि धारा मनमुराद वाटेल त्या दर वर्गवारी प्रमाणें आकारला जात आहे तेव्हां लोकांना किती चिंता व हरिणकाळजी लागली असेल याची अटकळ कल्पनेनेंच होण्यासारखी आहे.

व्यापाराच्या दृष्टीनें शेतीमध्यें ज्या लोकांनीं पैसा घातला आहे आणि वर्षानुवर्ष जे शेती निव्वळ नफ्यानें लावून काढून अप्रत्यक्ष व्यापार करित आहेत त्यांना या साऱ्याच्या वाढीपासून भिण्याचें कारण नाहीं. परंतु जे शेतीवर उदरनिर्वाह करितात आणि ज्यांस शेतकी शिवाय दुसरी पोटाची सोय नाहीं अशा लोकांच्या वाढत्या कुटुम्बाची व्यवस्था या नवीन धाऱ्याच्या चकाखालीं फार कठिण आहे. या खऱ्या शेतकरी वर्गातल्या प्रजास मुद्दाचा अगदीं निव्वळ चुराडा होण्याचा रंग दिसतो. पहिला सधन व पैसेकरी लोकांचा वर्ग फार लहान आहे पण तो कदाचित जमिनीच्या खातेदारांच्या संख्येंत पुष्कळ येत असेल; तथापि सरकारनें त्यांच्या खातेदारीच्या मजबुतीवर व आपल्या येलीवर नजर ठेविली तर उत्तरोत्तर जो गोरगरीब शेतकऱ्यांचा समूच्चय वाढत आहे त्यांच्या कल्याणाविषयीं सरकार पराङ्मुख होईल तर त्यांचीं दुःखें व हाल अपेष्टा हीं अत्यंत दुणावतील. सांप्रत दुसऱ्या वर्गांत बहुत बहुत लोक येतात आणि त्यांच्या चरितार्थाची सरकारनें काळजी ठेविली तर तें राज्याच्या सुयंत्रित पणाला कांहीं ठीक नाहीं. खरोखर वेळ शेतकऱ्यांस कमीजास्त प्रमाणानें साऱ्याची माफी किंवा सूट देण्याची वेळ आली आहे तेथें सारा वाढल्या विषयीं हुकूम सुटतात या विपर्यासाला उपाय कोणता!

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY,
25, 1895

The new settlements in the Khamgaon and Jalgaon talukas have caused general discontent and dispair. The re-assessments send the land-tax very high and there is no attempt to consult well the interests of the payers of the tax. The first settlement had already fixed upon high rates and it is a double misfortune to be re-taxed on a larger and heavier scale after a period of thirty years. The position of a holder of land has become risky and insecure. He is to be blown up at the slightest indication of displeasure in regard

to the newly assessed land-tax. The tenant is preached a lesson of grare-lul resignation to the land-lord. The Government is the full and sole land-lord and it leases out fields at rates fixed for thirty years without any interference with the rights and liabilities which sub-tenancy assumes. The land-lord is a foreigner and people in India receive in the long run the treatment of a step-mother. The Resident has in his Administration report for 1892-93, pointed out the exact position of a holder of a field under the ryotwari-system in Berar. He observes:—

"No occupant is bound to hold his land more than one year. If he does not like it, as long as he gives due notice according to the law, *i. e.* in due form and at a fixed convenient season (so that the land may be available for cultivation to a successor), he is free to relinquish his holding, or any part of it comprising an entire survey number, or recognized portion of a survey number. But he must pay up the revenue for the year. A transfer of occupancy by sale or otherwise is also subject to the same conditions, for it is in effect a relinquishment by the registered holder and an assent by a new comer to take the holding in his place, and the Government is not bound by the transfer till the current year's revenue is paid up. Though the occupant is thus at liberty diminish his holding according to his own pleasure, he is nevertheless free to maintain it for ever if he chooses. At the close of the 30 years' settlement, he must accept the revised assessment just as in any other Indian Settlement, and if he does not approve of the revised settlement he may relinquish the land. The occupant of a field or number which is appropriated to agriculture may do anything he pleases in the way of improvement, and may erect farm and agricultural buildings.

The moral is—one cannot question the good sense of the land lord viz the Government and no body needs to be told that might is right.

The present survey-operations and the new settlements have caused greatest anxiety to the public mind and people do not know where and when they will find redress. The Sarwajanik Sabha held forth a ray of hope but we do not know what has become of its memorial to the Government. Perhaps it is shelved for centuries to come or the Government thought it impolitic to say a precise no to the requests of the people. In a country like India where agriculture is the principal and wholesale occupation of the people, agriculture should be allowed the prior claims to permanency, security and a good margin of profits. Land-tax forms the main spring of Indian finances and it is no sound statesmanship to make the land-tax fickle, changing and unsteady. No doubt, with the recurring increase in the old rates finances run up very high but to our plain mind the growing inability to pay the higher taxes and the sinking state of agriculture threaten a general disaffection and go to the very root of the solid foundations of a good Government. Things do not come to an issue unless the spring of tolerance gets loose under the highest tension. The agricultural masses are in debts over head and ears: They form the overwhelming majority of the society of this province. They are extremely poor and helpless and are quite unfit to sustain the higher pressure of the new settlements. Not only that no land-tax admits of a reasonable increase but that some judicial and executive measures will have to be adopted in no distant future.

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पाऊस पुष्कळ पडला हवा रोगट आहे. रब्बीच्या पिकांची नासाडी अतिशय झाली. किरकोळ दुखणीं बरींच बळकावलीं आहेत.

रा. रा. नारायण शिवराम बर्वे हर्दी, गोरक्षण सभेचे बिनपगारी उपदेशक यांनीं येथील लायब्ररींत गेल्या बुधवारीं गोरक्षणावर सुरस व्याख्यान दिलें.

वऱ्हाडांतील मराठे-देशमुखाची एक सामाजिक सभा स्थापण्याची विचार चालला असून त्या लोकांनीं एक छोटी पहिली सभा अकोल्यास भरली होती. सामाजिक सुधारणे विषयीं देशमुख मंडळी खऱ्या कळकळीनें झटतात हें त्यांस मोठें हितावह व भूषणावह आहे.

हल्लीं सेशन कोर्ट अकोल्यास बसलें आहे. आज पासून शेगांवच्या खुनी मारामारीच्या खटल्याची चौकशी आहे. गेल्या बुधवारीं एक शेगांव जवळील टाकळीचा खुनाचा खटला होता त्यांत एका परदेशास किरकोळ मारामारींत एकानें जोडा मारला ह्मणून त्यानें त्याच्या डोक्यांत काठी मारली आणि त्यामुळें त्या जोडा मारणाऱ्याचा प्राण गेला. परदेशी फाजील कडवेपणाची ऐट करीत असतात. त्यांनी वरील परदेशास तीन वर्षांची सजा झाली हें पाहून शहाणें व्हावें.

मि. वेड एक्स्ट्रा असिस्टंट रेसिडेंट हे हैदराबादेस वारल्याची वाईट बातमी कळते. त्यांच्या जागीं वऱ्हाडांतून कोणाची बढती होते हें ठरविण्या साठीं इकडील पुष्कळजण हिशोब करूं लागले आहेत.

पाटील व पटवारी हे सरकारी नोकर तेव्हां त्यांच्या उत्पन्नावर इनकमट्याक्स वसूल करावा अशा विषयीं हुकूम सुटले आहेत. सारांश पाटील पांड्याच्या छोटेखानी उत्पन्नावर ही नवीनच घोरपड आली!

हैदराबादच्या दिवाणाचे चिरंजीव सुलतान उल-मुल्क हे कामकाज शिकण्या साठीं गेले सात आठ महिने या जिल्ह्यात होते. त्यांची स्वारी येत्या मार्चच्या ५ वे तारखे पासून आपल्या दरबारीं परत जाणार आहे.

'बनसीलाल विरुद्ध क० कृष्णाजी दिनकर' हा खटला आज सात आठ वर्षें चालला आहे. प्रतिवादी यांनीं आपल्या दोन घरामधील सार्वजनिक बोळ घरांत सामील केला होता ह्मणून तो बोळ खुला करण्यासाठीं वादीनें फिर्याद केली आणि तीन कोर्टांत काम चालून अखेर हायकोर्टानें वादीची मागणी खालील कोर्टा प्रमाणें मंजूर केली. ह्या खटल्याचें तात्पर्य लक्ष्यांत ठेवण्या सारखें आहे तें असें:—कोणी कोणाच्या भरीला दृष्टीनें पडूं नये, व ज्यांच्या हातीं कांहीं अधिकारसूत्रें असतात त्यांनीं आपल्या सत्तेच्या जोरावर अन्यायाच्या मार्गांत सरळगामी मनुष्यास घालून खोटी लालूच लावूं नये हें शहाणपण होय.

मि. रुस्तुमजी फर्दूनजी असिस्टंट कमिशनर बुलडाणा यांस गेल्या २१ वे तारखेपासून २१ दिवसांची रजा मिळाली.

मि० ब्रिडे असि० कमिशनर यांस सहा महिन्याची विशेष रजा मिळाली आहे.

क्या० हार्सब्रुघ व मि० सिम्पसन यांस समरी माजिस्त्रेटचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. गोविंदराज अय्या ए० असि० कमिशनर यांस येथील स्माल काज कोर्टाचे १००० रुपया पर्यंतचे पूर्ण अधिकार देण्यांत आले.

मि० इलियट यवतमाळचे डेपुटी कमिशनरचे जागीं पुन्हा रुजूं झाले.

रा० रा० शेषाचिलम मुदलीआर तहशिलदार यांची बदली वाशिमास झाली आहे.

रा. रा. मल्लसमुद्र रामय्या बी. ए. एल. सी. इ. आप्रेन्टीस इंजिनिअर, अकोला यांची बदली चिखलदऱ्यास झाली.

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा वार्षिक समारंभ खामगांवास होणार असून त्या निमित्त तिकडे कडेकोट तयारी चालली आहे समारंभाचे दिवस शाळाखात्याच्या सोयी करितां मार्च तारीख १०।११ हे केले आहेत. आणि यंदा उमरामतीकर सभासद मंडळी समाजापुढें नाटक प्रयोग करून दाखविणार आहेत असें कळतें. गुदस्ता प्रमाणें रेलवे कंपनीनें निम्या दरानें सभासदांस जाण्यायेण्याची परवानगी दिली आहे.

पार्शी लोकांचें एक नवें स्मशान स्थान अकोल्यास स्थापत करण्याचा येथें मोठा समारंभ गेल्या सप्तकांत झाला.

राव सा० सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. शाळाखात्याचे डायरेक्टर हे येत्या १९ वे तारखे पासून एक महिन्याचे हक्काचे रजेवर जाणार आहेत.

त्यांच्या रजेंत रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे डायरेक्टरचें काम पहातील असें वाटतें.

बुलक जुडिशिल कमिशनर हे एक आठवडाभर सरकारी कामानिमित्त हैदराबादेस गेले आहेत.

मि. हशमतअल्ली अस्याची उमरावती यांस कांहीं दिवसांची रजा मिळाली आहे.

शिंदखेडच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यांतील खटले उशिरानें निकालास लागले ह्मणून अलिशान रेसिडेंट यांनीं हुकूम फर्माविला आहे कीं धर्म संबंधी खटल्यांचा निकाल लवकर करण्यांत येत जावा.

### नोटीस

नोटीस बेशमो आंबरासिंग वल्लद भगवान मयत वारिस बायको लक्षुमो मर्द आंबरासिंग काळणे वस्ती कसबे तरोड तालुके खामगांव यांस नोटीस देणार खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचे नवऱ्यानीं ह्मणजे अंबरासिंग यानीं आपलें शेत मौजे तरोडे तालुके खामगांव जिल्हे अकोलें येथील शेत सर्व्हे नंबर ९ एकर १२-२३ गुंठे आकार रुपये १३ चें मजला विकत देऊन माझे ताब्यांत दिलें आहे व खरेदी खतांत लिहून दिलें कीं शेताचें खातें जेव्हां नांवानें लावून मागाल तेव्हां लावून देऊं. हल्लीं तुमचा नवरा हा मरण पावला असून वारसाचे संबंधानीं शेताचें खातें तुमचे नांवा-

नांवानीं लावून देण्या बद्दल आह्मी तुह्मास पुष्कळ वेळ झटलें असून तुह्मी आज देऊं उद्यां देऊं पण खामगांवीं येऊन शेताचें खातें आमचे नांवानीं लावून देत नाहीं. या प्रमाणें थापा देतां पण अद्यापि शेताचें खातें बदलून देत नाहीं करितां मुद्दाम नोटीस देण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत खामगांवीं येऊन सदर्हू शेताचा राजीनामा देऊन खातें बदलून द्यावें. जर या प्रमाणें मुदतीचे आंत शेताचें खातें बदलून देणार नाहीं तर मुदती नंतर आह्मी तुमचेवर रीती प्रमाणें तजवीज करून पुढें तुह्मास नोटिशीचा लागलेला खर्चा सुद्धां कोर्टखर्च भरून द्यावा लागेल. करितां आपणास आगाऊ कळविलें आहे. कळावें तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९५ इ.

(सही)

नथुजी वल्लद मुऱ्हारजी

वस्ती कसबे तरोड

दस्तुर खुद्द.

### नमुना (जी)

नादारी मुकदमा नंबर २ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला.

सर्व धनको यास नोटीस देण्यांत येतें कीं, कृष्णाजी वल्लद सोनाजी हा नादारी आहे असा आज तारीख ११ माहे २ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २३ माहे मार्च सन १८९५ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादारीच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें व त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञालेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ दिल्हावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील.

P. Govindraj
Judge
Bankruptcy Court
Akola District.

येत्या मे महिन्यांत हिंदुस्थानच्या फोटोग्राफांचें विलायतेस एक प्रदर्शन होणार आहे.

कलकत्याच्या एका इटालिअन माणसावर ७०,००० रुपयांचा फसवाफसवी केल्याचा गुन्हा शाबीत होऊन त्यास १८ महिन्यांची शिक्षा झाली.

हिंदुस्थानच्या कायदे कौंसलांत बरीच चर्चा होऊन शेतकऱ्यांच्या अक्टांत दुरुस्ती करण्याचें बील पास झालें.

मध्यप्रांतांतील पांढरी टाक्स बंद करण्याचा सरकारचा इरादा नाहीं.

जर्मनसरकार आपलें आरमारखातें इतक्या झपाट्यानें वाढवीत आहे कीं, या खात्याच्या खर्चाकरतां १८८९ सालच्या बजेटांत ९,१०,००,००० इतकी रकम होती त्याच्या बदला गेल्या बजेटांत ९,००,००,००० इतकी रकम घातली आहे.

इंग्लंड व त्याच्या आसपास थंडीचा विशेष कहर चालूं असून विशेष दारिद्री लोक मोठ्या प्रसंगांत आहेत.

इजिप्त देशाची गेल्या वर्षाची जमा, खर्चाच्या आंकड्यापेक्षां ७,९०,००० पौंड जास्त झाली व १८९५ सालीं ६,६०,००० पौंड शिलक राहील असा अनमास आहे. हिंदुस्थानच्या कारभारांत मात्र शिलक अशी कधीं राहतच नाहीं ! !

फ्रेंच व सीयाम यांच्या फौजांचा कमान येथें एक तंटा होऊन त्यांत एक फ्रेंच आफिसर जखमी झाला.

मुंबईच्या गव्हरनराविरुद्ध नेटिव पत्रकर्त्यांचे फार कडक लेख आले हें प्रसिद्धच आहे. नेटिव पत्रकर्त्यांनीं अशा प्रकारचें वर्तन ठेवणें चांगल नव्हे असें लार्ड हारीस यांचें ह्मणणें असून ते अमलांत आणण्याकरतां नेटिवपत्रकर्ते होऊं इच्छिणाऱ्या उमेदवाराची एक प्रकारची परिक्षा घेण्याची सुरुवात करणें अवश्य आहे असें त्यांणीं आपलें मत आगबोटींत बसण्यापूर्वी चार दिवस त्यांनीं आपल्या कल्याण शिष्पांस [भांडारकरादिकांस] सांगूनही टाकलें. तें अमलांत कसें काय येतें हें मात्र आतां पहाणें आहे.

मागें बाहेर आल्याप्रमाणें शेवटीं मि. नारायण वामन टिळक यांचा गेल्या रविवारीं बाबतिसमा होऊन ते ख्रिस्त झाले असें गेल्या ज्ञानोदयावरून समजतें. त्यास राजनांदगांव येथें चाकरी होती, पण ते ख्रिस्ती झाल्यामुळें त्यांची ती चाकरीही गेली असें सांगतात. त्यांच्या मागें त्यांची वृद्ध आई त्यांची प्रिय पत्नी व एक लाडकें मूल अशीं आहेत, त्यांचे हाल होऊं नयेत व येशूनें त्यांसही आपल्या कळपांत आणावें अशा बद्दल मि० टिळक यांणीं आपल्या ख्रिस्ताची प्रार्थना चालविली आहे असें त्याच ज्ञानोदयांत जगन्मित्र सहीनें प्रसिद्ध झालेल्या कविता वरून होतें. आतां या पुढें तरी त्याच्या चंचल झालेल्या मनास ईश्वर नव्हे ख्रिस्त समाधान देवो.

हिंदुस्थानच्या अधिकारी साहेब लोकांचे हिंदुस्थानच्या लोकां विषयीं जे वाईट ग्रह होतात त्यांत त्यांचा दोष नसून त्यांच्याकडे जाऊन लाळ घोटणारे जे आमच्या पैकीं कांहीं लोक असतात ते आहेत. कारण साहेबांस आमची प्रत्यक्ष माहिती नसल्या मुळें त्यांजकडे जाणाऱ्या लोकांच्या शब्दावर त्यास अवलंबून राहणें भाग पडतें, असें नागपूरच्या एका पत्राचें ह्मणणें असून या वऱ्हाडवुचक्या लोकांचे त्याणें दोन वर्ग दाखविले आहेत. एक आपली लोकांत प्रतिष्ठा वाढावी ह्मणून कामदाराकडे उगीच खेटे घालणारे खाऊन पिऊन सुखी असणारे लोक, व दुसरे कोणीकडून तरी साहेबांची मर्जी होऊन आपली वढती व्हावी ह्मणून साहेबांच्या कला प्रमाणें बोलणारे नोकर लोक. या दोन वर्गांच्या लोकांच्या लुडबुडण्यानेंच आमचें हें सर्व नुकसान होत आहे असें त्या पत्राचें ह्मणणें असून त्याणें त्याचा बराच तपशीलही दिला आहे. आणि शेवटी या लुडबुडणाऱ्या वऱ्हाडवुचक्या लोकांस सर्व नेटिवांनीं अगदीं जातीबाहेर टाकल्या सारखें वागवून त्यांची फटफजिती करावी असें सुचविलें आहे.

जज्ज जो कायदा सांगेल त्यावरच जूरीनें अवलंबून राहिलें पाहिजे. कायद्याचे स्वतंत्र पुस्तक घेऊन त्यावर केलेल्या टीपा वाचून जज्जानें न सांगितलेला असा एकदां आरोप शाबीत आहे अशा प्रकारचें सांगणें चांगलें नाहीं. अशा आशयाचा मुंबई हाय कोर्टानें गेल्या मंगळवारीं एक ठराव केला.

ठा० अ०

मुंबई एथें खडकावर गटाराचें खोदकाम चाललें असतां एके ठिकाणीं तेलाचा झरा लागला आहे. त्यांतील तेल शुद्ध नाहीं, पण वायुवर उपयोगी आहे असें समजून लोक वाटल्या भरून नेतात.

महाराणी साहेबांचा सांवत्सरिक वर खर्च १,७२,००० पौंड आहे.

औंध रेल्वेच्या रस्त्यावर कमालपूर आणि खैराबाद यांच्यामध्यें एक तलाव सांपडला आहे. त्या तलावांत स्नान केल्यानें महाव्याधीसारखे असाध्य रोग दूर होतात. असा अनुभव कित्येक रोगग्रस्तांस आल्यामुळें त्या मंगळ तीर्थांत स्नान करण्यासाठीं हजारों लोकांच्या झुंडी चालल्या आहेत व सितापूर जिल्ह्यांत सर्वतोमुखी हाच तीर्थमाहिमा होऊन गेला आहे असें समजतें. क त०

बडोदे चमत्कार—सरकारी पीलखान्यास मोरील आगडांत एक लिंबाचें झाड आहे. त्यांतून झऱ्यांप्रमाणे पाणी वहात आहे ही मौज पाहाण्यास पुष्कळ लोक जात आहेत. लिंबाच्या पाण्याचा औषधाकडे उपयोग होत असतो. ह्मणून श्री. रा. रा. तात्यासाहेब घाडगे पिलखाना कामदार यांनीं या पाण्याचीं भांडीं भरून ठेविलीं आहेत.

अपसुखें चालणारी बायसिकल— दुचाकी, तिचाकी, व पायांनें चालविण्यांत येणारी गाडी पुष्कळांनीं पाहिली असेल, त्या तऱ्हेची दुचाकी गाडी, आपसुखें चालेल अशा प्रकारची तयार झाली आहे. स्वित्झरलंड मधील जिनीव्हा शहरांत असलेल्या बरुअल फेरेसन कंपनीनें ही गाडी तयार केली असून, तिचा खप झपाट्यानें चालला आहे.

इंग्लंडांत एकसारखा तीन वर्षे इन्फ्लुएंझा रोग चालूं असल्यामुळें तिकडे फार चिंता ह्मणजे रोगाची प्रत्येंं वादावयाचींच !

कानूलच्या अमिराची रुपये पाडण्याची टांकसाळ आहे; पण ती कां बंद होत नाहीं? असा एक प्रश्न निघाला आहे. बंद करणार कोण?

इंग्लंडात जरी व्यापारधंद्याची मंदी आहे तथापि तेथील संपत्ती वाढण्याचें कारण, हिंदुस्थानावरून पैशाचा ओघ झपाट्यानें तिकडे चालला आहे असें, मि० दादाभाई नवरोजी यांनीं नुकतें " वेस्टमिनिस्टररिव्ह्यू " मध्यें एका निबंधांत सिद्ध करून दिलें आहे.

अमेरिकेंत फ्लारीड द्विपकल्प व ऐशियांत जावा बेट येथें पांढरा " गुवावा " नांवाची वनस्पती उगवते; तिच्या पानांचा काढा, सर्व प्रकारच्या अतिसारावर व कालऱ्यांवर फारच गुणकारी असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

चीनशीं लढण्याचें काम पुरें करतांच, जपान सरकार, कापड व सूत या व्यापारांत झपाटून उद्योग करणार आहे असें ह्मणतात. स्वतः राजानें मनावर घेतल्याशिवाय चांगला उपयोग होत नसतो.

जपनांत गिरण्यांचा प्रसार व काम फार चांगल्या रीतीनें चालूं असल्यामुळें लौकरच म्यांचेस्टरच्या व्यापाराला जपान खालीं आणील असें दिसतें.

सण, आंबाडा वगैरे बाह्य देशीं जाणाऱ्या कापडावर जकांत ठेवण्याचा विचार या वर्षीं तरी नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

चित्रालकडे जो तंट्याचा उद्भव झाला आहे तो अद्याप विकोपास गेला नाहीं.

एक सार्टिफिकीट:— हिंदुस्थानांत शिक्षणाबरोबर मर्दुमकीही वाढत चालली आहे असा इंग्लंडच्या ' ग्लोब ' पत्रानें आपला अभिप्राय दिला असून, असें होणें हें हिंदुस्थानच्या उत्कर्षास साधन आहे असें तें पत्र ह्मणतें असें होईल तर फार चांगलें. पण होईल तेव्हां खरें.

सोनारास शिक्षा:— गेल्या डिसेंबरांत विजापूरचे जज्ज रा० ब० व्यंकटराव रुक्मांगद यांची दागिन्यांची पेटी फोडून नुकसान केल्या बद्दल तीन सोनारांना पंचवीस पंचवीस रुपये दंड नाहीं तर १५।१५ दिवसांची कैद या प्रमाणें शिक्षा करण्यांत आली.

स० वि०

नोटीस

रा० रा० सरदारमल तेजमल दुकान खामगांव मालक पन्नालाल सरदारमल रहाणार खामगांव यांस शालीग्राम छगनलाल दुकान अकोले वहिवाटदार मालक पृथ्वीराज बकतावरमल रहाणार अकोले याजकडुन नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मास ता० ६।७।९३ चे ताबेगहाण खत रुपये १०००० दाहा हजारचे करून देऊन त्यांत जो माल गाहाण लिहून दिला त्यांत खालीं लिहिलेला माल आहे तो:—

तुह्मी सांगिदास सालिग्राम मारवाडी रहाणार दताळ याजवर मे० स्पेशल असि० कमिशनर साहेब कोर्ट अकोलें यांचे कोर्टांत दिवाणी मु० नंबर ६१ चा हुकूम नामा मिळविला असे तो- ——

१८९०

सदरहू हुकुमनामा गाहाण लिहून देऊन असेंही कबूल केलें आहे कीं सदरहू रुपये वसूल करण्या करितां आह्मास मुख्त्यार पत्र करून देऊं. त्याप्रमाणें मुख्त्यारपत्र करून दिलें नाहीं. परंतु आपण या पूर्वी कांहीं वसूल केला असल्यास त्याजवर दिवाणी फौजदारी दोन्ही जबाबदाऱ्या आपण आपले डोक्यावर घेतल्या असें होईल. व या पुढेंही आपणास वसूल करण्यास हक्क नाहीं ह्मणून आपण कांहीं वसूल करूं नये. केल्यास आपण जबाबदार आहा. कळावें. तारीख १०।२।९५ इसवी.

( सही )

सही पृथ्वीराज बकतावरमल यांची मारवाडीत असे.

## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुण–पण–तो मजेदार–किंमत थोडी, व फायदा जास्त– हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतीनीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य–सौभाग्यसुंठ. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्हाल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पोटास खा!! गेला दिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंठ उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना अकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनोरीं काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जारत काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Civil Suit No. 188 of 1892
Shriram Motiram V. DeoRao Jaikrishna
(Plaintiff's address continued from our last issue).

In this connection it may be useful to pass in brief review all ti allegations and imputations made by the Deft in his report dated 18-1-92, and indicate briefly how they have have been controverted.

Para 1. may be said to be introductory and states that the reasons for ordering plff to sit outside the veranda of the court are given in the following paras.

Para 2 alleges that plff (a) wrote several anonymous and false petitions against the Sub Registrar of Telhara (b) and sent petitions to the Deputy Commissioner, in the names of persons who knew nothnhg about them, and (c), that plff was warned in miscellaneous class No. XIV miscel No. 363 of 31-12-89 on the grounds mentioned above.

Comments

(a) It is not true that plff wrote any petitions of the kind mentioned by Deff. No evidence has been adduced to show that he did. None of the anonymous and false petitions have been produced and shown to be in the plff's hand. The Sub Registrar when examined as a witness does not say that plff wrote any anonymous and false petitions against him.

Thus this allegation and the imputation is absolutely false, and maliciously made.

(b) None of these petitions were produced, and none shown to have been sent by Plff without the knowledge of their signatories. This allegation is also therefore false and alicious.

[c] Case o. 363 has nothing whatever to with plff. It has no bearing wtever in this case either for or ainst plff. The Deft made this alletion falsely and maliciously.

The Deft the finding out the falsity of his imation, produced papers in Mis. ca No. 353. It has nothing to do wi any of the papers mentioned the Deft in para 2 of his rep and it is believed that a sta ent of this case will show con sively that the Deft made th all falsely and malicio sy. The report of the Sub Registrar produced for the Deft, is not admissible in evidence. Also the record of Case No 353 is inadmissible in evidence. Vide Odger's page 576 Here it is laid down that "if however the imputation is that the plff has committed a crime, then the charge must be proved as strictly as on an indictment for the same offence. And here, the fact that the plff had been previously tried and acquitted, or convicted, is irrelevant; and the record of the Criminal trial is not admissible in evidence either way, for the parties are not the same. (Justice V. Gosling and others, 12 C. B. 39; 21 L. G. C. P. 94; England V. Bourke. 3 Esp. 80).

At page 577, it is laid down that "so, too, that others have previously published the same charges against the plff, and have not sued is no justification for the defendent's re-publication. Still less is it any evidence of the truth of such charges. (R. V. Newman, E. & B. 268; 22 L. J. R. B. 156; 3 C. & K. 252; Dears. C. C. 85; 17 Jur. 617.)

Further the report itself is said to be an office copy, but it differs from a copy sworn to by the Sub Registrar, by an important para out of it being omitted in the alleged original. Thirdly the report as submitted, and the papers mentioned therein and the proceedings taken thereon are not produced. Thus it will be seen that the report, besides being inadmissible is so defective and suspiciously put forward, that it cannot be relied on for any purpose of the defence.

Mr. Folkard in his learned work on Slander and Libel observes as follows:—

Page 536.

"When the libel imputed bigamy to the Plff, the Deft justified on the ground that the Plff was guilty of bigamy: and it was held that in order to support the plea of justification, the same strictness of proof was required as would be necessary on the trial of an incident for bigamy.

There seems to be little, if any, difference between the evidence in proof of a specific charge thus involved in a civil proceeding, and the evidence, which is essential to support an indictment for a similar charge. It may, indeed happen, that more precise evidence may be necessary to support such a justification, than would be sufficient to sustain an indictment; for, the proof in the former case is governed by the allegations in the defence, and frequently such allegations may require precise proof, though they would not have done so in an indictment. For instance, if the slander consist in charging the Plff with having stolen sovereigns in the plural, the defence must necessarily charge him in the plural, and the Deft would fail in his justification, if he could prove no more than the stealing one, but on the trial of an indictment for larceny, the variance would be wholly immaterial." Pages 538--39

"And in a similar case, where the Plff was convicted of travelling on the Deft's railway without a ticket, in default, fined 1 s. with costs, and in default three days' imprisonment, ...g that the Plff published placards stating... and fined, but had been so convicted as imprisonment stated the alternative The Plff having with hard labour...bel, they pleaded a sued the Def, alleging the truth of the justifications contained in the placards. stat was ruled, that a railway company had no more right to publish such placards than any one else: that the question for jury was, whether or not the statement on the placard was substantially true: if there was an exaggeration of the facts to the detriment of the Plaintiff's character, he would be entitled to a verdict; and that with a view to the assessment of damages, the Plff was at liberty to enter into all the circumstances, which led to the conviction, although such evidence tended to show that the conviction was erroneous.

Therefore it is necessary to show how—

Miscel No. 353 Miscellaneous class No. 14 originated and ended:—

On 11-7-89 two men Jackiram and Tukaram Sonar of Danapur got a deed of mortgage for Rs. 125 written by plft and presented it to the Sub Registrar of Telhara for registration, but the latter on 3-8-89 refused to register it on the ground that the document was written on both sides of the stamp paper instead of a blank paper being attached to it, and it had not sufficient

blank space left for endorsements. (The Sub Registrar admits this, vide his statement as witness No. 2 for plff). It was then pointed out to him that there was enough space left blank on the back of the stamp paper to admit of the endorsements being written there, but the Sub Registrar persisted in his refusal to register it. Jankiram and Tukaram Sonar, thereupon recovered from plff the value of the stamp paper, and got him to write the document on a paper purchased by them with his money for the purpose. It was presented, and was registered. (Vide the statement of Sub Registrar) Plff was thus put to loss, and to recoup himself, he sent a petition to the District Registrar of Akola, giving all the facts as mentioned above briefly, and praying that the legality of the action of the Sub Registrar may be tested by an examination of the rules, and money permitted to be recovered. The District Registrar of Akola took no notice of his petition. He at any rate heard nothing about it. So he presented a petition to the Inspector General of Registration (vide a copy of petition filed in Miscel no. 353 of 1889) asking for the same relief, as he had done in his petition to the District Registrar. The I. G. of Registration was pleased to forward the matter to the District Registrar of Akola for disposal, who without calling upon Plff to support his statements, and relying solely on the exparte assertions of the Sub-Registrar rejected the petition. It will be noticed that the SubRegistrar in replying to the D. R. changed his ground and stated that he refused registration because there was not enough space on the document left blank to enable him to write the endorsements of registration, and the persons presenting it declined to supply a blank paper for the purpose. Both these statements, will be found not at all borne [illegible] the remarks in Book No. 2, which is a record of the reasons for refusing registration. Further, it would appear that the Sub-Registrar was under the impression that no document written on both sides of a stamp paper could be admitted to registration. For, when on 8 8-89 another document similarly written was presented for registration, he forwarded to the District Registrar with a query as to how it should be dealt with. If what he wrote on this occasion on 8-8-89 is true then his saying on 3 8 89 that he refused registration, because there was no blank space on the document, and because no blank sheet was supplied cannot possibly be true. Had he thought on 3-8-89 that a document of the kind in question could be registered he would not have on 8 8-89 i. e. only five days later, made a reference to the District Registrar. (Compare this with the statement of witness No. 2 for plff [Sub Registrar and a copy of D. R S. letter No. 675 5 11 89 which is in the record of miscel No. 353).

The fact of the matter appears to be that taking advantage of the want of notice of the enquiry, and plff's consequent absence there at the Sub Registrar made such excuse for his illegal action, as he in the light of further knowledge could. and he did so without any regard for the truth. Nay, he probably took occasion to prejudice the District Registrar against plff, for that officer not content with rejecting his petition wrote a letter No. 674 5-11-89 which is in the record of miscel No 353, to the Deputy Commissioner of Akola suggesting that plff's license to vend stamps and write petitions should be cancelled. His answer in reply to the suggestion showing cause why his license should not be withdrawn, showed clearly that the statements made by the Sub Registrar were not true, and that he was in a position to prove his allegations. On the papers of this enquiry, before the whole was submitted to the Deputy Commissioner for orders, Mr. Sule, then the clerk of the Court to the Deputy Commissioner, thought it fit to write a memo or office note covering fully a sheet and leaving no stone unturned to throw mud on Plff. This Mr Sule did, because he was a friend and also a caste man of the Sub.Registrar and on those grounds, Plft had objected to his having any thing to do with the enquiry. [ vide Plff petition and M Sule's memo in Misel No 353 of 1889)

The Deputy Commissioner disposed of this matter in Plffs absence. There is nothing against Plff in this case. And therefore the order passed therein is erroneous.

As the action of Plff against the Sub Registrar was jusitfied, the Deft's allegation that "But this did not improve him" is entirely false and made maliciously without any the least enquiry.

The Defendant was not at Telhara in 1889 when the disputes leading to the controversy between the Sub Registrar and the plff really took place. At that time Mr. Shrikrishna Narhar was the presiding Judge of the Telhara Court. And therefore he knew of his personal knowledge, the merits and rights of the said dispute and gave a certificate of good character to the plff on 31-3-90 in which he says. "He bears an excellent character, and has straight—forward manners, which his mean enemies dislike and prompts them to exert against his interest. I advise him to be as honest as he has hitherto been in all his doings, and he will remain safe." A copy of this certificate is filed by the Deft. with other papers on 18 4.95.

Para III. alleges that plff made two other false applications, one on the 1st June 1890 and the other on 28-7.90 regarding petition writers, the contents of which on enquiry found to be utterly false.

Comments

There are only two petitions produced. One of these is not written nor signed by Plff, and the other of 11th September 1889 is perfectly true and not even attempted to be shown to be false. It is conclusively shown by the petition made by 1 Trimbak Bapuji, 2 Krishna Rao Sitaram and 3 Laxman Vishwambhar Pathak on 27—9—90 and records that they were practising as petition writers without any license. When this fact was brought to light by petitions of Plff, the said petition writers applied for licenses, and they were granted on the recommendation of the Deft and the sub Registrar. The sub Registrar when examined as witness no. 2 for Piff stated that no licenses were necessary to practise as petition writers in his department. He is however contradicted by the papers, which the Deft produces, for they contain licenses given to people to practise as petition writers in the sub Registrar's office. The petition writers petitioned against also admit that they practised without any license in their petition dated 27.9.90 Not only this but the Deft himself has admitted this fact in his report made on Plff's petition dated 11th September 1890 Therefore, every point, mentioned by the plff in his petition is perfectly true and this allegation false and malicious.

The Deft has omitted to produce both the petitions of 1st June and 28th July 1890.

(to be continued)